म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२३३

# भारत चीन संघर्ष

त्र्यं. र. देवगिरीकर

REFBK-0013143

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

# भारत–चीन संघर्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३४४४६ वि: निबंध
क्रमांक ७२३३ दि. १४.३.६३

☆

लेखक

त्र्यं. र. देवगिरीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 73983
संग्रह शाखा (स्थल प्रत)
REFBK-0013143

★ चित्रशा[illegible], पुणें-२ ★

किंमत रु. १·५०

**India-China Struggle**
by T. R. Deogirikar

* * *

पहिली आवृत्ति
५ जानेवारी १९६३

सर्व हक्क स्वाधीन

* * *

मुद्रक प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रास्ताविक निवेदन

भारत–चीन संघर्ष हा जसजसा वाढूं लागला, तसतशी तो संघर्ष कशाकरितां आहे व त्याचें स्वरूप काय हें समजून घेण्याची उत्सुकता जनतेंत वृद्धिंगत झाली. ठिकठिकाणीं चीनचा लढा जाणणारे वक्ते भाषणें करूं लागले; वृत्तपत्रांत बातम्यांचा पाऊस पडूं लागला. पण प्रथमपासूनची एकत्र माहिती असणारें पुस्तक मराठींत नव्हतें. एके दिवशीं मी व महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार सभेचे मंत्री श्री. गो. प. नेने असे दोघेजण बोलत बसलों असतां एक छोटेंसें पुस्तक मी लिहावें अशी सूचना त्यांनीं केली. चार सहा दिवस विचार केला, सरकारी ७ खंडांतील पत्रव्यवहाराचें साहित्य पुन: एकदां चाळलें व पुस्तक लिहिण्याचें ठरविलें. तेव्हां ह्या पुस्तकाचें श्रेय श्री. नेने यांना आहे. कांहीं भाग लिहून झाल्यावर मी श्री. नेने यांना म्हटलें मला आतां पुस्तक लिहावयास तुम्ही प्रेरित केलें आहे, तेव्हां तुम्हीहि हिंदींत या पुस्तकाचें भाषांतर करवून घ्या. त्यांनीं ती सूचना मान्य केली व मराठी पुस्तकाबरोबर हिंदी पुस्तक प्रकाशित होत आहे.

ह्या पुस्तकांतील कांहीं प्रकरणें सोडलीं तर बाकीचीं प्रकरणें मध्यवर्ती सरकारनें प्रसिद्ध केलेल्या साहित्याच्या आधारानें लिहिलीं आहेत. नकाशेहि त्यांनींच प्रसिद्ध केलेले आहेत. ते नकाशे वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेले आहेत. पण ते या पुस्तकांत एकत्र पाहावयास सांपडतील. या पुस्तकावरून चालू संघर्षाची स्थूल कल्पना येईल अशी आशा आहे. अल्पावधींत पुस्तक लिहिलें गेल्यामुळें कांहीं चुका त्यांत राहणें असंभवनीय नाहीं. ह्या नजरेस आणल्या गेल्या तर उपकृत होईन. ह्या पुस्तकाचा हेतु माहिती देण्यापुरताच मर्यादित आहे. ती माहिती जरा जपूनच द्यावी लागते. अधिकृत माहितीवर मुख्यत्वें अवलंबून राहावें लागतें, व टीका अगर सूचना अगर भविष्यें करण्याचा मोह आवरावा लागतो.

चीन-भारत असा संघर्ष सुरुवातीस नव्हता व तो होईल अशी कल्पनाहि नव्हती. १ ऑक्टोबर १९४९ रोजीं चीननें आपलें प्रजासत्ताक घोषित केलें. ३० डिसेंबरला आम्हीं त्याला मान्यता दिली. ऑगस्ट १९५० मध्यें चीनचें सैन्य तिबेटमध्यें शिरलें. त्या वेळीं तिबेटचा प्रश्न सलोख्यानें व शांततेनें सोडविण्याचें चीन सरकारनें कबूल केलें आणि हिंद-चीन सरहद्दीचा प्रश्न त्याच पद्धतीनें सोडविण्याची इच्छा प्रदर्शित केली. हिंदुस्थाननें उत्तरीं कळविलें कीं, तिबेट व हिंदुस्थानची सरहद्द ही अबाधित राहिली पाहिजे. २९ एप्रिल १९५४ रोजीं तिबेट व भारत या देशांतील व्यापारासंबंधीं एक करार झाला. त्या करारांत हिंदनें तिबेट हा चीनचा भाग आहे असें मान्य केलें.

त्यानंतर नकाशाबद्दल वादाला सुरुवात झाली. ऑक्टोबर १९५४ व नोव्हेंबर १९५६ मध्यें चिनी नकाशे कसे चूक आहेत हें आमच्या पंतप्रधानांनीं चीनला दाखविलें. चीननें त्यावर म्हटलें कीं, ते नकाशे तुम्ही प्रमाण मानूं नका. क्वोमिंग टँग राजवटींतील ते नकाशे आहेत व ते दुरुस्त करण्यास आम्हांला अद्याप सवड सांपडली नाहीं. नोव्हेंबर १९५६ मध्यें चीन म्हणाला कीं, आम्ही पूर्व सरहद्दीवरील ब्रह्मदेशाची जी मॅकमहोन रेषा आहे ती मान्य करतों व हिंदुस्थानचीहि मान्य करण्याचा आमचा इरादा आहे; फक्त तिबेटचा सल्ला आम्ही घेत आहोंत. ह्या श्री. नेहरूंनीं घडलेल्या मुलाखतीच्या वृत्तान्ताला चौनें हरकत घेतली नाहीं.

१९५७ मध्यें परिस्थिति बदलली. चीनची बुद्धि फिरली. त्या सालीं लडाखमध्यें ते आक्रमण करूं लागले. अक्साई चीनचा रस्ता त्यांनीं बांधला. १९५८ च्या सप्टेंबरमध्यें तेथें गेलेल्या आमच्या पहारेकऱ्यांना त्यांनीं गिरफदार केलें. हिंदुस्थाननें अक्साई चीन रस्त्याबद्दल व त्या धरपकडीबद्दल निषेध खलिता पाठविला.

सप्टेंबर १९५९ मध्यें चीननें ५०,००० चौ. मैलांच्या आमच्या सरहद्द विभागावर प्रथमच हक्क सांगितला. हिंदुस्थानला त्यामुळें धक्काच बसला. १९६० मध्यें चौ व नेहरू यांची दिल्लींत भेट झाली. त्या भेटींत उभय राष्ट्रांच्या अधिकाऱ्यांनीं कागदपत्रें तपासावींत व अहवाल सादर

करावेत असें ठरलें. पुढें ते अहवाल प्रसिद्ध झाले. हीं बोलणीं चाललीं असतां चीनचे सरहद्द भागांत हल्ले चालूच होते.

लडाखमध्यें आमच्या चौक्या बसल्यामुळें चीनला तेथें अधिक आक्रमण करतां येईना. त्यांनीं ८ सप्टेंबरपासून नेफाकडे आपला मोर्चा वळविला. २० ऑक्टोबरला त्यांनीं दोन्ही सरहद्दींवर आक्रमण केलें. त्या आक्रमणांत त्यांनीं २५०० चौ. मैलांचा आमचा टापू हस्तगत केला. २४ ऑक्टोबरला चीनें शांततेची आघाडी उघडली. पण त्यांचें आक्रमण सुरूच राहिलें. १५ ते १९ नोव्हेंबरच्या दरम्यान त्यांनीं पुनः प्रचंड हल्ला केला. २१ नोव्हेंबरला त्यांनीं युद्धतहकुबीची घोषणा केली; पण हिंदुस्थाननें सांगितलेल्या ८ सप्टेंबरच्या पूर्वी ते जेथें होते तेथें जाण्याचें त्यांनीं कबूल केलें नाहीं. त्यांनीं नेफा खालीं करण्यास सुरुवात केली आहे. पण लडाखमध्यें ते मागें जात नाहींत. भारतचीन संघर्षाची हकीकत ही अशी आहे.

वरील हकीकतीवरून चीन हा आक्रमक आहे, विश्वास ठेवण्यालायक नाहीं वगैरे गोष्टी दिसून येतात. त्या आक्रमकाला आम्हांला आमच्या राज्यांतून हाकलावयाचें आहे. तें काम सोपें नाहीं. चीनची सेना सुसज्ज, धाडसी व मृत्यूची पर्वा करणारी नाहीं. चीन प्रबळ आहे म्हणून आम्ही त्यांना शरण जाणार नाहीं. आम्हांलाहि तयारी करावी लागेल. हिंदी जनता ही जशी आर्थिक नियोजनाच्या काळांत सरकारच्याबरोबर होती, तशी या लष्करी नियोजनकाळांत राहील अशी खात्री आहे. हिंदुस्थानची सर्व शक्ति जर एकवटली तरच आपण बलिष्ठ व प्रभावी होऊं. न्यायाचा व सत्याचा जय होत असतो. तो न्याय व तें सत्य आमच्या बाजूला आहे.

आम्ही करीत असलेली लष्करी तयारी, आमच्या परंपरेनें, नकाशांनीं कागदोपत्रांनीं निश्चित असलेल्या सरहद्दी, आमचें शांततावादी अहिंसेचें धोरण ह्या सर्व गोष्टींमुळें चीनाविरुद्ध चाललेल्या लढ्यांत आम्हीच विजयी होणार ह्याबद्दल शंका नाहीं.

पुणें
५।१।१९६३

त्र्यं. र. देवगिरीकर.

# विषयानुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १. चीन व हिंदुस्थान | १ |
| २. कलहास सुरुवात–तिबेट | ६ |
| ३. रामायण का महाभारत ? | ११ |
| ४. पूर्व सरहद्द | २६ |
| ५. मध्य विभाग | ३४ |
| ६. पश्चिम विभाग | ४१ |
| ७. लडाख व लडाखी | ५७ |
| ८. चीन हक्क सांगत असलेले विभाग | ६१ |
| ९. राष्ट्रीय व आन्तरराष्ट्रीय धोरण | ६५ |
| १०. चीनचें आक्रमण व प्रतिकार | ७६ |
| ११. रेषांचा गोंधळ व युद्धबंदी | ८८ |
| १२. भविष्यकाळ | ९४ |


* * *

* संग्रहालय ... * ८. क्र. 739.83 संग्रहालय (...)

१

# चीन व हिंदुस्थान

## भूमिका

चीन व हिंदुस्थान यांचे संबंध हजारों वर्षांचे जुने आहेत, हें सांगतांना आम्हांला आतां अभिमान वाटेनासा झाला आहे. एके काळीं आम्ही संस्कृति, धर्म, दारिद्र्य व परकीय आक्रमण, या कारणाकरितां मित्रदेश आहोंत असें जिव्हाळ्यानें म्हणत असूं. पण कम्युनिस्ट चीननें हे हजारों वर्षांचे संबंध ताडकन् तोडून टाकले. त्यांचे व आमचे पुढील संबंध हे शत्रुत्वाचे होणार आहेत. चिनी आक्रमणाची सततची भीति आम्हांला वाटत राहणार आहे.

एकदां हिंदुस्थानला वायव्य सरहद्दीची भीति वाटत असे. वायव्येकडून हिंदुस्थानवर स्वाऱ्या होत. खैबर खिंड ही आमच्यावर स्वारी करण्यास उपयुक्त खिंड अशी मानली जाई. इराणी, दुराणी, मोगल वगैरे आक्रमक तेथून आले व त्यांनीं आमचा देश जिंकला. ब्रिटिशांनीं आमची ती सरहद्द निर्भय करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनाहि पराभव सोसावे

लागले. शेवटीं पाकिस्तान निर्माण झालें; पण अद्याप त्यांचे व आमचे जमाखर्च काश्मीरभोंवतीं घोटाळत आहेत.

नैर्ऋत्येकडून आम्हांला धोका नाहीं असें आम्ही मानीत आलों. हिमालय आमचा संरक्षक आहे व तो शत्रूला पुढें सरकूं देणार नाहीं असें आम्हांला वाटे. पण आतां नैर्ऋत्य सरहद्द हीहि धोक्याची झाली आहे.

हिंदुस्थान १५ ऑगस्ट १९४७ मध्यें स्वतंत्र झाला व १ ऑक्टोबर १९४९ मध्यें चीनचें पीपल्स रिपाब्लिक स्थापन झालें. चीनमध्यें कम्युनिस्ट सत्ता आल्यापासून त्यांच्या आशा, आकांक्षा वाढूं लागल्या. साम्राज्यविस्ताराची त्यांची हाव अनावर होऊं लागली. कम्युनिस्ट सत्तेचा उपयोग त्यांनीं त्यांच्या देशांतील दुःख, दारिद्र्य घालविण्याकरितां न करतां जुन्या मध्ययुगीन राजाप्रमाणें मुलूखगिरीकरितां सुरू केला.

पूर्वींच्या काळीं धर्म व व्यापार हीं दोन साधनें आमच्यांत व त्यांच्यांत समानत्व, सहकार्य व सलोखा याकरितां उपयुक्त ठरलीं. बुद्ध भिक्षु येथून तिकडे जात व तिकडून कांहीं इकडे येत. इ. स. पूर्व ६९ पासून धर्म–विचार–आचाराची अखंड देवघेव सुरू होती. फा हैन, हुएनसँग व इत्सिंग सारखे विद्वान् प्रवासी भारत-पर्यटनाला येऊन गेले. त्यांचे ग्रंथ आजहि मोलाचे वाटतात. राजकारणांत घडामोडी झाल्या म्हणजे हे संबंध टिकत नाहींत. ११ व्या शतकानंतर धर्मप्रचार व संचार कमी कमी होत गेला. पण तिबेटबरोबरचे आमचे संबंध अबाधित राहिले. तिबेट हा कंगाल देश; पण धर्मभावनांनीं सधन. पण धर्म हा पोटाचा प्रश्न सोडवत नाहीं, मनाला शांति देतो. तिबेट व हिंदुस्थानमध्यें व्यापारी दळणवळण हें परवां-परवांपर्यंत चालू असे. हजारों फूट उंचीचे पहाड, पाठीला जडजुड ओझीं वाहात तिबेटी मजूर चढत. कधीं याक, कधीं मेंढ्या यांचेहि उपयोग ते करीत. ते आपला माल येथें आणीत व येथला माल तेथें नेत. लडाखची राजधानी जें लेह तेथें एक मोठी बाजारपेठ होती.

हिंदुस्थानचे धार्मिक यात्रेकरू तिबेटच्या कैलासला व मानससरोवराला जात व तिबेटचे बुद्धधर्मीय बुद्धगया, सांची, सारनाथला भेट देत. हें सर्व व्यवस्थितपणें चाललें होतें.

हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्वाची ज्योत पेटली व चीनमध्येंहि परकीय पकडीविरुद्ध क्रोध उफाळला. ते व आम्ही दोघेहि परक्यांचे शत्रु बनलों. साम्राज्यशाहीबद्दल आमचा राग हा समान होता. सन्यत्सेनबद्दल आम्हांलाहि आदर वाटे व त्यांनीं केलेल्या प्रयत्नांकडे आम्ही कुतूहलानें पाहिलें. जपानबद्दल आम्हांला प्रेम नसे. तो एक पाश्चात्य वळणावर गेलेला देश आहे असें आम्ही म्हणत असूं. म्हणून जपाननें अलीकडच्या काळांत जेव्हां चीनवर स्वारी केली, तेव्हां आम्हीं चीनचा पक्ष घेतला. हिंदी कॉंग्रेसनें येथून पैसा, कपडे व वैद्यकीय पथक चीनला पाठविलें. श्री. जवाहरलाल नेहरूंना चीनबद्दल आकर्षण असे. ते तेथें युद्धाच्या कठीण काळांत जाऊनहि आले. कोमिंटांग पक्ष हा चीनमध्यें प्रभावी पक्ष होता. आमच्या कॉंग्रेस पक्षाबरोबर आम्ही त्याची तुलना करीत असूं. पण कोमिंटांग पक्ष व त्यांचा नेता चिआंग कै शेक हे नैतिक दृष्ट्या भ्रष्ट होऊं लागले. जनतेला नीतिमत्तेची चाड असते. जर पक्षांत लांचलुचपत, वशिलेबाजी व वाममार्गानें संपत्ति मिळविण्याची धडपड दिसूं लागली तर जनता केवढाहि मोठा पुढारी असो, त्याची पर्वा ठेवीत नाहीं.

कोमिंटांग पक्षाची ही अधोगति होत असतां कम्युनिस्ट पक्ष हा जनतेचीं अंतःकरणें जिंकत होता. त्यांत त्या पक्षाला यश मिळालें. कोमिंटांग पक्ष हा निकालांत निघाला.चीनमध्यें चाललेल्या या सत्तास्पर्धेत हिंदुस्थानानें कोणाचीच बाजू घेतली नाहीं. ह्या दोन पक्षांत दुसरें युद्ध संपेपर्यंत कांहीं समान संकेत होते, कांहीं समान धारणाहि होत्या. पण दुसरें महायुद्ध संपतांच त्यांचा अंत झाला. कोमिंगटांग पक्ष नष्ट झाला व कम्यु-

निस्ट सत्ता चीनचा ताबा घेऊं शकली. हिंदुस्थाननें या कम्युनिस्ट पक्षाला मान्यता दिली, कारण असंख्य जनता त्यांच्या मागें उभी होती. आमची वास्तववादी भूमिका जगांतल्या कांहीं देशांना आवडली नाहीं. लोकशाही–प्रधान हिंदुस्थान, साम्यवादी चीनला मान्यता देईल, त्यांचें घोडें युनोमध्यें नाचवील असें त्या राष्ट्रांना वाटलें नाहीं. पण हिंदुस्थाननें असें पाहिलें कीं, चीनमध्यें ज्या अर्थीं जनतेचें स्थायी: सरकार स्थापन झालें आहे, त्या अर्थीं तें साम्यवादी असलें तरी त्याला आपण मान्यता दिली पाहिजे. हिंदुस्थानांतील साम्यवादाचे जे कट्टे विरोधक होते, त्यांना जवाहरलालांचें हें करणें आवडत नव्हतें. पण ते गप्प बसले होते.

कम्युनिस्ट चीननें मात्र हिंदुस्थानबद्दल कृतज्ञता व्यक्त केली नाहीं. ते आम्हांला शिव्याच देत होते. आम्ही साम्यवादी कां होत नाहीं असा त्यांचा सवाल. पण आम्हांला साम्यवाद्यांचें तत्त्वज्ञान माहीत होतें. त्यांचा हिंसेवर असलेला विश्वास व धर्माबद्दलची त्यांची घृणा ही हिंदुस्थानच्या संस्कृतीला मानवणारी नव्हती. रशियानें केलेल्या अत्याचारी कृत्यांनीं आम्ही हादरून जात असूं. म. गांधी आमचे पुढारी होते. ते सत्य, प्रेम व अहिंसेचें तत्त्वज्ञान आम्हांला सांगत होते; सरकारविरुद्ध प्रतिकाराच्या चळवळी करीत होते. न्यायाकारितां व स्वातंत्र्याकरितां आत्मबलिदानहि केलें पाहिजे असें शिकवीत होते. गांधींच्या या नेतृत्वामुळें हिंदुस्थानांत साम्यवाद मूळ धरूं शकला नाहीं. १९१८ पासून हिंदुस्थानांत साम्यवादी, क्रांतीकारितां प्रयत्न करीत असत. पण हिंदुस्थानानें त्यांना कधीं थारा दिला नाहीं. ४४ वर्षें सतत प्रयत्न करून साम्यवादी हिंदुस्थानांत यशस्वी झाले नाहींत.

चीननें आमच्या पुढाऱ्यांना साम्राज्यशाहीच्या मागें धावणारीं कुत्रीं असें म्हटलें. १९४८ च्या हैद्राबाद पोलीस ॲक्शनला गोरगरीब जनतेवर केलेलें आक्रमण असेंहि संबोधलें. पण त्यांच्या शिव्याकडे आम्हीं दुर्लक्ष

केलें. आम्ही त्यांना कवटाळत होतों व ते आम्हांला लाथाडीत होते. माणुसकीचा अंशहि त्यांच्यांत नव्हता. आमची व त्यांची संस्कृति एक आहे असें आम्ही म्हणतों; पण तें खोटें आहे. त्यांना संस्कृति नाहीं व साम्यवादामुळें त्यांच्यांत नवी संस्कृति किंवा सभ्यता आली नाहीं. ते क्रूर आहेत, अमानुष आहेत असें आतां सिद्धच झालें आहे. मात्र चीनच्या जुन्या संस्कृतीबद्दल आम्ही कांहींहि म्हणत नाहीं.

श्री. जवाहरलालऐवजीं दुसरें नेतृत्व येथें असतें तर चीन हिंदुस्थान हे मागेंच एकमेकांचे शत्रु झाले असते. पण श्री. जवाहरलालजींची दृष्टि व्यापक, उदार व सभ्य आहे. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यानंतर त्यांना आशिया स्वतंत्र व्हावा, तेथें शांति नांदावी व तो आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावा असें वाटे. म्हणून पाश्चात्य राष्ट्रांचा राग सहन करूनहि त्यांनीं चीनला शत्रु मानला नाहीं. त्यांनीं चीनला जास्त जास्त जवळ आणण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न अयशस्वी झाला असला तरी तें धोरण व ती दृष्टि चुकीची नव्हती. आज साऱ्या आशियांतील व जगांतील राष्ट्रांची सहानुभूति आमचेकडे त्यामुळेंच नाहीं का ?

* * *

२

# कलहाची सुरुवात-तिबेट

ऑक्टोबर १९४९ मध्यें चीनचें प्रजासत्ताक स्थापन झालें. त्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत चीननें आपलें स्वरूप उघडें केलें. १९५० सालच्या एक जानेवारीला माओनें ३० लाख तिबेटी जनतेची साम्राज्यशाही आक्रमणापासून मुक्तता केल्याचें घोषित केलें. ही मुक्ततेची घोषणा होती, प्रत्यक्ष मुक्तता नव्हती.

तिबेट व चीनचे संबंध काय होते ह्यांत पडण्याचें आम्हांला कारण नव्हतें. लॉर्ड कर्झननें १९०४ सालीं तिबेटमध्यें कांहीं ढवळाढवळी केल्या होत्या; पण तो प्रयत्न यशस्वी झाला नव्हता. १९११ मध्यें तिबेटमध्यें क्रांति झाली व तिबेटनें स्वातंत्र्य पुकारलें. त्यानंतर चीननें तिबेटला चुचकारण्याचा प्रयत्न केला. १९१३-१४ ची सिमला परिषद त्याकरितांच होती. १९४२ सालीं दुसऱ्या जागतिक युद्धांत तिबेट तटस्थ राहिला. त्या वेळीं चीन व ब्रिटन हीं दोस्त राष्ट्रें होतीं. तिबेटनें त्या वेळीं या दोस्तांना मदत केली नाहींच; पण त्यांना आपल्या देशांत थाराहि दिला नाहीं. तो स्वतंत्र म्हणूनच राहिला होता. पण त्याला आपलें स्वातंत्र्य टिकवितां आलें नाहीं. ब्रिटिशांनीं तिबेटची १९११

सालची क्रांति व स्वातंत्र्य कुठें मान्य केलें होतें? चीन नेहमीं असें म्हणत होता कीं, तिबेट हा आमच्या साम्राज्यांतला देश आहे व आमचें अधिराज्य त्यावर आहे. पण तिबेट तसें समजत नव्हता. तो आपला देश स्वयंशासित आहे असें म्हणे.

माओनें जेव्हां तिबेटच्या मुक्तीची घोषणा केली, तेव्हां हिंदुस्थाननें एवढेंच म्हटलें कीं, तिबेटचा प्रश्न शांततेनें सुटला पाहिजे. हिंदुस्थाननें चीनच्या अधिराज्याच्या हक्काबद्दल आव्हान दिलें नाहीं; पण असें म्हटलें कीं जो तिबेट ४० वर्षें स्वयंशासित आहे, त्यानेंच आपलें भवितव्य ठरविलें पाहिजे. १३ ऑगस्ट १९५० रोजीं दिल्लीनें आपल्या सरहद्दीवर उफाळलेल्या अशांततेबद्दल काळजी व्यक्त केली. २१ ऑगस्टला चीननें तिबेटचा प्रश्न शांततेनें सोडविण्याचें कबूल केलें व हिंदुस्थान आणि चीनमधील सरहद्द कायम करावी अशीहि इच्छा व्यक्त केली. पण त्या पत्रावरील शाई वाळते न वाळते तोंच चिनी फौजा ७ ऑक्टोबरला तिबेटमध्यें घुसल्या. नेहरूंनीं जगाच्या शांततेकडे चीनचें लक्ष वेधलें. चीनला जागतिक शांततेचें सोयरसुतक नव्हतें. त्यांना यूनोमध्यें येण्याची उत्सुकता नव्हती. चीननें हिंदुस्थानच्या म्हणण्याचा योग्य विचार करण्याऐवजीं आम्हांलाच दोष दिला. चीनविरोधी परक्या राष्ट्रांची हिंदुस्थानला बाधा झाली आहे असा पहिला आरोप ह्या सभ्य व साम्यवादी राष्ट्रानें आमच्यावर केला !

नेहरूंना त्यामुळें आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, ‘कोणत्याहि राष्ट्रानें आपल्या नजीक नसलेल्या विभागावर आपलें अधिराज्य आहे किंवा सार्वभौमत्व आहे हें म्हणणें बरोबर नाहीं. तिबेट म्हणजे चीन नव्हे, त्यामुळें तिबेटची इच्छा निर्णायक आहे; कायदेशीर किंवा घटनात्मक युक्तिवाद निर्णायक नाहीं. तिबेटची जनता आपले हक्क प्रस्थापित करण्यास समर्थ आहे का नाहीं तो निराळा प्रश्न आहे. हें घडवून आण-

त्याची शक्ति हिंदुस्थानांत आहे का नाहीं हाहि निराळा प्रश्न आहे; पण जीं तत्त्वें चीन घोषित करतो व आम्ही उचलून धरतों, त्या तत्त्वाप्रमाणें शेवटचा शब्द तिबेटच्या जनतेचा, तिबेटसंबंधीं असला पाहिजे व इतर कोणाचाहि असतां कामा नये.' पण चीनच्या फौजा तिबेटमध्यें घुसल्या होत्या आणि तिबेट त्यांचा प्रतिकार करूं शकत नव्हता. नेहरूंना कोण विचारणार तेथें ? २३ मे १९५१ रोजीं तिबेटच्या पुढाऱ्यांनीं पेकिंगनें पुढें केलेल्या करारावर सह्या केल्या. शांततेनेंच त्यांनीं आपलें स्वतंत्र अस्तित्व समर्पण केलें !

चीन व हिंदुस्थानचा पहिला खटका उडाला तो तिबेटच्यामुळें, पण हिंदुस्थाननें तोहि अपमान गिळला व आपले मित्रत्वाचे संबंध अबाधित ठेवण्याचा प्रयत्न चालू ठेवला. त्या मित्रत्वाचे धिंडवडे उडतच होते. १९५० मध्यें कोरियांतील तेढ वाढत चालली. उत्तर कोरियावर संयुक्त राष्ट्रांनें जी कारवाई केली तिला हिंदुस्थाननें संमति दिली. चीनचें पित्त त्यामुळें खवळलें असेल; पण तें पित्त आम्हीं शमविलें. चीननें प्रतिकारा-करितां आपल्या फौजा जेव्हां कोरियांत पाठविल्या, तेव्हां आम्हीं चीनचा पक्ष घेतला. चीन हा आक्रमक आहे असा ठराव युनोंत आला असतां आम्ही चीनच्या धिक्काराविरुद्ध सभा गाजविली. चीन व अन्य राष्ट्रें यांच्या कलहांत हिंदुस्थान मध्यस्थी करीत असे. सप्टेंबर १९५१ मध्यें सॅनफ्रॅन्सिस्कोला एक बैठक झाली. ती बैठक जपानबरोबर शांततेच्या तहाकरितां होती. चीनला त्या बैठकीला निमंत्रण नसल्यामुळें तो गेला नाहीं व आम्हीहि चीन जात नाहीं म्हणून त्या बैठकीला गेलें नाहीं. आमच्या या मित्रराष्ट्राला युनोमध्यें प्रतिनिधित्व मिळावें म्हणून सालोसाल तेथें ठराव आणत होतों व सालोसाल तो फेटाळून लावला जात असे.

१९५१ सप्टेंबरपासून सुमारें दीड वर्षे चीन व हिंदुस्थान यांच्यांत विशेष कांहीं घडलें नाहीं. १९५२ साल तर अगदींच कोरें गेलें.

१९५३ च्या मे महिन्यांत कोरियन युद्धाचा शेवट झाला आणि त्या युद्धांतील बंदीचा निर्णय करण्याकरितां एक तटस्थ राष्ट्रांचें कमिशन नेमण्यांत आलें. त्या कमिशनचें अध्यक्षपद हिंदुस्थानला देण्यांत आलें. ही घटना ८ जूनला झाली. हिंदुस्थानला वाटलें कीं, चीन व हिंदुस्थानचे संबंध आतां चांगले सुधारतील व तीं दोन राष्ट्रें जगांत शांतता, सलोखा वगैरे निर्माण करूं शकतील.

३१ डिसेंबरला हिंदुस्थाननें तिबेटचा प्रश्न पेकिंगमध्यें उपस्थित केला. त्या दोन देशांमधील संबंध निश्चित ठरवावेत असा त्यांत हेतु होता. आपण जर उरलेले असले सर्व प्रश्न तडजोडीनें सोडविले तर चीन व हिंदुस्थानची मैत्री व सहकार्य दृढ होईल अशी त्यांत कल्पना होती. २९ एप्रिल १९५४ रोजीं भारत व तिबेटमधील व्यापार व दळणवळणविषयक संबंध याबद्दल चीन व भारत यांच्यांत करार झाला व ३ जूनला त्यावर सह्या झाल्या. ब्रिटिश सरकारला तिबेटमध्यें कांहीं विशेष हक्क होते. ते हक्क हिंदुस्थाननें सोडून दिले व तिबेट हा चीनचा भाग आहे असें कबूल केलें. हा करार ८ वर्षें अमलांत राहावयाचा होता. त्या करारांत व्यापारी संस्था, बाजार व तीर्थयात्रांचे रस्ते यांचा उल्लेख आहे. समान सरहद्दी-पलीकडे व्यापार व दळणवळणासंबंधीचे नियमहि त्यांत घातले गेले. त्या कराराच्या प्रास्ताविक भागांत सुप्रसिद्ध पंचशील तत्त्वें अंतर्भूत केलीं आहेत. चीन हा तिबेटचा भाग आहे असें कबूल करण्यांत आम्हीं चूक केली असें टीकाकार म्हणतात, पण ती चूक झाली असलीच तर मित्रत्वाच्या संबंधाकरितां झाली.

याटुंग व ग्यानत्सेमध्यें लष्करी मार्गदर्शक दल होतें तें काढून घेण्याचें, तिबेटमध्यें आमच्या पोस्ट, टेलिग्राफ व टेलिफोन कचेऱ्या होत्या, विश्राम-गृहें होतीं तींहि आम्ही चीनला मामुली किंमतीला देण्याबद्दलचे पत्र-व्यवहार झाले. अशा प्रकारें चीन व हिंदुस्थान यांच्यामधील वैराचे सर्व मुद्दे निकालांत निघाले असें वाटून आम्ही मोठ्या खुषींत होतों. पण

पुढील संकटापूर्वींची ती शांतता होती. तिबेट हा चीनचा भाग आहे असें आम्हीं कबूल केलें नसतें तर काय झालें असतें ? आम्ही तिबेट स्वतंत्र आहे असें म्हणत राहिलों असतों आणि तिबेट आपण चीनचे आहों असें मोठमोठ्यानें गर्जू लागला असता. तिबेटला वाचा फोडण्याची शक्ति चीनमध्यें होती. हिंदुस्थाननें तिबेट चीनचा भाग आहे असें कबूल केलें असलें तरी चीनच्या लष्करी शक्तीमुळें हें घडलें आहे याची जाणीव आम्हांला होती. तिबेट दुबळा होता आणि हिंदुस्थान तिबेटची लढाई लढण्याइतका सामर्थ्यवान नव्हता. त्याच्या उलट चीनमध्यें एक नवा जोम व नवी अभिलाषा निर्माण झाली होती. तिबेटच काय पण आशियांतील इतर सर्व देश हे निर्माल्यवत् करून टाकावेत अशीं स्वप्नें त्यांना पडूं लागलीं होतीं. युरोपमध्यें जसा रशिया, तसा आशियांत चीन झाला पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें. म्हणून पुढें त्यांनीं हिंदी मैत्रीचीं जीं नाटकें केलीं, तीं मनांत दुष्ट हेतु धरूनच केलीं. आम्ही आमच्या देशाची औद्योगिक वाढ व विकास कसा होईल यासंबंधीं नियोजनें करीत राहिलों. लष्करी वाढ व विकास करावा असें आमच्या मनांतहि आलें नाहीं. म्हणून चीनला शक्यतोंवर शत्रु बनूं देऊं नये या दिशेनें आम्हीं पावलें टाकलीं.

* * *

# ३

# रामायण का महाभारत ?

तिबेटचा प्रश्न निकालांत निघाल्यामुळें चीनभारताच्या मैत्रीला उधाण आलें. चौ एन् लाय हे २५ जूनला १९५४ ला दिल्लीला आले. त्यांचें भव्य स्वागत केलें गेलें. दोघां पंतप्रधानांचीं गोड गोड बोलणीं झालीं. २८ जूनला त्या भेटीचें निदर्शक म्हणून एक संयुक्त पत्रकहि काढलें गेलें. त्या पत्रकांत सुरुवातीला पंचशील तत्त्वांची पूजा करण्यांत आली. ( १ ) उभय देशांनीं एकमेकांची प्रादेशिक एकता व सार्वभौमत्व यांना मान्यता देणें, ( २ ) एकमेकांनीं दुसऱ्याच्या देशावर आक्रमण न करणें, ( ३ ) अंतर्गत बाबतींत हस्तक्षेप न करणें, ( ४ ) दोन्ही देश समान मानून त्यांच्या हिताकरितां झटणें व ( ५ ) शांततापूर्वक सहजीवन जगणें. ह्या तत्त्वांचा जर जगांतील अन्य देशांनीं अंगीकार केला तर जगांत शांति, सौख्य व समाधान नांदेल अशीहि आशा व्यक्त करण्यांत आली. या पंचशीलाच्या व सहजीवनाच्या तत्त्वावर पुढें अनेक राष्ट्रांनीं डोळे मिटून सह्या केल्या.

चौ एन् लाय हे मनांत कशी बनवाबनवी केली असें म्हणत चीनला परतले. तेथें गेल्यानंतर कांहीं आठवड्यांत त्यांनीं पंचशीलावर

पहिला निखारा ठेवला. बाराहोतीपासून त्यांनीं सुरुवात केली. बाराहोती हा आमचा आहे व तेथें हिंदी लष्कर आहे अशी त्यांनीं दिल्लीला तक्रार नोंदवली. १७ जुलै १९५४ रोजीं त्यांचा तक्रारखलिता आला. बाराहोतीला ते वूजे म्हणत व तो आपला आहे असें सांगत. हिंदुस्थानला वाटलें कीं, चीनची कांहीं तरी चुकीची समजूत झाली असावी. बाराहोती हा उत्तर प्रदेशांत असल्याची आमची खात्री होती. पण बाराहोतीवरील हक्क ही पुढील लढयाची सुरुवात आहे याची मात्र कल्पना आम्हांला नव्हती.

१९५४ जुलैपर्यंत हिंदुस्थानला आपल्या पारंपरिक व रूढ सरहद्दीबद्दल कांहीं तंटे असतील अशी कल्पनाहि नव्हती. २९ एप्रिल १९५४ रोजीं झालेल्या करारनाम्यांत चीननें प्रतिज्ञापूर्वक आमच्या सरहद्दीची एकता व सार्वभौमता मान्य केली होती. कारण त्याबद्दल त्यांनीं हरकतीचा शब्दहि उच्चारला नव्हता. म्हणून बाराहोतीबद्दल चीनला माहिती नाहीं असें आम्ही धरून चाललों. हिंदुस्थाननें चीनला उत्तर पाठविलें. आम्ही तिबेटच्या हद्दींत शिरलों नाहीं, बाराहोती ही नीति खिंडीच्या दक्षिणेला आहे व ती खिंड करारांत निर्दिष्ट केलेल्या सहा खिंडींपैकीं एक आहे व ती हिंदी हद्दींत आहे असें त्यांना कळविलें. त्यांत असेंहि म्हटलें कीं, चिनी लष्करी अधिकारी बाराहोतींत शिरत आहेत ह्याला आमची हरकत आहे.

ह्या बाराहोती प्रकरणानंतरहि हिंदुस्थाननें चीनमैत्रीबद्दलचा आपला हेका सोडला नाहीं. आमचे पंतप्रधान १८ ऑक्टोबर १९५४ रोजीं चीनला गेले. स्वागतसमारंभ झाले. बोलणीं झालीं, पण तीं मोकळ्या मानानें झालीं नाहींत. जवाहरलालजींनीं नुकत्याच प्रसिद्ध होत असलेल्या चिनी नकाशांचा प्रश्न काढला. ते सर्व नकाशे चुकीचे आहेत असें ते म्हणूं लागले. त्या नकाशांत हिंदुस्थानचा ५०,००० चौ. मैलांचा टापू चीनचा म्हणून दाखविला होता. हिंदुस्थानच्या सरहद्दी स्पष्ट आहेत

व तेथें कुठें शंकेला किंवा वादविवादाला जागा नाहीं असें ते म्हणाले. चौ एन् लायनें उत्तर दिलें कीं 'काय त्या नकाशाकडे पाहतां ? त्यांना महत्त्व तें काय ? अहो, ते कोमिंटांग राजवटींतील नकाशे आहेत. आमचें राज्य आल्यानंतर आम्ही ते वेळेच्या अभावीं दुरुस्त केले नाहींत.'

चौ एन् लायच्या पोटांत कांहीं पाप दडलेलें असेल अशी कल्पनाहि नव्हती. नेहरूंची ही औपचारिक भेट चीन व हिंदुस्थानांत गाजली व ती यशस्वी झाली असे नगारेहि वाजले. नेहरूंच्या भेटीनंतर आमच्या देशांतील शिष्टमंडळांची तेथें रीघ सुरू झाली. सांस्कृतिक शिष्टमंडळें, पार्लमेंट शिष्टमंडळें, व्यापारी, धंदेवाईक कारखानदार आणि इतर, चीनच्या तीर्थयात्रा करूं लागले. हिंदुस्थानांत परतल्यावर ते चीनच्या उत्कर्षाची व भरभराटीची इतकी तोंडभर स्तुति करूं लागले कीं, आम्हांला आमची लोकशाही ही कमी प्रतीची वाटूं लागली. ही शिष्टांची यात्रापर्वणी पुढें कांहीं वर्षें चालूं राहिली. चीन म्हणजे आधुनिक युगांतला स्वर्ग आहे असें ते जेव्हां सांगत, तेव्हां इतरांनाहि आपण त्या स्वर्गांत आरोहण करावें असें वाटे. पण चीन दाखवी तो खरा चीन नव्हता. खरा चीन निराळाच होता.

१९५५ च्या एप्रिलमध्यें भारत, पाकिस्तान, सिलोन, इंडोनेशिया व ब्रह्मदेश यांनीं पुढाकार घेऊन बांडुंग (इंडोनेशिया) येथें आफ्रिका व आशियांतील देशांची एक परिषद भरवली. त्या परिषदेंत चीन आला. २९ राष्ट्रें तेथें जमलीं. आफ्रिका व आशियांतील राष्ट्रांत प्रेम, सलोखा, सद्भाव यांची वृद्धि व्हावी याकरितां भरवलेल्या या परिषदेंत चीन मोठ्या उत्साहानें भाग घेत होता व सुरांत सूर मिळवीत होता. बांडुग परिषदेंत पेरलेल्या सद्भावनांच्या पिकाचा चीनवर काय परिणाम होणार ? तो नाटकच करीत होता. त्याचें साम्राज्यविस्ताराचें धोरण तो मोठ्या कौशल्यानें दडवून ठेवीत होता.

पण फार काळ त्याची ढोंगबाजी टिकली नाहीं. १९५५ च्या जून महिन्यांत चिनी सैन्य बाराहोतींत घुसलें व सप्टेंबरमध्यें नीति खिंडीच्या दक्षिणेला दहा मैलांवर असलेल्या दमझानला पोहोंचलें. त्यानंतर त्यांचीं आक्रमणें झपाटयानें सुरू झालीं. १९५६ च्या एप्रिलला ते निलांग भागांत शिरले. सप्टेंबरमध्यें शिपकी खिंडीच्या पलीकडे गेले. हिंदी शिपायांबरोबर त्यांच्या चकमकीहि होत, पण हिंदी फौजांनीं त्यांच्या बरोबर कधीं निकरानें लढाई दिली नाहीं. चीनकडून हें सर्व आक्रमण चुकीनें होत आहे असें आम्ही मानीत आलों व लढाईचें रान उठवूं नये म्हणून मामुली प्रतिकार करीत राहिलों. बाराहोतीला पहिलें चिनी आक्रमण झालें तेव्हांच जर आम्ही निकरानें प्रतिकार केला असता तर चीननें कदाचित् आमची भूमि भुसभुशीत आहे असें समजून पुढें पुढें शिरकाव केला नसता. पण आम्हांलाहि निकरावर गोष्टी आणावयाच्या नव्हत्या. हिंदुस्थाननें निषेध खलिते पाठविण्याचें सत्र मात्र सारखें सुरू ठेवलें होतें.

१९५६ च्या २८ नोव्हेंबरला चौ एन् लाय यांनीं भारताला भेट दिली. त्या वेळीं झालेल्या सरहद्दीविषयक प्रश्नासंबंधीं चौ म्हणाले कीं, सरहद्दीबद्दल भांडणें कुठें आहेत ? कांहीं किरकोळ बाबी आहेत, त्या उभय राष्ट्रांचे अधिकारी एकत्र बसून मिटवतील. ब्रह्मदेशाच्या सरहद्दीबाबत ते म्हणाले कीं, चीननें त्यांची सरहद्द मॅकमहोननें आंखल्याप्रमाणें मान्य केली आहे. हिंदुस्थान व चीनमधील मॅकमहोन रेषेबद्दल ते म्हणाले कीं, ती मान्य करावी असा आमचा इरादा आहे; पण आम्ही तिबेटच्या अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊं. याचा अर्थ जवाहरलालजींनीं असा केला कीं, चीन ती पारंपरिक रेषा मान्य करणार आहे. ब्रह्मदेशापुरती जर ती रेषा मान्य आहे, तर हिंदुस्थानपुरती कां असूं नये असा हा सरळ युक्तिवाद होता. जवाहरलालजींनीं १९५० मध्यें पार्लमेंटमध्यें विधान केलें होतें कीं, ' आमची पूर्व सरहद्द मॅकमहोन रेषा आहे. आम्ही कोणालाहि ती रेषा ओलांडून देणार नाहीं. ' चीननें त्या वेळीं आक्षेप

घेतला नाहीं व या भेटींतहि आम्ही ती रेषा मानीत नाहीं असें म्हटलें नव्हतें. पण चौचे शब्द मात्र सावधगिरीचे होते. 'The Chinese Govt. proposed to recognise' असे ते शब्द होते. तिबेटचा सल्ला घेणें हें केवळ बुजगावणें होतें. मॅकमहोन रेषेला मान्यता देण्याचें अगर न देण्याचें प्रकरण जवळ जवळ तीन वर्षें भिजत पडलें. तीन वर्षांनीं त्यांनीं नकारच दिला.

१९५७च्या ऑक्टोबरमध्यें चीनच्या सैन्याची तुकडी वालांगमध्यें शिरली. नेफामध्यें वालांग आहे. त्याच सालीं एक महत्त्वाची घटना घडली. चीननें तिबेट व सिंकिआंग यांना जोडणारा रस्ता बांधण्यास सुरुवात केली. तो अक्साई चीनमधून जात होता. चीनला निषेध खलिता पाठविण्यापूर्वीं खरा प्रकार काय आहे हें पाहण्याकरतां हिंदुस्थाननें दोन तुकड्या तेथें पाठविल्या. एक लष्करी तुकडी उत्तरेच्या रस्त्याला व पोलीस तुकडी दक्षिणेच्या रस्त्याला गेली. प्रवास लांबचा व खडतर होता. लष्करी तुकडी परत आली नाहीं व ती चीननें गिरफदार केली असली पाहिजे असें वाटूं लागलें. तें खरें होतें. ती तुकडी पकडली गेली पण मागाहून सोडली गेली. पोलीस तुकडीनें अहवाल दिला, त्यावरून तिबेट सिंकिआंगमधील रस्ता हिंदुस्थानच्या हद्दींत बांधला गेला आहे असें सिद्ध झालें.


ऑक्टोबर १९५८ मध्यें भारतानें निषेधपर खलिता पाठविला. पण त्याच्या अगोदर एप्रिल–मेमध्यें बाराहोतीबद्दल दिल्लीला उभय राष्ट्रांतील प्रतिनिधींची बैठक झाली. त्या बैठकींत असें ठरलें कीं, दोघांपैकीं कोणीहि तेथें लष्करी किंवा मुलकी अधिकारी पाठवूं नयेत. चीननें मुलकी अधिकारी आम्ही पाठवूं पण लष्करी अधिकारी पाठवणार नाहीं ही गोष्ट मान्य केली. तीं बोलणीं निरर्थक ठरलीं. चीनला वूजे कोठें आहे हेंहि सांगतां आलें नाहीं. त्या सालीं चीननें लडाखमधील खुर्नाक किल्ला, पूर्वेकडील लोहित विभाग व मध्य विभागांतील लापथाल व सांगचा माला यावर आक्रमणें केलीं.

१४ डिसेंबर १९५८ रोजीं जवाहरलालजींनीं हिंदी चिनी सरहद्दी-बद्दल एक लांबलचक पत्र चौला लिहिलें. त्या पत्रांत त्यांनीं चौबरोबर झालेल्या चर्चेचा वृतान्त वर्णन केला. मुख्यतः तो मॅकमहोन रेषेबद्दल होता. जवाहरलालजींनीं चीनमध्यें प्रकाशित होऊं लागलेले नकाशे हिंदुस्थानचे विभाग आपल्या हद्दींत कसे दाखविले आहेत याबद्दल तक्रार केली. असे चुकीचे नकाशे प्रसिद्ध झाल्यामुळें आमची व जगाची गोंधळांत पडल्यासारखी स्थिति होते असें त्यांनीं लिहिलें.

त्या पत्राला चौनें २३ जानेवारी १९५९ रोजीं उत्तर पाठविलें व तें धक्का देणारें होतें. १९५४ मध्यें सरहद्दीचा प्रश्न निघाला नव्हता हें त्यांनीं कबूल केलें. त्याचें कारण 'त्या सरहद्दी ठरविण्याला परिस्थिति पक्व झाली नव्हती. आणि आम्हांला त्या प्रश्नाचा अभ्यास करण्यास वेळहि नव्हता.' हें खरें असेल तर १९५४ च्या कोणत्या करारावर चीननें सही केली ?

चौ म्हणाले, 'हिंद व चीनची सरहद्द ही कधींहि खुणांनीं आंखली नव्हती व तिच्याबद्दल हक्कहि सांगितला नव्हता.' चौ एन् लाय पुढें म्हणतात, 'आमच्या देशांत सध्यां प्रसिद्ध होत असलेल्या नकाशांत, ज्या सरहद्दी दाखविल्या आहेत, त्या चिनी नकाशांत पूर्वीं कमींत कमी अनेक दशकें दाखविल्या गेलेल्या सरहद्दींना अनुसरून आहेत. सरहद्दीवरचा प्रश्न सोडविला गेला म्हणजे नकाशावर सरहद्दी दाखविण्याचा प्रश्नहि सुटेल. आमच्या सरकारनें पुनः पुनः सांगितलें आहे कीं, सरहद्दी ठरविविण्याकरितां सर्वे केला पाहिजे व आपसांत विचारविनिमय केला पाहिजे.'

चौच्या म्हणण्यावरून अनेक शतकें मान्य केलेल्या पारंपरिक सरहद्दी त्यांनीं लाथाडून लावल्या असें सिद्ध झालें. त्यांनीं १९५४ चा करार अमान्य केला, एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या ५०,००० चौ. मैल प्रदेशावर हक्क सांगितला !




चीननें जून १९५५ पासून १२ जुलै १९६२ पर्यंत भारताच्या उत्तर सीमेवरील जीं ३० ठाणीं काबीज केलीं तीं वरील नकाशांत दाखविलीं आहेत. पहिलें ठिकाण उत्तर प्रदेशांतील बाराहोती हें असून ३० वें लडाखमधील चिपचॅप आहे.

पूर म्हणजे तेजपूर म्हणत. भागवत व विष्णु पुराणांत बाणाचा पराभव कृष्णानें तेजपूरला केला असें म्हटलें आहे. बाणाचा नातू भालुक म्हणून होता. त्यानें बालिपाराजवळ आपलें राज्य स्थापिलें. आका टेकड्यांच्या पायथ्याशीं हें राज्य होतें. आका टेकड्यांतील आदिवासी आपला मूळ पुरुष भालुक होता असें मानतात.

कांहीं काळानंतर प्रागज्योतिष, सोनितपूर व इतर विभागांचें कामरूपच्या राजांच्या स्वामित्वाखालीं एक राज्य झालें. कामरूप राज्यांची सीमा गोहत्तीच्या कामाख्येच्या देवालयापासून चहूंकडे १०० योजनें (४५० मैल) होती असें विष्णुपुराणांत म्हटलें आहे. हुएनसँग हा चिनी प्रवासी इ. स. ६४० मध्यें तेथें गेला होता. तो म्हणतो, कामरूपचें राज्य हिंदूंचें होतें व त्याचा परिघ १०००० लि किंवा १६६७ चौ. मैल होता. आठव्या शतकापर्यंत तेथें अनेक राज्यें झालीं. इ. स. १२२८ मध्यें अहोमनें तेथें सत्ता स्थापन केली.

अशा प्रकारें संस्कृत वाङ्मयांतहि असेच पुरावे सांपडतात. पण चीनला त्याचें काय? त्याला इतिहास किंवा भूगोल मान्य नाहीं.

पण या सर्वांत आणखी एक पुरावा महत्त्वाचा आहे. या भागांत कायदे, कानू कोणाचे होते? ब्रिटिशांनीं हिंदी कायदेमंडळांत या विभागाला लागू होणारे कायदे १८७३, १८८४, १९१४, १९१९, १९२८, १९२९ या वर्षीं पास केले. १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टमध्यें या भागाचा अंतर्भाव हिंदुस्थानांत केला आहे. १९५० च्या स्वतंत्र हिंदुस्थानच्या घटना कायद्यांतहि तोच उल्लेख आहे. चीनच्या कायद्यांत हा भाग आपला आहे असा एक तरी उल्लेख आहे का? त्यांचे पोलीस, मुलकी अधिकारी तेथें कधीं तरी गेले होते तरी का?

* * *

५

# मध्य विभाग

मध्य विभाग जम्मू काश्मीर, तिबेट व पंजाब ह्या तीन राज्यांच्या सरहद्दी जेथें मिळतात तेथून सुरू होतो व उत्तर प्रदेश, नेपाळ व चीनच्या सरहद्दीवर संपतो. ह्या विभागांतील आमच्या सरहद्दी चीनच्या सरहद्दीबरोबर जवळजवळ जुळतात. त्यामुळें ह्या सरहद्दीबद्दल चीन भांडणें उत्पन्न करील अशी कल्पना नव्हती. पण चीनचें धोरण मोक्याच्या व राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या जागा बळकावयाच्या असल्यामुळें त्यांनीं याहि भागांत भांडणें सुरू केलीं. चार भागांत आपल्या व हिंदच्या सरहद्दी जुळत नाहींत असें त्यांनीं प्रतिपादन केलें. हें व अन्य प्रतिपादनें जेव्हां त्यांचे व आमचे प्रतिनिधि तडजोडीकरितां बसले तेव्हांपासून सुरू झालीं.

भांडणाचे चार भाग (१) स्पिती, (२) शिपकी खिंड, (३) निलांग झडांग व (४) बाराहोती, संगचामला व लापथाल हे आहेत. हिंदुस्थानवरील पहिल्या आक्रमणाला सुरुवात जी झाली ती बाराहोतीपासून झाली. जून १९५५ मध्यें त्यांनीं पहिला हल्ला बाराहोतीवर चढविला.

हिंदुस्थान सरकारनें २८ जूनला निषेध खलिता पाठविला. पहिल्या आक्रमणाला ७॥ वर्षांपूर्वीच सुरुवात झाली व तेव्हांपासून त्यांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानवर होत आहेत ! आम्हीं फक्त निषेध खलिते पाठविले.

ह्या चारहि विभागांच्या मालकीबद्दल निःसंदिग्ध पुरावे आहेत. पण चीन थोडेच ते पुरावे मानणार आहे ? स्पिती विभाग आपण प्रथम विचारार्थ घेऊं. ह्या विभागाचा पूर्वापार इतिहास उपलब्ध आहे. तेथें हिंदु राजे राज्य करीत. ते आपल्या नांवापुढें 'सेन' असें लावीत. समुद्रसेन, राजेंद्रसेन, चेतसेन वगैरे राजे तेथें होऊन गेले. या विभागांचें हस्तांतर बरेच वेळां झालें. कांहीं शतकांनंतर स्पिती हा लडाखला जोडला गेला. १० व्या शतकांत तो लडाखपासून तोडला गेला. पुनः स्पिती लडाखला जोडण्यांत आला. १७ व्या शतकांत तिबेटनें तो विभाग जिंकला, पण तिबेटच्या सेनापतीच्या मुलीचें लग्न स्पितीच्या राजाबरोबर झाल्यानंतर 'स्पिती' हा हुंडा किंवा वरदक्षिणा म्हणून, स्पितीच्या राजाला देण्यांत आला. तेव्हांपासून स्पिती हिंदुस्थानांत होता व आहेहि. यानंतरचा स्पितीचा इतिहास, तो कधीं तिबेटमध्यें होता असें दाखवीत नाहीं. १८४६ च्या पहिल्या शीख युद्धांत ब्रिटिशांनीं तो जिल्हा खरेदी केला. स्पितीच नव्हे पण बिआस व सिंधु नद्यांमधील सर्व प्रदेश ईस्ट इंडिया कंपनीनें १ कोटी रुपयांस खरेदी केला. पण ईस्ट इंडिया कंपनीला तेथें राज्य करणें अशक्य झालें म्हणून म्हणा किंवा अन्य कारणामुळें म्हणा, त्यांनीं विकत घेतलेला हा भाग काश्मिर राजाला अमृतसर तहान्वयें परत केला. फक्त स्पिती व लाहूल आपल्याकडे ठेवलें. त्याला राजकीय कारणें होतीं. तेव्हां स्पिती व तिबेटमधील सरहद्द ही परंपरेची, वहिवाटीची व ऐतिहासिक घडामोडीनंतर निश्चित केलेली सरहद्द होती. त्याबद्दल तिबेटनें कधींहि तक्रार केली नाहीं. त्या विभागांत प्रवास करून गेलेले परक्या राष्ट्रांतील प्रवासी हा भाग हिंदुस्थानचा आहे असें म्हणत आले आहेत. त्यांनीं व इतरांनीं काढलेल्या

नकाशांत स्पिती हा हिंदुस्थानांत दाखविला आहे. ब्रिटिश नकाशांप्रमाणेंच रशिया व चीनच्या नकाशांत सुद्धां स्पिती हिंदुस्थानांत दाखविला आहे. चीनचा अगदीं अलीकडचा म्हणजे १९४७ चा नकाशा हेंच दाखवितो. चीनचे सध्यांचे अधिकारी, आपले पूर्वींचे नकाशे हे भिन्न राजवटींत आहेत असें म्हणून तेहि नकाशे नाकारूं लागले आहेत. अशा आक्रमणांना तडजोडीच्या बोलण्यांत काय उत्तर देणार ? स्पितीसंबधींचा एक तहनामा १६८४ मध्यें झाला व त्याला १८४२ मध्यें मान्यताहि मिळाली.

दुसरा आक्रमलेला भाग शिपकी खिंडीचा. १ व २० सप्टेंबर १९५६ या दोन तारखांना चीननें शिपकी खिंडीवर आक्रमण केलें व ती खिंड जिंकली. आम्हीं फक्त निषेध खलिता पाठविला. शिपकी खिंड ही बशाहर व गुजे या राज्यांत आहे. बशाहरचें राज्य म्हणजे हिमाचल प्रदेशाचें राज्य. गुजे हा तिबेटचा भाग आहे. ब्रिटिश व अन्य प्रवाशांनीं त्याबद्दलचे निःसंदिग्ध नकाशे काढले आहेत. चीननें १९५७ पर्यंत काढलेल्या नकाशांत शिपकी खिंड हिंदुस्थानांत दाखविली आहे. चीन सरकार अर्थातच स्वतःचेहि नकाशे मानीत नाहीं ! ते नकाशे खासगी आहेत असें त्यांचें म्हणणें. अशा या उर्मट व असत्यवादी सरकारबरोबर तडजोड कसली करणार ? ज्यांना स्वतःच्या नकाशांची चाड व प्रतिष्ठा नाहीं, त्यांच्या बरोबर युद्धानेंच का आम्ही तडजोडी करणार ?

तिसरा भाग निलांग झडांगचा. तिबेट व हा भाग पाणवहाळांनीं स्पष्टपणें विभागलेला आहे. चीननें हा भाग आपला आहे असें दाखविण्या-करितां तिबेटचे धर्मग्रंथ हजर केले, पण आम्ही जेव्हां आमचे ग्रंथ पुढें करूं लागलों तेव्हां त्याला हरकत घेतली. आमचीं पुराणें व धर्मग्रंथ हे तिबेटच्या धार्मिक साहित्यापेक्षां जास्त विश्वसनीय आहेत असें जगांतले विद्वान् म्हणतात. स्कंद पुराणांत भौगोलिक दृष्ट्या निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांची नोंद केली आहे. तीं सारीं क्षेत्रें आमच्या हद्दींतलीं आहेत.

इतिहासानें हीच गोष्ट सिद्ध होते. तिसऱ्या शतकापासूनचा इतिहास उपलब्ध आहे. तो इतिहासहि आमच्या म्हणण्याला दुजोरा देतो.

१९२१ ते १९२८ च्या दरम्यान ह्या विभागाच्या सरहद्दीबद्दल हिंदुस्थान व तिबेटमध्यें चर्चा झाली. ह्या चर्चेंत टेहरी संस्थाननें १७ व्या शतकापासूनचे पुराव्याचे भारे पुढें मांडले. त्या पुराव्यावरून हा भाग टेहरी संस्थानचा होता असें सिद्ध होतें. तिबेटनें त्या वेळीं एकच पुरावा मांडला होता. निलांग झडांगचे व्यापारी जेव्हां व्यापाराकरितां तिबेटमध्यें जात त्या वेळीं त्यांच्याकडून व्यापार करण्याकरितां घेतलेला पैसा हा कर आहे व ज्या अर्थी ते कर देतात त्या अर्थी ते आमचे प्रजाजन आहेत असें तिबेट म्हणूं लागला. तुमच्या पुस्तकांत तुम्हीं काय लिहितां हें आमच्यावर बंधनकारक कसें ? टेहरी संस्थाननें तिबेट व टेहरीमधील सरहद्दीची अत्यंत अचुक अशी माहिती दिली व तिबेटचें कर प्रकरण खोटें ठरविलें. गुमगुमचा एकच पूल ब्रिटिशांनीं कटकटी टाळण्याकरितां सोडला; पण तिबेटचें स्वामित्व मान्य करून सोडला नाहीं. निलांग झडांगचे व्यापारी जेव्हां तिबेटमध्यें जात तेव्हां व्यापाराकरितां घेतलेला पैसा हा शेतसारा आहे असें म्हणण्याची सक्ती त्यांच्यावर होई. त्या व्यापाऱ्यांचा तिबेटच्या अधिकाऱ्यांकडून या मान्यतेकरितां इतका छळ झाला कीं, त्यांनीं तिबेटमध्यें व्यापार करणें सोडून दिलें. तेव्हां १९२१ ते १९२८ च्या दरम्यान झालेल्या या चर्चेंत निलांग झडांग हा तिबेटचा आहे असें सिद्ध झालें नाहीं.

चवथा भाग बाराहोती, सांगचामला व लपथालचा. १८ जुलै १९६० रोजीं पेकिंग येथें दोन्ही देशांतील अधिकाऱ्यांची १९ वी बैठक झाली. या बैठकींत चीननें एक नवा पवित्राच घेतला. ते त्या वेळेपर्यंत हे तीन विभाग निरानिराळे आहेत असें म्हणत होते; पण पेकिंगच्या बैठकींत ते भाग संलग्न आहेत व आमचे आहेत असा नवाच हक्क त्यांनीं सांगितला. याचा अर्थ त्या

तीन विभागांच्या दरम्यान असलेली हिंदुस्थानची म्हणून त्यांनीं पूर्वीं मान्य केलेली ३०० चौ. मैलांची भूमि आपलीच आहे असें ते म्हणूं लागले. १९५८ च्या बाराहोतीला झालेल्या परिषदेंत चीननें सांगचामला व लापथालवर हक्क सांगितला नव्हता. फक्त बाराहोती किंवा वूजेवर ते हक्क सांगत. पण १९६० मध्यें ते बदलले. बाराहोती हें एक गांव आहे, तो विभाग नाहीं असेंहि ते म्हणाले होते.

निलांग झडांग हा उत्तर काशी जिल्ह्यांत, बाराहोती गढवाल जिल्ह्यांत, व सांगचामला व लपथाल हे आल्मोडा जिल्ह्यांत आहेत. हे चारहि विभाग आजच्या उत्तर प्रदेशांत आहेत. हिंदूंचीं तेथें पवित्र तीर्थ–क्षेत्रें आहेत. टेहरी गढवाल, गढवाल व आल्मोडा हीं केदार क्षेत्रांत असलेलीं ठिकाणें आहेत. ब्रह्मपुरा, कुमाऊन व गढवाल येथें हिंदु राज्यें होतीं. स्कंद पुराणांतील केदार खंडांत असें म्हटलें आहे कीं, ‘ हें केदारक्षेत्र परमेश्वरा-इतकें पुरातन आहे. सर्व तीर्थक्षेत्रांत हें श्रेष्ठ आहे व येथें निसर्ग साक्षात् उभा आहे. जगांतील सर्व तीर्थांचा येथें समुच्चय झाला आहे. ह्या पवित्र क्षेत्राची बरोबरी करील असा एकहि भाग पृथ्वीवर नाहीं. ’ या क्षेत्राच्या चतुःसीमा हिमालय उत्तरेस, गंगाद्वार ( हरिद्वार ) दक्षिणेस, कालिंदी ( शारदा ) पूर्वेस व यमुना पश्चिमेस अशा वर्णिल्या आहेत. भागीरथी, मंदाकिनी, अलकनंदा, जढगंगा, वगैरे नद्यांचीं वर्णनें त्यांत आहेत व त्या सर्व गंगेच्या उपनद्या आहेत असें म्हटलें आहे.

गंगेला शिवानें आपल्या जटेंत धारण केलें होतें. भगीरथानें ती नदी पृथ्वीवर आणली. निलांग झडांग हे जढगंगेच्या तीरावर आहेत. जन्हूनें एकदां यज्ञ आरंभिला. त्याला गंगेनें सर्व प्रदेश भरून टाकलेला आढळला. तो क्रुद्ध झाला. त्यानें गंगा प्राशन केली. देव भयभीत झाले. त्यांनीं मध्यस्थी केली व जन्हूनें गंगेला आपली कन्या म्हणून मानली व तिला मुक्त केलें. जान्हवी म्हणून ती प्रसिद्धीला आली.

ह्या पुराणांतील वर्णनावरून गंगा, तिच्या उपनद्या व गंगेचीं उगमस्थानें सारीं हिंदुस्थानांतलीं ठरतात. आम्ही स्कंद पुराण अधिकृत मानतों. पण फक्त पुराणावर आमचा भर नाहीं. तेथील राजांची अखंड अशी परंपरा आहे, प्रवासवर्णनें आहेत, नकाशे आहेत व तह, करार-नामे सर्व कांहीं आहे;पण चीनला हें कांहींच मान्य नाहीं. त्यांना स्वतःचे नकाशेहि मान्य नाहींत. १८४० सालीं वॅगनें प्रसिद्ध केलेल्या व सुधारलेल्या नकाशांत गंगेचें सर्व खोरें हिंदुस्थानांत दाखविलें आहे. १९१७ सालीं 'न्यू ॲटलास ऑफ चायना' ह्या शांघायला प्रसिद्ध केलेल्या नकाशांत सतलज व गंगा या नद्यांतील पाणवहाळाचा प्रदेश हिंदुस्थानचा म्हणून दाखविला आहे. निति व वालचा धोरा ह्या सर-हद्दीवरील खिंडी आमच्या म्हणून दाखविल्या आहेत. पण याशिवाय ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन वगैरे देशांतील नकाशांत हेच विभाग हिंदुस्थानचे म्हणून दाखविले आहेत. पण हे नकाशे पाहायला जो चीन तयार नाहीं, तो तें मानणार कसे ?

बाराहोतीची सरहद्द तिबेट व हिंदुस्थाननें १८८९-९० मध्यें ठरविली व १९१४ मध्यें तिला मान्यताहि मिळाली. पण चीनच्या सर-हद्दी सारख्या पुढें पुढें सरकत असतात व आजची सरहद्द त्यांना दुसऱ्या दिवशीं मान्य होत नसते.

चीननें सांगचामला व लपथालवर १९५८ मध्यें आक्रमण केलें. निलांगवर त्यापूर्वीच म्हणजे एप्रिल १९५६ मध्यें आक्रमण केलें होतें. ते तडजोडीच्या निकालाची कधीं वाट पाहात नसतात. त्यांना वाटेल त्या वेळीं त्यांचीं सैन्यें हव्या असलेल्या प्रदेशांत घुसवतात. असा आमचा पूर्वीचा भाई व आतांचा वैरी आहे.

मध्य विभागांत असलेल्या स्पिती, शिपची खिंड, निलांग, झडांग, बाराहोती, सांगचामला व लपथाल यांच्यावर चीन अनधिकारानें हक्क

सांगत आहे. त्यापैकीं एकहि विभाग आपला आहे हें तो सिद्ध करूं शकला नाहीं. उत्तर काशी, अल्मोडा, गढवाल वगैरे उत्तर प्रदेशांतील जिल्ह्यांत आमची सत्ता ही काय स्वातंत्र्यानंतर स्थापन झाली ? चीन किंवा तिबेटनें कधीं त्याबद्दल तक्रार तरी केली होती ? त्यांचा एखादा तरी पोलीस तेथें होता ? त्यांचा एखादा तरी कायदा या विभागांना अनुलक्षून केला होता ? उलट आमचा राज्यकारभार तेथें शतकानुशतकें चालू आहे. हिंदुस्थानला गंगा नदी पवित्र वाटते. तिच्या कांठचीं तीर्थ-क्षेत्रें आम्ही शतकानुशतकें पूज्य स्थानें मानीत आलों आहों. त्यावर जर चीन नव्यानें हक्क सांगूं लागला तर तें कोण व कां सहन करील ?

* * *

# ६

# पश्चिम विभाग

## लडाख

लडाखला चालू लढ्यांत अत्यंत महत्त्व प्राप्त झालें आहे. तो भाग राजकीय दृष्ट्या व लष्करी दृष्ट्या चीनला अत्यंत महत्त्वाचा वाटतो. चीननें अलीकडेच तिबेट जिंकला आणि सिंकिआंग रशियाकडून घेतला. तिबेट व सिंकिआंगला जोडणारा भाग जर चीनच्या ताब्यांत नसेल तर त्यांची मोठी अडचण होईल. सिंकिआंगमध्यें त्यांना जाणें येणेंहि अशक्य होईल. पण त्याला आमचा इलाज काय ? तिबेट व सिंकिआंग मध्यें लडाख आहे. तो आपला आहे असें चीन म्हणूं लागला. १९५० सालीं आमची फौज सिंकिआंगमधून लडाखच्या वाटेनें तिबेटला गेली होती व ज्या अर्थी त्या वाटेनें आमची फौज गेली, त्या अर्थी लडाख आमचा आहे असें त्यांचें अजब तर्कशास्त्र आहे. अगदीं अलीकडे म्हणजे नोव्हेंबरमध्यें सिकिममध्यें त्या वेळीं असलेल्या आपल्या वकिलानें असें जाहीर केलें कीं, सिंकिआंगमधून लडाखच्या वाटेनें चीनची फौज गेली हें धडधडीत खोटें विधान आहे. पण चीनची फौज लडाखच्या वाटेनें गेली असली तरी त्याचा अर्थ तो भाग चीनचा आहे असें कसें सिद्ध होतें ? लडाखचा उत्तर भाग इतका दूर व निर्मनुष्य आहे कीं, तेथील बातम्या यावयास साधनें नाहींत आणि बातम्या आल्या तरी

असल्या दरोडेखोरीचा बंदोबस्त करणें कठीण असतें. पण चीनची फौज त्या रस्त्यानें गेल्याची बातमीहि आली नाहीं; तेव्हां त्यांच्या फौजा त्या रस्त्यानें गेल्या नव्हत्या हें सत्य आहे. या लष्करी फौजांच्या वाटचालीशिवाय चीनजवळ लडाख आपला आहे असें दाखविण्यास पुरावा नाहीं.

पण एकदां भांडणें सुरू झालीं म्हणजे सारे कागदपत्र, नकाशे, परंपरा, इतिहास वगैरे धुंडाळावे लागतात व पुरावे सादर करावे लागतात. हिंदुस्थाननें हे पुरावे देण्यांत शर्थ केली असें म्हणावें लागतें. आमच्या अधिकाऱ्यांनीं इतके अचुक व असंख्य पुरावे संशोधन करून गोळा केले आहेत कीं, त्या अधिकाऱ्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडे आहेत. पण हा सारा खटाटोप, पालथ्या घड्यावर पाणी ओतण्याइतका, निरर्थक आहे. चीनला बळजबरीनें लडाख घ्यावयाचा असल्यामुळें त्यांना या पुराव्याची किंमत नाहीं. १० ते २० हजार फूट उंचीच्या त्या पर्वतावर सरहद्दी आंखणें सोपें नाहीं. पण खिंडी, दऱ्या, नद्या, ओढे पायाखालीं तुडवून पूर्वींच्या संशोधकांनीं स्पष्टपणें सरहद्दी निश्चित केल्या. चीन विचारतो, पण तेथें हद्दीचे दगड तुम्ही बसवले नाहींत आणि बसवले असते तर ते तुम्हीं खोटेच बसविले असें म्हटलें असतें. सरहद्दी ठरविण्याची कांहीं एक जागतिक तत्त्वें आहेत व तीं तत्त्वें आंतरराष्ट्रीय व्यवहारांत मान्य करण्यांत आलीं आहेत. प्रत्यक्ष जागेवर तटबंदी केल्या नसल्या तरी नकाशांत सरहद्दी दाखविल्या आहेत, त्यांचे अक्षांश रेखांश विद्यमान आहेत. हें कांहींच जर चीन पाहणार नसला आणि तोफा, बंदुका घेऊनच तडजोडीला बसा असें दडपण आणीत असला तर त्यानें तडजोड होणार नाहीं, युद्धच होईल. तथापि चीनकरितां नसलें तरी जगाकरितां व हिंदी प्रजेकरितां हा सर्व पुरावा आवश्यक आहे. तेव्हां सरकारनें संग्रहित केलेल्या पुराव्याच्या आधारें ह्या प्रश्नाचा परामर्ष घेऊं.

× × × ×

लडाख हें एके काळीं स्वतंत्र राज्य होतें. शाक्यकुलोत्पन्न राजे तेथें राज्य करीत. लडाखमध्यें पाश्चिम तिबेटचा समाविष्ट झालेला भाग राजघराण्यांतील वांटण्यांत अलग झाला. १० व्या शतकांत ही वांटणी झाली व तेव्हांपासून तिबेट व लडाखच्या सरहद्दी ठरल्या. लडाखच्या राजघराण्याचा दोन कालखंडांचा इतिहास दोन खंडांत तयार केला गेला. पहिला भाग १६१० ते १६४० मधला व दुसरा १७ व्या शतकाच्या अखेरीचा .पूर्वीच्या स्वीड इडा या राजानें आपलें राज्य तीन मुलांत वांटलें, थोरल्या मुलाला मारयुल म्हणजे लडाख दिला. त्याचा अर्थ उतरणीवरचा प्रदेश असा आहे. ज्या मुलाला लडाख दिला, त्या लडाखच्या चतुःसीमाहि त्याच वेळीं निश्चित केलेल्या होत्या. त्यांत डेमचॉक, हानले वगैरे भाग अंतर्भूत होते.

लडाखच्या इतिहासाच्या दुसऱ्या खंडांत १६८१ ते १६८३ मध्यें झालेल्या एका युद्धाचा इतिहास आहे. मंगोल व तिबेटी लोकांच्या फौजांनीं लडाखवर स्वारी केली. त्या स्वारीचा बीमोड लडाखनें केला व त्याकरितां काश्मीरच्या मोगल सुभेदाराची मदत घेतली. त्याचा परिणाम असा झाला कीं, लडाख मोगल साम्राज्याचा एक भाग बनला. त्या युद्धानंतर ज्या सरहद्दी ठरल्या, त्यांत लडाखची सरहद्द डेमचॉकच्या पूर्वेकडे पसरली आहे असें म्हटलें. डेमचॉक लडाखचा व टाशिगाँग हा चीनचा असाहि एक प्रवासकर्ता म्हणाला. पण १८४६ सालीं कनिंगहॅम हा ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकारी तेथें गेला व १८५४ मध्यें त्यानें लडाखवर पुस्तक लिहिलें. ह्या पुस्तकाला चौ एन् लायनें मान्यता दिली. कनिंगहॅम लिहितो रुडॉक पूर्वेला आहे व तेथें दीर्घकाल शांतता आहे. सोकपो किंवा मंगोल लुटारूंना १६८७ मध्यें हद्दपार केल्यावर लडाखची पूर्व सरहद्द दगडाच्या दरडी रचून निश्चित केली. खुद्द चीननें त्या सरहद्दीबद्दल कधीं प्रश्न निर्माण केला नाहीं. १८४६ मध्यें

ब्रिटिशांनीं शंकेला जागा नको म्हणून चीन सरकारला तिबेट व लडाखच्या सरहद्दीबद्दल पत्रें लिहिलीं. चिनी बादशहाच्या अनुमतीनें कमिशनरकडून उत्तर आलें. त्यांत पुढील वाक्य आहे:–'Since however that territory had its ancient frontier, it was needless to establish any other. चीन सरकारनें तिबेट–लडाखच्या सरहद्दी पूर्वापार चालत आलेल्या आहेत व नव्या सरहद्दीचा प्रश्न उद्भवत नाहीं असें म्हटल्यावर आणखी कोणते पुरावे हवेत ? पण सध्यांचें चीन सरकार आपल्या पूर्वजांना कोठें मानतें ?

१८७३ मध्यें नैनसिंग हा हिंदी प्रवाशी लेह ते ल्हासाला प्रवास करून आला. त्यानें १८७७ मध्यें आपलें प्रवासवर्णन रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीच्या नियतकालिकांत प्रसिद्ध केलें. नैनसिंग म्हणतो, निआगझु रवांग ह्या ओढ्यानें तिबेट व लडाखच्या सीमारेषा विभक्त होतात. त्या ओढ्याच्या उजव्या कांठचा भाग लडाखचा व डाव्या कांठचा तिबेटचा. वेल्बी नांवाचा प्रवासी तेथें जाऊन आला. त्यानेंहि १८९८ सालीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत नैनसिंगच्या म्हणण्याला दुजोरा दिला आहे. लडाख व चीनची सरहद्द आणखीहि आहे. प्रत्येक ठिकाणाबद्दल चीन तक्रारी करीत आहे. डेमचॉकबद्दल आपण पुरावे पाहिले. आतां उत्तरेकडचा प्रदेश पाहूं. ही सरहद्द पुढें लनाक खिंडीजवळ येते. चँग चेनमो दरीच्या शिखरावर लनाक खिंड संपते. तेथून उतार सुरू होतो. उताराकडचा भाग हा तिबेटचा आहे. लनाक खिंडीच्या टोंकापर्यंतचा भाग लडाखचा. यासंबंधी कॅरी, बॉअर, वेल्बी, डीसी, वगैरेंनीं पुरावे दिले आहेत व ते सर्व पुरावे हिंदुस्थान म्हणतो त्याला पाठिंबा देणारे आहेत. त्यांनीं दिलेल्या पुराव्यांवरून जुन्या गोष्टीच सिद्ध होतात.

डेमचॉक व लानला खिंडीपर्यंतच्या सरहद्दीबद्दल आमच्या दृष्टीनें कोठेंहि संशयाला जागा नाहीं. त्यानंतर लडाखची उत्तरेकडील दुसरी सरहद्द. ही सरहद्द काराकोरम खिंडीपासून सुरू होते व अक्साई चीनच्या उत्तरेकडून

लानला खिंडीपर्यंत खालीं उतरते. तेवढया भागाचाविचार केला म्हणजे लडाखच्या सरहद्दीचा प्रश्न संपतो. तेव्हां आपण त्या सरहद्दीचा विचार करूं. तेथें सिंकिआंगची सरहद्द येते.

ही सरहद्द जी आम्ही मानतों, ती एका तत्त्वाला अनुसरून मानतों. नदीचें पाणी जेथें दोन दिशांनीं वाहतें, तो वहाळ सरहद्दी निश्चित करीत असतो. काराकोरम खिंडीपासून ही सरहद्द सुरू होते. शायॉक व यारकंद या नद्यांच्यामधील प्रदेशांवरून ही सरहद्द ठरते. शायॉक नदी ही सिंधूची व यारकंद ही खोतम तरिम या नद्यांच्या विस्तारामधील नदी आहे.वहाब यारकंद नदीच्या विस्तारांत जिल्गा व चिब्रा नद्या आहेत. त्यांचें पाणी जेथें विभागतें त्याला अनुसरून ही रेषा ठरते. तिची पूर्व रेषा जेथें काराकाश नदीचें पाणी उतरतें तेथपर्यंत म्हणजे हाजीलंगरच्या बाकापर्यंत चिपचॅप नदी शायॉक नदीला मिळते व तिच्या उपनद्या काराकाश नदीला मिळतात, त्या हाजिलंगरच्या खालच्या भागापर्यंत येतात. याचा सारांश असा—आमची सरहद्द काराकोरम खिंडींतून जी सुरू होते, ती प्रथम हाजीलंगरपर्यंत येते. त्या सरहद्दीच्या रेषा उत्तरेकडून यारकंद नदीच्या पात्रावरून व खालून शायॉक नदीच्या पात्राला अनुसरून ठरविल्या. ह्या दोन्ही नद्यांचें पाणी हाजीलंगरला मिळतें. त्यावरून उत्तर सरहद्दीपैकीं काराकोरम ते हाजीलंगरचा भाग निश्चित होतो.

आतां हाजीलंगरनंतर ती सरहद्द कशी कशी जाते तें पाहूं. हाजीलंगरपर्यंत चीननें अक्साई चीन रस्ता बांधला आहे. तेथून आमची सरहद्द वर कुएनलुन पर्वताच्या एका सुळक्यापर्यंत वर जाते. काराकाश नदी ओलांडून ही रेषा जाते. त्याचे रेखांश ७९°११″ पूर्व व अक्षांश ३५°११″ उत्तर असे आहेत. कुएनलुन पर्वतावरून ही सरहद्द उत्तरेस व ईशान्येस जाते. त्या शिखराची उंची २३,१०० फूट आहे. तेथून ती २१,९६० फूट व २३,३०० फुटांपर्यंत जाते. नंतर ती सरहद्द जलनिक्षेपाच्या अनुरोधानें खालीं येते. आमटोगोर व सारिग जिलगारंग

हे तलाव हिंदुस्थानांत आहेत आणि लैटेन व त्सोगार तलाव हे तिबेटमध्यें आहेत. हिंदुस्थानामध्यें व तिबेटमध्यें असलेल्या तलावांत ज्या नद्यांचें पाणी वाहतें, त्या नद्यांवरून पुढची सरहद्द ठरविली. त्या सरहद्दींची उंची सरासरीनें २०,००० फुटांवर आहे. हीं दोन शिखरें ओलांडल्यावर पुढें ती सरहद्द जलनिक्षेप तत्त्वानुसार इतर शिखरांवरून जात जात लनाक खिंडीपर्यंत येते. त्या खिंडीच्या अगोदर एक शिखर आहे. त्याची उंची २०,६१० फूट आहे.

काराकोरम खिंडीपासून डेमचॉकपर्यंतची लडाखची ही सरहद्द पाणवहाळच्या तत्त्वानें ठरली आहे. त्यांत कांहीं चूक आहे असें चीन प्रतिनिधि दाखवूं शकले नाहींत. त्यांच्या जवळ स्वतंत्र पुरावा नसल्यामुळें ते आमच्या पुराव्यावर आक्षेप घेत व तो बरोबर नाहीं एवढेंच दाखविण्याचा प्रयत्न करीत.

हिंदुस्थाननें चीनला विचारलें ह्या सरहद्दींच्या बाबतीत तुम्ही कोणतें तत्त्व अनुसरतां? त्याला त्यांचें उत्तर आम्ही कोणतेंच एक तत्त्व मानीत नाहीं असें आहे. कधीं पाणवहाळ, कधीं डोंगर–पर्वत, कधीं खिंडी, कधीं दऱ्या आम्ही आधाराकरितां घेतों असें ते म्हणतात. हिंदुस्थाननें मात्र एकच तत्त्व आणि तें पाणवहाळाचें अंगीकारलें आहे व त्याला अनुसरून आपल्या सरहद्दी ठरल्या आहेत असें दाखवून दिलें. त्या एका मुख्य तत्त्वाला अनुसरून बाकीच्या रेषा ठरतात अगर ठरवतात.

आतां त्यानंतर परंपरा, वहिवाटी, नकाशे, इतिहास, तहनामे राज्यकारभार वगैरेंचा विचार करूं. त्यांतील एक पुरावा सुरुवातीस दिला आहे. चीनचेच कांहीं नकाशे आम्हीं सादर केले. चीनचा या विभागासंबंधीचा एक अत्यंत जुना नकाशा सहाव्या शतकांतला आहे. त्यांत कुएनलुन पर्वत ही सिंकिआंगची दक्षिण सरहद्द आहे असें दाखविलें आहे. दुसरा नकाशा १६०७ चा. तो चेन चौ या बुद्ध भिक्षूनें काढला होता.

हे जुने नकाशे फारसे तपशीलवार असत नाहींत. पण या बुद्धभिक्षूच्या नकाशांत कुएनलुन व पामीर हे हिंदुस्थान आणि सिंकिआंग व तिबेटमध्यें आहेत असें दर्शविलें आहे.

१७६२ मध्यें चीननें पश्चिमेकडील चिनी साम्राज्याचे ( सालवारचे ) कागदपत्र व नकाशे प्रसिद्ध केले. त्यांत या विभागांतील बरेच नकाशे आहेत. त्यांतील कोणत्याहि नकाशांत सिंकिआंगची हद्द कुएनलुन पर्वता-पर्यंत येते असें दाखविलें नाहीं. उलट आम्ही काराटाग खिंडीवरून जी आमची रेषा दाखविली आहे ती उत्तरेस ६० मैल कमचि आहे असें दिसतें.

चवथा नकाशा १८२१ मध्यें त्यांनींच प्रसिद्ध केलेला सिंकिआंगचा. त्या नकाशांत दोन ठिकाणीं सिंकिआंगची दक्षिण सरहद्द कुएनलुन पर्वताच्या बाजूनें आहे असें दाखविलें आहे. त्याहि नकाशावरून आम्ही दाखवीत असलेली सरहद्द कमीच आहे असें सिद्ध होतें. त्यानंतर पांचवा नकाशा १८२४ चा. तो नकाशा इलीच्या सु सिंग पो या भूगोल-शास्त्रज्ञानें तयार केला. त्यानें नुसता नकाशा तयार केला नाहीं, तर एक पुस्तक लिहिलें. त्या पुस्तकाचें भाषांतरित नांव ‘ पश्चिमेकडील देशांतील नद्यांसंबंधीं शेरे ’ असें आहे. त्यांत नकाशाचीं आठ पानें आहेत. सातव्या पानावर यार्कंदखोतान विभागाच्या दक्षिण सरहद्दी दाखविल्या आहेत. त्या हद्दीवरून आमच्याच म्हणण्याला दुजोरा मिळतो.

त्यानंतरचा बिन सरकारी नकाशांचा पुरावा. पेकिंग विद्यापीठानें नोव्हेंबर १९२५ मध्यें एक नकाशा प्रसिद्ध केला. त्या नकाशांत १९११ पूर्वी ज्या चिंग घराण्याची सत्ता होती, त्याचा जास्तींत जास्त विस्तार कोठपर्यंत होता हें दाखविलें आहे. त्याहि नकाशांत अक्साई चीन भाग चीनमध्यें अंतर्भूत होत नाहीं.

१९०८ चे दोन व १९१७ चा तिसरा चीननें प्रसिद्ध केलेला असे तीन नकाशे आहेत. ह्या तीनहि नकाशांत हिंदुस्थान म्हणतो, तशाच सरहद्दी आहेत. ह्या चीनच्या नकाशांशिवाय ॲरोस्मिथ, डॉ. जोसेफ शॉवनें हा जर्मन तज्ज्ञाचा नकाशा हे आम्हांला पूर्णपणें पोषक आहेत.


१९१२ सालीं जिऑग्राफिकल जर्नलनें एक नकाशा प्रसिद्ध केला. ती एक शास्त्रज्ञांची संस्था आहे व तिची ख्याति बिनचूक नकाशे तयार करण्याबद्दल आहे. तो नकाशा हिंदुस्थानच्या उत्तर सरहद्दी निश्चित करण्याकरितां तयार केला होता. तोहि नकाशा हिंदुस्थान म्हणतो, त्याच सरहद्दी दाखविणारा आहे. १९१६ सालीं त्याच सोसायटीनें दुसरा नकाशा हिंदुस्थानच्या पारंपरिक सरहद्दी ठरविण्याकरितां तयार केला, त्यांतहि आम्ही म्हणतों तशाच सरहद्दी आहेत.

तेव्हां सरहद्दी व सरहद्दीचीं तत्त्वें घेतलीं काय, इतिहास पाहिला काय किंवा नकाशे अवलोकन केले काय, चीन म्हणतो तो निष्कर्ष निघत नाहीं; आम्ही म्हणतों तोच निघतो. त्यांना लडाख हा तिबेटचा व सिंकिआंगचा होता व आहे हें सिद्ध करावयाचें आहे, पण तें युद्धानें. काश्मीर हद्दींतल्या या लडाखवर तेथील राजाची सत्ता होती. लडाखमधील मीठ असो, गुरचराई असो, शिकार असो, ती राजाच्या परवानगीशिवाय करतां येत नसे.

### तहनामे

१६८४ सालीं लडाख–तिबेटमध्यें तह झाला. त्यांत असें म्हटलें आहे कीं, The boundaries fixed in the beginning, when Skyd-Ida-ngeemagon gave a kingdom to each of his three sons shall still be maintained.'

२६ डिसेंबर १९५९ रोजीं चीननें ह्या तहाच्या प्रामाण्याबद्दल प्रश्न काढला नाहीं; पण २२ जुलै १९६० रोजीं चीननें हा तहनामा खरा




१९५६ सालापासून लडाखच्या ज्या भागावर चीन हक्क सांगत आहे तो प्रदेश रेषांकित दाखविला आहे.

कशावरून असा प्रश्न काढला. त्याला काय उत्तर देणार ? जुने पुराणे तहनामे अद्याप आहेत व तेच जर खरे नाहींत तर खरें काय हें तरी दाखविलें पाहिजे. १८४१ मध्यें गुलाबसिंगानें लडाख जिंकलें. गुलाबसिंगाचा सरदार जोरावसिंग यानें नंतर तिबेटवर स्वारी केली.त्या स्वारींत तो ठार झाला. नंतर तिबेट व चीननें लडाखवर स्वारी केली त्या स्वारींत तिबेट चीन हरले व १८४२ सालीं काश्मीर व लडाख एक बाजूला व तिबेट व चीन दुसऱ्या बाजूला असा तह झाला. त्या तहांत शांतता प्रस्थापित करावी व कोणी कोणाच्या विभागांत आक्रमण करूं नये असें म्हटलें होतें. चीन म्हणाला, हा अनाक्रमणाचा तह आहे, सरहद्दी ठरविण्याचा नाहीं. पण कोणी कुठें आक्रमण करावयाचें नाहीं हें निश्चित असल्याशिवाय अशा कराराला अर्थ नसतो. त्या सरहद्दी पारंपरिक होत्या व उभय पक्षांना माहीत होत्या. पण कांहींहि असले तरी तिबेटचा लडाख नव्हता हें खास. तिबेटचा लडाख असता तर तिबेटनें लडाखवर म्हणजे आपल्याच मुलखावर आक्रमण करूं नये असें म्हणणें मूर्खपणाचें ठरलें असतें. पण चीननें सारा तहनामा वाचण्याचेहि कष्ट घेतले नाहीत. तहाच्या पुढील भागांत असें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, दोघांच्या सरहद्दी सर्वांना ठाऊक आहेत व तीच सरहद्द आम्ही कायम करतों. १९२१ मध्यें तिबेट व लडाखमध्यें व्यापाराच्या परवानगीसंबंधीं कांहीं अडचणी उत्पन्न झाल्या. तिबेटनें २२ नोव्हेंबर १९२१ रोजीं लडाखला एक पत्र पाठविलें व त्यांत १८४२ मध्यें ठरलेल्या सरहद्दींबद्दल उल्लेख केला. चीन व तिबेटच्या प्रतिनिधींनीं लडाख व काश्मीरच्या प्रतिनिधींना त्यावर पुढील आश्वासन दिलें.

'We shall neither at present nor in future have anything to do or interfere at all with the boundaries of Ladakh and its surroundings as fixed from ancient times and will allow the annual export of wool, shawls and tea by way of Ladakh according to old established custom.' तेव्हां या

सरहद्दी फार प्राचीन काळापासून निश्चित केलेल्या आहेत व त्या आम्ही प्रमाण मानूं असें तिबेटनें व चीननें कबूल केलें. त्याला प्रत्युत्तर गेलें. लडाख व काश्मीरनें म्हटलें आम्हीहि आमच्याकडून या मान्य सरहद्दींचें उल्लंघन करणार नाहीं.

१६८४ व १८४२ चे हे दोन तह लडाख व तिबेटच्या सरहद्दीवर शिक्कामोर्तब करतात.

१८४२ च्या ह्या तहाला १८४७ मध्यें चीननें मान्यता दिली. १३ जानेवारी १८४७ च्या ब्रिटिशांना पाठविलेल्या पत्रांत चीनचा कंतानमध्यें असलेला इंपीरिअल कमिशनर लिहितो, 'Respecting the frontiers, I beg to remark that the borders of these territories have been sufficiently and distinctly fixed so that it will be best to adhere to this ancient arrangement and it will prove far more convenient to abstain from additional measures for fixing them.'

चीन त्यावर म्हणतो, ही पुरातन सरहद्द आज आम्ही हक्क सांगतों ती; हिंदुस्थान म्हणतो ती नव्हे. पण हें म्हणणें अजिबात खोटें आहे. हिंदुस्थाननें सहाव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या चिनी नकाशावरूनच असें दाखविलें कीं, सिंकिआंग हा कुएनलुन पर्वताच्या दक्षिणेकडे कधींहि विस्तारला नव्हता.

लडाख व तिबेटची सरहद्द लनाक खिंडीजवळ आहे असें सिद्ध करण्याकरितां हिंदुस्थाननें पुष्कळ नकाशे, प्रवासवर्णनें सादर केलीं. तसेंच सिंकिआंगची सरहद्द कुठें आहे व तिबेटची कुठें आहे हें आम्हीं दाखवून दिलें. त्यावरून साऱ्या लडाखच्या सरहद्दी निश्चित होतात. अक्साई चीन हा हिंदुस्थानचा आहे हेंहि त्यावरून दृष्टोत्पत्तीस येतें.

× × ×

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २३२८३

जो लडाख आम्ही काश्मीरचा म्हणजे हिंदुस्थानचा म्हणतो, त्या लडाखमध्यें सत्ता कोणाची होती, शेतसारा कोण घेत असे, कायदेकानू कोणाचे होते वगैरे प्रश्न महत्त्वाचे आहेत. चीननें लडाखमध्यें आपला राज्यकारभार चालू होता असें सिद्ध केलें नाहीं. उलट आम्ही मात्र त्यासंबंधीं पटणारे पुरावे दिले. हें राज्यकारभाराचें काश्मीरचें क्षेत्र लडाखमध्यें विस्तारलें होतें. १८६५ च्या काश्मीरच्या एका नकाशांत काश्मीरच्या पोलीस चौक्या उत्तरेस यांगी दवानपर्यंत होत्या हें दाखविले आहे. यांगी दवान काराकाश नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर आहे. १९०१ पर्यंत हे विभाग सरहद्द जिल्हा वजारतींत होते. त्या वजारतींत गिलगिट, बाल्टिस्तान व लडाख येत. त्या सालीं त्यांची विभागणी झाली. गिलगिट व लडाख अशा दोन वजारती केल्या गेल्या. लडाख वजारतींत स्कार्डु, करागिल व लडाख असे तीन विभाग आले. अक्साई चीन व चँगचीन मो व्हॅली हे लडाख तहशीलांत आहेत. यासंबंधींचे रेव्हेन्यू रेकॉर्ड्स उपलब्ध आहेत. तेथें सारा कसा बसवीत, त्याची फेरतपासणी कशी होई, वसुली कशी केली जाई वगैरे सर्व तपशील कागदोपत्रीं आहेत.ज्या भागांत मनुष्यवस्ती नसे, त्याचीहि नोंद त्यांत आहे. तथापि त्या निर्मनुष्य भागांत जे मेंढयांचे कळप चरणीकरितां नेत त्यांच्याकडून चराई वसूल केली जाई. तेथील दळणवळणाच्या मार्गाची, व्यापारी व वाटसरूकरितां असलेल्या विश्रांतीच्या जागांची सर्व माहिती त्यांच्या कागदोपत्रीं आहे. याशिवाय तेथील प्रत्येक खेड्याचें नांव व वर्णन दप्तरीं आहे. त्या खेड्यांतून वसूल केलेल्या शेतसाऱ्याच्या नोंदी रकमाहि हिंदुस्थाननें हजर केल्या. अक्साई चीन भागांत व पलीकडे व्यापाराकरितां जाण्याकरितां जे रस्ते आहेत, त्यांची व्यवस्था, विश्रांतीचीं ठिकाणें, सामान सांठवण्याकरितां कोठ्या, ह्यासंबंधींची देखरेख, नियंत्रण, ताबा वगैरे सर्व काश्मीर व ब्रिटिश सरकार करी. त्यासंबंधीं कधीं तक्रारी झाल्या नाहींत. सिंकिआंगचें राज्य असो

किंवा तिबेटचें राज्य असो, त्यांनीं कधींहि लडाख सरकार किंवा मागाहून आलेल्या काश्मीर सरकारबरोबर त्या सरहद्दीच्या मालकीबद्दल प्रश्नहि विचारला नाहीं. जर सरहद्दीबद्दल कधीं भांडण निर्माण झालें असतें, तर त्या मार्गानें जाणाऱ्यायेणाऱ्या व्यापाऱ्यांना तें कळलें नसतें का?

१८६६ मध्यें अशी एक तक्रार केली गेली कीं, यारकंदमधील व्यापार हा डळमळूं लागला आहे, कारण काश्मीर सरकारनें व्यापाऱ्यांवर जबरदस्त कर बसविला आहे. ही तक्रार दूर करावी म्हणून एक नवा रस्ता चुशुल, पॅनगॉंग लिंगझी टॅग व अक्साई चीनवरून शाही-दुल्लापर्यंत तयार करावा व व्यापाऱ्यांना अधिक सवलती द्याव्यात अशा-बद्दल १८७० मध्यें काश्मीर व ब्रिटिश सरकार यांच्यामध्यें करारनामा झाला.

त्या करारांतील पहिल्या कलमांत पुढील वाक्य आहे व त्या वाक्या-इतका दुसरा जबरदस्त पुरावा लडाखसंबंधीं नाहीं. महाराजांच्या संम-तीनें, ब्रिटिश सरकार व्यापारी रस्त्याची पाहणी करण्याकरितां अधि-कारी नेमील. ही पाहणी महाराजांच्या राज्यांतील मुलूख एका बाजूला व यारकंदच्या राजाचा मुलूख दुसऱ्या बाजूला अशी केली जाईल. त्यांत चँग चिनमो व्हॅलीमधून रस्ता येईल. सर्व केल्यानंतरचा एक नकाशा महाराजांना दिला जाईल. अक्साई चीन, लिंगझी टँग व चँग चिनमो व्हॅलीमधून जाणारा चँग चिनमो शाहीदुल्ला रस्ता हा काश्मीरचा होता याबद्दल अधिक भक्कम पुरावा कोणता मिळूं शकेल? त्या तहांत मागील सर्व येणें माफ केल्याचें कलम आहे.

त्या कराराला पोषक असे अनेक पुरावे हिंदुस्थान सरकारनें दिले. त्या पुराव्यांत रस्त्यावरील गांवांचीं नांवें दिलीं आहेत. त्या काळांत काश्मीर व हिंदचे सरकारी दौरे व पहारे अनेक झाल्याचे उल्लेख आहेत. १८६९ सालीं ड्रूनें चँग चिनमो व्हॅली, लिंगझी टँग व अक्साई चीन-मध्यें दौरा केला. तो हाजी लँगरपर्यंत गेला होता. त्यानंतर जॉनसन

गेला. १८७१ मध्यें केली, १८७४–८४ ने इलिस हे त्या भागांत विस्तीर्ण दौरा करून आले. त्यांचीं प्रवासवर्णनें उपलब्ध आहेत.

तेथें सर्वेकरितां अनेक तुकड्या गेल्या व त्यांनीं अहवाल सादर केले. काराकोरम, हाजी लंगर, अक्साई चीन, लनाक, डेमचॉकपर्यंतचा म्हणजे आम्ही जो लडाख आमचा आहे म्हणतों, तो सर्व भाग सर्वे केलेला आहे. तेथील भूगर्भाचीहि पाहणी केली गेली आहे व ती हिंदुस्थाननें केली.

कांहीं नकाशांचा उल्लेख वर केला आहे. पण १८४६ पूर्वीं काश्मीर हिंदुस्थानच्या ताब्यांत आला नव्हता. त्या वेळच्या दोन नकाशांत चुका आहेत. १८२५ व १८४० चे ते नकाशे आहेत. नकाशे तयार करणारांना काश्मीर राज्याची पुरी ओळखहि नव्हती, म्हणून तशा चुका झाल्या. तेवढ्याच चीननें दाखविल्या. १८४६ च्या वॉकरच्या नकाशांत अशीच चूक आहे. पण १८६० नंतर मात्र चूक नाहीं. वॉकरनें १८६६ सालीं फेरपाहणी केली व दुरुस्त नकाशा तयार केला. त्यांत त्यानें काश्मीरची उत्तर सरहद्द कुएनलुन पर्वतरांगांच्या बाजूनें ८०° रेखांशापर्यंत असल्याचें दाखविलें आहे. पहिला नकाशा प्रमाणभूत नाहीं; दुसरा आहे.

चीननें १७ व्या बैठकींत हिंदुस्थानचे १८६५, १९०३, १९१७, १९२९ व १९३८ चे नकाशे पश्चिम विभागांतील सरहद्दी दाखवीत नाहींत असें दाखविलें; पण सरहद्दी त्यांत दाखविल्या नसल्या तरी पारंपरिक व रूढ सरहद्दी कोणत्या हें सर्वांना ठाऊक होते. चीननें रूढ सरहद्दी नाकारल्या नाहींत व १९३८ पर्यंत हिंदुस्थानसारख्या देशाच्या आंतरराष्ट्रीय सरहद्दी नव्हत्या असेंहि म्हटलें नाहीं. १९२९ च्या नकाशांत अक्साई चीन व लिंगझी टँगवर काश्मीर असें लिहिलें आहे. पण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. हे नकाशे अंतर्गत विभागणी व

व्यवस्थेकारितां होते, परराष्ट्रीय व्यवहाराकारितां नव्हते. त्या सर्वेच्या नकाशांत बाहेरच्या हद्दी दाखविल्या नाहींत, त्याचें कारण ही पाहणी आपल्या देशाची होती; दुसऱ्यांची नव्हती. चीनच्या नकाशांतहि चीननें कधीं आपल्या प्रदेशांच्या बाह्य सरहद्दी दाखविल्या आहेत ? त्याचें कारण अशा सरहद्दी दाखविण्याची त्या वेळीं प्रथा नव्हती.

१८८९ च्या एका नकाशांत चीननें हिंदुस्थानची उत्तर सरहद्द बरोबर नाहीं व आपल्या सरहद्दीशीं जुळत नाहीं असें म्हटलें. पण त्यांनीं एक गोष्ट कबूल केली. १८९२ नंतरच चिनी लोक काराकोरम खिंडीपर्यंत गेले व सिंकिआंगची दक्षिण सरहद्द कुएनलुन पर्वत रांगाच्या उत्तरेला होती हें त्यांनीं त्या वेळीं कबूल केलें. तिबेट लडाखची पूर्व सरहद्द मात्र त्या नकाशांत स्पष्टपणें दाखविली आहे. तींत अक्साई चीन, लिंगझी टँग व चँग चिनमो व्हॅली हिंदुस्थानांत असून ती कुएनलुनच्या पूर्वेला ८०° रेखांशपर्यंत दाखविली आहे. चीननें दगड रोवून सरहद्दी कुठें दाखविल्या आहेत, असें विचारलें. दगड रोवले नव्हते हें खरें आहे. पण चीननें तरी ते हक्क सांगत असलेल्या हद्दीवर दगड रोवले आहेत का?

त्यानंतरचे ब्रिटिश नकाशे अत्यंत निःसंदिग्ध आहेत. पण ब्रिटिशांचे नकाशे राहोत, खुद्द चीनचे नकाशे आमच्याच म्हणण्याला पुष्टी देतात. १९१७ ते १९३३ पर्यंत पोस्टल अटलास ऑफ चायना, याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यांत हिंदुस्थान म्हणतो तीच सरहद्द दाखविली आहे.

२० व्या शतकाच्या अलीकडच्या काळांतच चीननें हिंदी सरहद्दीवरील हक्कांवर आक्षेप घेणें सुरू केलें आहे. त्यांच्या अलीकडील नकाशांतच गोंधळ आहेत. त्याचें कारण आपला मुलूख कोणता आहे, हें त्यांनाच ठाऊक नाहीं. १९४७ च्या एका सरकारी नकाशांत काराकाश व शायॉकमधील हद्द रेषा दाखविली आहे. त्यांत चँग चिनमो

व्हॅलीचा एक भाग हिंदुस्थानांत दाखविला आहे; ती रेषा पॅनगाँग तलावाचा मध्य विभाग कापते असें दाखविलें आहे व सारा स्पँगुर विभाग हिंदुस्थानांत अंतर्भूत केलेला आहे. त्यांच्या १९५०, ५१ च्या नकाशांतहि असेच गोंधळ आहेत. १९५३ मध्यें चीनच्या रिपब्लिकचा एक मोठा नकाशा प्रसिद्ध केलेला आहे, त्यांत १९४७ च्या नकाशाकडे ते वळले आहेत.

त्यांच्या सरकारी नकाशांत कशालाहि मेळ नाहीं. ६ नोव्हेंबर १९५९ च्या पत्रांत जवाहरलाल चौला लिहितात, " १९५६ च्या चिनी नकाशांत जी आंतरराष्ट्रीय रेषा दाखविली आहे. तिच्या पश्चिमेला हिंदुस्थान आपलें सैन्य काढून घेईल. आमच्या कल्पनेप्रमाणें ते चीनचे अद्यावत् नकाशे असावेत. " त्याला चौनें उत्तर दिलें, " आपण निर्दिष्ट केलेला १९५६ चा नकाशा बिनचूकपणें आपल्या दोन देशांतील पारंपरिक सरहद्द दाखवितो; " पण जो १९५६ चा नकाशा बिनचुक आहे असें चौ म्हणतो, त्यापेक्षां निराळाच नकाशा चीननें आम्हांला दिला.

चीनचे नकाशे असे अनेक आहेत व ते आमची सरहद्द अमुक आहे असें निश्चितपणें सांगणारे नाहींत.

वरील विवेचनावरून असें सिद्ध होतें कीं, चीनला लडाख आपला आहे असें दाखवितां आलें नाहीं. ते पारंपरिक व रूढ सरहद्दी मानतात पण त्या सरहद्दी आम्ही म्हणतों त्या; हिंदुस्थान म्हणतो त्या नाहींत; असा दावा सांगतात. त्यांच्या जवळचे चिनी नकाशे ते प्रमाण मानीत नाहींत, व आमचेहि मानीत नाहींत. चीननें किंवा सिंकिआंग व तिबेटनें त्या भागावर कधीं राज्यकारभार केला नाहीं. व्यापाराचे व दळणवळणाचे रस्ते आम्ही सांगतों त्या विभागांत होते व ते आमचे होते. लडाखमध्यें गुरचराई, शिकारी, वगैरे संबंधीं सर्व हक्क लडाख, काश्मीर बजावीत असे. बाह्य सरहद्दी आमच्या नकाशावर नाहींत असें त्यांचें म्हणणें. पण चीनच्या नकाशावर तरी त्या कोठें आहेत ? त्या वेळीं तशी

प्रथा नव्हती. पुढें त्या रेषा नकाशांत दाखविल्या गेल्या. चीननें सध्यांचा लढा सुरू झाल्यानंतरच आपल्या हद्दीवर रेघा ओढल्या, त्या रेघाहि ठाम नाहींत. त्या सारख्या बदलत असतात. आमच्या रेघा मात्र ठाम आहेत.

सिंकिआंगवर त्यांची भिस्त दिसते. तो सिंकिआंग १७५९ मध्यें चीननें आपल्या राज्याला जोडला. १८६५ मध्यें चीनचा ताबा सिंकिआंगवर नव्हता. १८७८ मध्यें त्यांनीं तो पुनः जिंकला. पण १८८९ पर्यंत त्यांच्या राज्याची सरहद्द कुएनलुनपर्यंत पोहोंचली नव्हती. चीननें शाहिदुल्लाचा कारभार चालविण्याची जबाबदारीहि नाकारली. तेव्हां चीनची सत्ता सिंकिआंगवर किती होती व असलीच तर सिंकिआंगच्या सरहद्दी कोणत्या हेंहि त्याना ठाऊक नव्हतें. त्यांच्या उलट आमच्या सरहद्दी कोणत्या हें आम्ही निश्चितपणें दाखवूं शकलों आहोंत. चीनला हें सर्व अमान्य आहे व त्यांना जबरदस्तीनें, दांडगाईनें व युद्धानें हा प्रदेश बळकावयाचा आहे. आम्ही वाटेल तितके पुरावे देऊं शकतों; त्रयस्थापुढेंहि मांडूं शकतों; पण त्याचा उपयोग काय ?

* * *

# ७

# लडाख व लडाखी

जम्मू-काश्मीरचे ३ भाग आहेत. ( १ ) गिलगिट व लडाख, ( २ ) जम्मू व ( ३ ) काश्मीर दरी. लडाख काश्मीरच्या उत्तरेला आहे. युद्धाच्या दृष्टीनें त्याला अत्यंत महत्त्व आहे. लडाखचें क्षेत्रफळ ४९,७६२ चौ. मैल आहे. गिलगिट १६,१६० चौ. मैल आहे व तो पाकिस्तानच्या ताब्यांत आहे. लडाखचे ३ तहशील आहेत. ( १ ) कारगिल, ( २ ) लडाख व ( ३ ) स्कार्डु. स्कार्डु हा पाकिस्तानच्या ताब्यांत आहे, लडाखहि धोक्यांत आहे. त्याचे ३ भाग चीननें बळाकावले आहेत. (१) अक्साई चीन, ( २ ) चँग चिनमो दरी व (३) चँग थँक विभाग.

काश्मीर दरी ९० मैल लांब व २० मैल रुंद आहे. काश्मीरमध्यें पाण्याचें वैपुल्य आहे. श्रीनगरहून करगिल व लेहपर्यंत रस्ते आहेत. लेह हें लडाखचें मुख्य ठाणें. गिलगिटला अमेरिकन विमानतळ आहे व तो काढण्यास पाकिस्ताननें परवानगी दिली आहे. ह्या विमानतळाची रशिया व चीनला भीति वाटते. सिंकिआंगला विमानतळ काढण्यास चीनला कोणी हरकत घेत नाहीं. पण तेथें विमानतळ काढण्यास सिंकिआंग व तिबेटला जोडणारा रस्ता लडाखमधून आहे व तो आमचा

आहे. गिलगिट व सिंकिआंगचे विमानतळ हे हिंदुस्थानला धोका आणणारे आहेत. लडाखचें ४५७६२ चौ. मैल क्षेत्रफळ आतां कमी झालें आहे. चिनी आक्रमणामुळें तें कमी झालें. स्कार्डु पाकिस्ताननें बळकावला आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. तेव्हां लडाखचे लचके पूर्वी पाकिस्ताननें व आतां चीननें तोडले आहेत. लडाखची वस्ती २ लक्ष होती, ती आतां ८८००० झाली आहे. हा सर्व भाग पर्वतांनीं व डोंगरांनीं भरलेला आहे.

लडाखच्या उंचीवर सहा महिने बर्फ पडतो. पाऊस थोडा पडतो. लडाखचे लोक इंडो–मंगोलाईड व इंडो–इराणी वंशाचे आहेत. इंडो–इराणी लोकांना बाल्टिज म्हणतात व ते इस्लाम धर्माचे आहेत. ते कारगिल–तहशीलमध्यें राहतात. लडाख तहशीलमध्यें इंडो–मंगोलाईड राहतात. ते बुद्धधर्मीय आहेत. त्या जमातींत वैर नाहीं. एकाच खेड्यांत राहणारे, एकच पोषाख करणारे व एकच भाषा बोलणारे असे अनेक उभय धर्माचे लोक तेथें आहेत. बाल्टिज लोकांची भाषा स्वतंत्र आहे व लिपीहि निराळी आहे.

लडाखमध्यें १९ मठ आहेत व ते गुंफांत आहेत. हेमिज गुंफा सर्वांत मोठी व पवित्र मानली जाते. त्या गुंफेंत १५० चे वर लामा राहतात. शंकरगुंफेचा जो प्रमुख आहे, त्याचें नांव कुशाक बकुल असें आहे. तो जम्मू–काश्मीर मंत्रिमंडळांत एक मंत्री आहे. त्याच्याबद्दल लडाखमध्यें अत्यंत आदर आहे. बुद्धधर्मांत लामा निवडावा लागतो; पण कुशाक हा जन्मावा लागतो. कुशाक कुटुंबांत जन्मलेलाच कुशाक होतो. लडाखमध्यें ७ कुशाक व १५०० लामा आहेत.

जम्मू-काश्मीरच्या नव्या राजवटींत लडाखमध्यें प्रगति होत आहे. तेथें २ हायस्कुलें व १६१ प्राथमिक शाळा आहेत. ४५०० मुलेंमुली तेथें शिकत आहेत. त्यांत ३६० मुली आहेत. त्यांना हिंदुस्थानी, लडाखी, उर्दू व इंग्रजी शिकवितात.

एके काळीं लडाख ही मध्य आशिया व हिंदुस्थानच्या व्यापाराची उतार पेठ होती. हिंदुस्थानचा माल लेहला यायचा, मध्य आशियाचाहि यायचा. त्या मालाचे सौदे तेथें होत. आज परिस्थिति उध्वस्त झाली आहे. त्याचें कारण चिनी आक्रमण. मध्य आशिया व हिंदुस्थानचे व्यवहार आतां थांबले आहेत.

लडाखमध्यें खनिज संपत्ति विपुल आहे; पण तिचें संशोधन झालें नाहीं. तेथें नमदा, लोही वगैरे लोकरीच्या वस्तु होतात. तेथें शायोक, सिंदु, सुरु, द्रास, झंस्कार वगैरे नद्या आहेत. पण बर्फाच्या पाण्याचे ओढे असंख्य आहेत. पुढें मागें तेथें जलविद्युत् निर्माण होईलच.

लडाखमध्यें ४१००० एकर जमीन पिकाकरितां उपलब्ध आहे. त्या जमिनींत बार्ली होते. उतरणीवर गहूं, बटाटे व इतर भाज्या होतात. एकूण उत्पादन २॥ लक्ष मण आहे. त्यांत अर्धा लक्ष मण गहूं होतो. द्रास खोऱ्यांत उत्तम जिरे होतात. अजून १५००० एकर जमीन लागवडीखालीं आणतां येण्यासारखी आहे. तेथें पूर्वीं विहिरी खणणें माहीत नव्हतें. पण आतां विहिरी खणल्या जात आहेत व त्यांना भरपूर पाणीहि लागत आहे. शेतकरी या शोधामुळें फार आनंदांत आहे.


पशुधनाचें आगरच लडाखमध्यें आहे. तेथें अंदाजें ६४००० मेंढ्या व ८०,००० मेंढे आहेत. पश्मिना लोकर त्या मेंढ्यांपासून होते. लडाखमध्यें विपुल फळें होतात. सफरचंद, जर्दाळू, अक्रोड वगैरे फळांचें तें माहेरघर आहे. हीं फळें पूर्वीं १२,००० फुटांवर लावीत, आतां ती उतरणीवर लावूं लागले आहेत. सरकारनें ह्या कामांत पुढाकार घेतला आहे. सरकारनें पॉपलर व विलो झाडें लावण्याचा कार्यक्रम हातीं घेतला व तीं हजारों झाडें आतां वर डोकीं काढूं लागलीं आहेत. राजकीय दृष्टया लडाख जागृत आहे. त्यांना हिंदुस्थानशीं असलेले राजकीय व ऐतिहासिक संबंध चांगले ठाऊक आहेत. ते चिन्यांचा अत्यंत द्वेष

करतात. चिनी लोकांनीं तिबेटमध्यें केलेल्या अत्याचारांची त्यांना चांगली माहिती आहे. ती आठवण झाली म्हणजे त्यांच्या अंगावर काटे उभे राहतात. चिन्यांनीं बुडविलेल्या व्यापारामुळें ते त्यांना शिव्याशाप देतात. करगिल व बाल्टिज लोकहि चिन्यांचा द्वेष करतात. लडाख-मधील कोणताहि माणूस हिंदुस्थानचे संबंध तोडावयास तयार नाहीं.

त्या भागांतल सौंदर्य अप्रातिम आहे. मनाली, मंडी व लेह हे काश्मीर-इतकेंच सौंदर्यसंपन्न आहेत. अशा या लडाखला आम्ही दगा देणार नाहीं. पण त्यांना दगा देण्याचा हा प्रश्न नाहीं; तो स्वतःलाच दगा ठरणार आहे.

लडाखचा कारभार आम्ही करीत असतां चीननें त्याबद्दल कधीं तक्रारी केल्या ? कधीं त्यांनीं येथें राज्यकारभार केला ? कधीं त्यांनीं तेथील लोकांची वास्तपुस्त केली ? लडाख आपला आहे असें त्यांना वाटतें. ते स्वस्थ कसे बसले असते ? राज्यविस्ताराची हाव त्यांना सुटल्यानंतरच त्यांनीं लडाख आपला म्हणण्यास सुरुवात केली.

* * *




चीननें ७ सप्टेंबर पर्यंत आक्रमण केलेला लडाखचा प्रदेश एकेरी तिरप्या रेषांनीं दाखविला असून २० ऑक्टोबरनंतर जिंकलेला भाग आडव्या उभ्या रेषांनीं दर्शविला आहे.

तुटक रेषा चीनच्या माघारीची आहे.

## ८

# चीन हक्क सांगत असलेले विभाग

पश्चिम, मध्य व पूर्व विभाग हे संपूर्णपणें चीन मागत नाहीं. त्यांतील आपले म्हणून त्यांनीं तुकडे ठरविले आहेत. हिंदी व चिनी अधिकाऱ्यांच्या बैठकी झाल्या त्यांत चिन्यांनीं पुढील भागांवर हक्क सांगितले. पश्चिम विभागाचे दोन भाग. कोंगका खिंड हें विभागणीचें एक टोंक, कोंगका खिंडीचा उत्तर भाग, हा सिंकिआंग व लडाखची सरहद्द दाखवितो आणि त्या खिंडीचा दाक्षिण भाग तिबेट व लडाखची सरहद्द दाखवितो.


सिंकिआंग व लडाखमधील भाग, हा काराकोरम पर्वत रांकाच्या बाजूनें साऱ्या विभागांवर जातो. त्याचें निश्चित स्वरूप असेः—काराकोरम खिंडीपासून तों पूर्वेकडे, यारकंद नदीच्या उपनद्या एकीकडे व शायॉक नदी दुसरीकडे अशा पाणवहाळच्या बाजूनें जातो. तो अंदाजें ७८°०५' पूर्व, व ३५°३३' उत्तर येथपर्यंत येतो. तेथून तो नैऋत्येकडे जातो व पुढें चिंचोळा होत होत चिपचॅप नदी ओलांडतो. तेथून तो आग्नेयेकडे पर्वताच्या उंचवट्याच्या दिशेनें वळतो. नंतर तो ६८४५ व ६५९८ उंचीच्या शिखरावरून जातो. ६५९८ उंचीवरून तो डोंग-

राच्या कड्यावरून दक्षिणेकडे जातो व गालवान नदीपर्यंत पोहोंचतो. तेथून तो कुग्रांग सांगपो नदी व चँगलुंग उपनदीच्या पाणवहाळापर्यंत जातो व तेथें चँगलुंग नदी ओलांडतो. नंतर तो डोंगरांच्या कड्यावरून आग्नेयेला कोंगका खिंडीला भिडतो. त्यानंतर तिबेट व लडाख विभाग सुरू होतो. कोंगका खिंडीपासून निघालेली चिनी सरहद्द प्रथम आग्नेय दिशेला डोंगरमाथ्याकडे वळते. ती नंतर चँग चिनमो नदी व सिलुंग बर्मा नदी यांचा संगम ओलांडते. नंतर ती सरहद्द टामाटे डोंगरावर चढते; पुढें ती चँग चिनमो पर्वताच्या कडेनें दक्षिणेकडे जाते. नंतर ती ६१०७ उंचीच्या शिखरावरून ईशान्येकडे ॲन खिंडी-पर्यंत येते. या खिंडीपासून ती दक्षिणेकडे डोंगर–उंचवट्याच्या मार्गानें पॅनगाँग तलावाच्या उत्तर कांठापर्यंत येते. नंतर ती पॅनगाँग तलाव ओलांडून दक्षिण किनाऱ्यावर पोहोंचते. पुढें ती आग्नेयेच्या दिशेनें टाँगाडा नदी व स्पँगुर तलावांत जाणारे झरे यांना विभागणाऱ्या पाणवहाळांतून साजुम पर्वतापर्यंत जाते. तेथून ती हद्द डोंगराच्या वाटेनें दक्षिणेकडे वळते व शांगांतशांगपु ( सिंधु ) ओलांडते. नंतर ती केयुल लुंगपा नदी व हॅनले नदीची दक्षिण या पाणवहाळांतून शिनोवु पर्वतापर्यंत येते. नंतर ती हद्द पश्चिमेकडे वळते. पारे नदी व एक लहान ओढा यांचा संगम ओलांडून चीनचा आरी जिल्हा, पंजाब लडाख यांच्या हद्दीपर्यंत पोहोंचते.

चीननें लडाखच्या आपल्या सरहद्दीचें असें हें वर्णन दिलें आहे. त्याला कांहीं आधार ?

## मध्य विभाग

पश्चिम विभागाचें जें अखेरचें टोक आहे तेथून हा विभाग सुरू होतो. पारे व चुवा नद्यांचा पाणवहाळ एकीकडे व स्पिती नदीच्या उपनद्यांचा दुसरीकडे अशा भागांतून ती सरहद्द जाते. नंतर ती ६५२८




लडाखच्या ज्या भागावर चीननें आपला हक्क सांगितला आहे ती रेषा कराकोरमपासून निघून कोंगलाला, रेझांगला, डेमचोकवरून खालीं जाते. ती टिंबाटिंबांनीं दिग्दर्शित केली आहे.

उंचीच्या शिखरावर पोहोंचते. ती हद्द शेवटीं स्पिती नदीला भिडते व तिच्या कांठानें पारे नदीच्या व स्पितीच्या संगमापर्यंत पोहोंचते.

पारे व स्पितीच्या संगमावरून ती सरहद्द ६७९१ फूट उंचीच्या शिखरावरून दक्षिणेकडे डोंगरउंचवट्यावरून पुढें जाते. नंतर ती सिअँग-चुंग व हुपसँग नद्यांचा संगम ओलांडते व शिपकी खिंडीच्या पश्चिमेला ७ किलोमीटर्सपर्यंत येते. पुढें ती दक्षिणेकडे वळते व पर्वतशिखरावरून टामुलिंग खिंड व गुमरँग खिंड यांत जाते.

ती सरहद्द नंतर झडगंगा नदी ओलांडते व माना खिंडींतून पूर्वेकडे जाते. माना खिंडींतून ती कामेट पर्वतावर जाते व डोंगर–उंचवट्यावरून पुढें सरकते.

वूजे, सांगचा व लापथाल विभागांत ही सरहद्द त्या विभागाच्या दक्षिणेकडे सारखी डोंगरावरून जाते. ती निति खिंडीच्या दक्षिणेकडील मा दझो खिंडीतून, उद्राला नदींला वळसा घालून उद्राला खिंडीजवळ पोहोंचते. त्या खिंडीजवळून जी सरहद्द सिआंगचुन नदी व मापचु नदी एकीकडे व धौलीगंगा व काळी नदी दुसरीकडे यांच्या पाणवहाळांतून दर्मा खिंडीमधून चीन, हिंदुस्थान व नेपाळच्या सरहद्दीवर जाते.

## पूर्व विभाग

चीन, हिंदुस्थान व भुतानच्या तीन जोडांवरून पूर्व सरहद्दीचा सर्वांत मोठा विभाग पूर्वेकडे ९३°४७′ पूर्व व २७°०१′ उत्तर जातो. नंतर तो वायव्येकडे निजामघाटाजवळ येतो. नंतर तो जेथें हिमालयाचा दक्षिण पायथा ब्रह्मपुत्रेचा उत्तर किनाऱ्याला भिडतो तेथपर्यंत जातो. निजाम-घाटापासून चुंगली नदी, भोरोली नदी, रंगा नदी, सुबानसिरी नदी, सांगपो नदी या सर्व नद्या ओलांडून पासिघाटच्या नैर्ऋत्येला ती सरहद्द पोहोंचते. पुढें ती दिवांग नदी ओलांडते.

निजामघाटापासून ती सरहद्द आग्नेयेला डोंगरमाथ्यावर जाते व ती

सादुल नदीच्या दक्षिणेला, पेनलॉन खिंड व ३९७९ फूट उंचीवर जाते, पुढें ती हिंद, ब्रह्मदेश व चीन सरहद्दीला जाऊन मिळते.

वर ज्या तीन विभागांतील सरहद्दी चीननें आपल्या म्हणून सांगितल्या आहेत, त्याला कांहीं तत्त्व नाहीं; कांहीं परंपरा नाहीं, कांहीं इतिहास नाहीं. त्यांना जो जो विभाग पाहिजे आहे तो तो विभाग त्यांनीं आपला म्हटला व तसे नकाशे काढले. त्यांच्या ह्या स्वैरपणें रेखाटलेल्या सरहद्दीला आम्हांला मान्य नाहींत व कोणताहि निःपक्षपाती त्रयस्थ मान्य करणार नाहीं. चीननें कोणत्या सरहद्दीवर हक्क सांगितला आहे हें समजण्याकरितां त्यांचें वर्णन केलें आहे.

* * *

निवाडा ...
२८-३-८३
...३८५५
१८३३

# १

# राष्ट्रीय व आन्तरराष्ट्रीय धोरण

चीनच्या टोळधाडी आक्रमणामुळें गडबडून गेलेल्या हिंदी जनतेनें सरकारी धोरणावर टीकास्त्र उपसलें आणि तें स्वाभाविक होतें. घरांतला एखादा माणूस आजारी पडला म्हणजे घरांतली नातेवाईक मंडळी आजाराला दोष न देतां आजाऱ्याला दोष देतात. कोणी म्हणतात त्यांनीं तोंडच सांभाळलें नाहीं, कोणी म्हणतात काय तीं त्यांचीं जागरणें, कोणी म्हणतात गार पाण्याच्या आंघोळीचा हा प्रताप, कोणी म्हणतात उन्हातान्हांत हिंडण्यामुळें दुखणें आलें, अशीं अनेक कारणें त्या बिचाऱ्या आजाऱ्याला हैराण करून सोडतात. आजारी माणूस गांगरून व गुदमरून जातो, पण तेवढ्यानें त्याची दैना संपत नाहीं. तो खेड्यांत राहणारा असला तर भुताखेतानें त्याला झपाटलें असें म्हटलें जातें आणि ज्योतिषी, शनि, मंगळ व इतर दुष्ट ग्रहांच्या युत्या त्या आजाराला कारण आहेत असें म्हणतात. त्यावर मग इलाज करतात ! त्या साऱ्या आक्षेपांचा उद्देश रोगापेक्षां रोग्याला जबाबदार धरण्याचा असतो. पण रोगी बरा झाल्याशिवाय त्याची चर्चा करणें व्यर्थ असतें.

हिंदुस्थानचें तसेंच झालें आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाला, त्या वेळीं प्रथम आम्हांला काश्मीरवर पाकिस्ताननें केलेल्या आक्रमणाला तोंड द्यावें लागलें. त्या वेळीं अमेरिका व ब्रिटनची आम्हांला सहानुभूति नव्हती. ते या क्षणापर्यंत हिंदुस्थानची फाळणी धार्मिक पायावर झाली असें म्हणत आहेत. आम्ही काश्मीर पाकिस्तानला देऊन टाकावयास पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे. आम्ही त्यांची समज चुकीची आहे असें म्हणत आहों. आम्ही धार्मिक तत्त्वावर फाळणी मान्य केली नसून आमचें राज्य निधर्मी आहे असा आमचा दावा आहे, पण काश्मीरमध्यें आम्ही पाकिस्तानला श्रीनगरपर्यंत येऊं दिलें नसलें तरी त्यांनीं काश्मीरचा भाग दडपलेलाच आहे.

गोव्याच्या बाबतींत असेंच झालें. गोवा हिंदुस्थानचा एक अविभाज्य भाग आहे असें आम्ही म्हणत होतों. जनतेंत फार नाराजी होती आम्ही गोवा घेत नव्हतों म्हणून. आम्ही दुर्बल आहोंत, गोवा घेत नाहीं, सैन्यें पाठवींत नाहीं वगैरे आरोप सरकार सहन करीत होतें. जगाची सहानुभूति आमच्या बाजूला फारशी होती असें वाटत नाहीं; कारण जगानें पोर्तुगालला सरळ केला नाहीं. उलट ब्रिटन त्यांनाच मदत करीत असे.

हिंदुस्थानला गोव्यावर स्वारी करणें कठीण नव्हतें. पण आम्ही एका गोष्टीला भीत होतों. आमच्या हातून अशी कोणतीहि गोष्ट घडूं नये कीं, जीमुळें जागतिक युद्धाला आम्ही कारणीभूत होऊं. जगांत दोन गट पडले होते व ते दोन्ही गट एकमेकांवर तुटून पडण्यास उद्युक्त झाले होते. शीत युद्धाचें तें वातावरण अद्यापपर्यंत संपलें नाहीं. हिंदुस्थान कोणत्याहि गटांत सामील झाला नाहीं, तो विशिष्ट कारणाकरितां. अणुशक्तीची साधना दोन्ही गट करीत होते; व ती शक्ति जगाचा संहारच करणार होती.

श्री. जवाहरलाल नेहरू यांनीं वेळोवेळीं निर्माण झालेले हे संघर्ष आटोक्यांत आणले; भांडणारांना समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, कांहीं पर्याय सुचविले व संघर्ष युद्धाच्या थरापर्यंत जाऊं दिले नाहींत. हिंदुस्थानच्या ह्या शांततावादी भूमिकेचें अगदीं एकेरींवर येणाऱ्या राष्ट्रांकडून स्वागतच झालें. तीं राष्ट्रें आमच्यावर मनांत जळफळत होतीं व आमचा कदाचित् द्वेषहि करीत असतील; पण हिंदुस्थाननें आपल्या धोरणाला मुरड घातली नाहीं. कधीं सुवेज, कधीं कोरिया, कधीं इंडोनेशिया, कधीं बर्लिन, कधीं अल्जेरिया, कधीं इस्रायल अशा अनेक ठिकाणीं दाराजवळ येऊन ठेपलेलें युद्ध थोपवण्याचें काम आम्हीं केलें. त्याला इतर छोट्या राष्ट्रांची मदत होती. हिंदुस्थानच्या ह्या महत्त्वपूर्ण कामगिरीचा इतिहास केव्हां तरी लिहिला जाईल व तो आमची कामगिरी गौरवानें वर्णन करील. आफ्रिकेंतील कांहीं देशांच्या स्वातंत्र्याचें श्रेय हिंदुस्थानला मिळालें पाहिजे. तेथील बरेचसे देश हिंदुस्थानच्या पुरस्कारामुळें स्वतंत्र झाले आहेत. अगदीं नुक्ताच स्वतंत्र झालेला नायजेरिआ आमच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करितो. या सर्व घडामोडींत हिंदुस्थान पूर्णपणें यशस्वी झाला आहे, असा आमचा दावा नाहीं. कांहीं देशांत अद्याप धुसफुसी चालू आहेत; पण त्या जागतिक युद्धाचा वणवा पेटविण्याइतक्या स्फोटक नाहींत. आम्ही नुसत्या युक्तीच्या चार गोष्टी सांगितल्या नाहींत. शांतता प्रस्थापनेकरितां सैन्येंहि पाठविलीं. तेव्हां गेल्या दहाबारा वर्षांत हिंदुस्थाननें एक धोरण संपूर्ण जाणिवेनें अंगीकारलें होतें. त्या धोरणांत स्वतःची किंवा जगाची प्रतारणा नव्हती. त्या धोरणाचें श्रेय जर कोणा एका व्यक्तीला द्यायचें असेल तर तें श्री. जवाहरलालजींना. जवाहरलालजींनीं या धोरणाचा वारसा महात्मा गांधींकडून घेतला होता. गांधीजी हे शांतता, अहिंसा, सत्य याचे पुरस्कर्ते होते, द्रष्टे होते व शास्ते होते. ज्या साधनांनीं हिंदुस्थान स्वतंत्र झाला तींच साधनें जगालाहि शोषणमुक्त, पारतंत्र्यमुक्त व भयमुक्त

करतील असें ते म्हणत. या गांधीपुरस्कृत तत्त्वाचा कमी-अधिक प्रमाणांत कांहीं राष्ट्रांनीं उपयोग केला व अनेक राष्ट्रें अनेक वर्षांच्या पारतंत्र्यांतून मुक्त व निर्भय झालीं. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानला नुसतें आपलें स्वातंत्र्य टिकवावयाचें नव्हतें; आपला विकास व वाढ करावयाची होती. ही विकासवाढ करावयास आम्ही शांततामय वातावरणाची अपेक्षा करीत होतों. जगांतच जर तिसरें महायुद्ध भडकलें असतें, तर हिंदुस्थान स्वतंत्र असून परतंत्र, शांततावादी असून युद्धानें गांजलेला व साधनसामुग्रीची विपुलता असून खंगत चाललेला देश झाला असता. जागतिक शांतता टिकविण्यामागें आमचा स्वार्थ नव्हता असें नाहीं. पण तो स्वार्थ श्रेष्ठ दर्जाचा होता व मानवतेच्या एका विभागाच्या विकासाचा होता. आमचें तें धोरण चुकीचें आहे असें तेव्हां कोणीं म्हटलें नाहीं, आमच्या कट्टया शत्रूंनींहि म्हटलें नाहीं. आज चिनी आक्रमणामुळें आम्ही बेचैन झालों आहों व आमचें धोरण चुकलें कीं काय असें स्वतःला विचारूं लागलों आहों. आमचे सद्हेतु-प्रेरित बांधव 'सारेच चुकले' असा घाऊक आरोप आज आमच्यावर करीत आहेत. पण तो आरोप विचारानें केलेला नसून विकारानें, भावनेनें केलेला आहे. ते शांतपणें अजूनहि विचार करतील तर त्यांना त्या धोरणांत चूक होती असें म्हणतां येणार नाहीं. आपण अशी कल्पना करूं कीं, आम्ही जगाची पर्वा न करतां पाकिस्तानप्रमाणें स्वतःपली-कडे पाहिलें नसतें तर काय झालें असतें? जगांतील राष्ट्रांना आम्हीं असें सांगितलें असतें कीं, आम्हांला आमचें स्वातंत्र्य टिकविण्याकारितां लष्करी दृष्टया सुसज्ज व्हावयाचें आहे, तेव्हां जिकडे तिकडे लष्करी साधनसामुग्री निर्माण करण्याकारितां कारखाने काढावयास तुम्ही मदत करा. आम्ही आमच्या शक्तीवर कारखाने कसे काढणार होतों व पैसा कोठून आणणार होतों? युद्धशास्त्रांत आम्ही अमेरिका, रशियाइतके पुढें कोठें होतों? एक कोटीपर्यंत सेना उभारण्यास एक कोटी रायफल्स तरी

आमच्या जवळ असावयास पाहिजे होत्या. रायफल्सना काडतुसें लागतात, ती तयार करण्यास कारखाने लागतात आणि आम्ही कितीहि कारखाने काढले असते तरी ते अपुरे पडले असते. त्याशिवाय इतर अनेक आधुनिक शस्त्रास्त्रें तयार करण्याचे कारखाने आम्हांला काढावे लागले असते. जगानें विचारलें असतें, तुमचा शत्रु तरी कोण तें सांगा. कोणाविरुद्ध तुम्ही ती तयारी करीत आहांत? आम्ही पाकिस्तानकडे अंगुलिनिर्देष केला असता, गोव्याकडे केला असता, फ्रेंचांकडे केला असता, आसामांतील टोळीवाल्यांकडे केला असता. जगानें तें मानलें नसतें. पण समजा आम्ही त्यांची हरकत न मानतां स्वतःच्या शक्तीवर व स्वतःच्या साधनसामुग्रीवर प्रचंड लष्करी तयारी सुरू केली असती तर? सुमारें १५ ते २० हजार कोटी रुपये आम्ही जे तीन नियोजनांत खर्च करूं शकत आहोंत ते पैसे आम्हांला लष्करी तयारीला उपलब्ध झाले असते का? हिंदी जनतेनें तरी पैसे दिले असते का? आज आम्हांला एकीकडे रशिया व दुसरीकडे अमेरिका जी नियोजनाला मदत देत आहे, ती त्यांनीं लष्करी नियोजनाला दिली असती का? रशिया म्हणाला असता आमच्या गटांत या, अमेरिका म्हणाला असता आमच्या गटांत या. आम्ही कोणत्या गटांत जाणार होतों? पण आम्ही कोणत्याहि गटांत गेलों असतों, तरी जगांतील तेढ वाढविली असती व जगाच्या संहारक युद्धाला मदतच केली असती. तें आम्हीं केलें नाहीं ही आमची चूक झाली असें म्हणणार म्हणतील व म्हणत आहेत. चीनच्या आक्रमणामुळें आम्ही लष्करी तयारीकडे वळूं; पण आमची अलिप्तता सोडणार नाहीं. आमची अलिप्तता आमच्या विकासाकरितां जितकी आहे, तितकीच जगाचा नाश टाळण्याकरितां आहे.

हिंदुस्थान लष्करी नियोजनाऐवजीं आर्थिक नियोजनाकडे वळला. कारण त्याला राजकीय शत्रूंपेक्षां दारिद्र्यरूपी घरचा शत्रु भयंकर वाटत

होता. हिंदुस्थान हा अविकासित, मागासलेला, परावलंबी व गरीब देश आहे. त्याला आर्थिक दृष्टया सुधारणें हें लष्करी नियोजनापेक्षां अधिक महत्त्वाचें होतें. गेल्या दहा वर्षांत जवाहरलालजींवर आम्ही आमचें संरक्षण उपेक्षित आहोंत अशा कमी टीका केल्या नाहींत. तुमचें स्वातंत्र्य जाणार आहे येथपर्यंत टीकांची झेप होती. पण जवाहरलालजी म्हणत, आर्थिक विकास हीच युद्धाची तयारी. जें राष्ट्र आर्थिक किंवा औद्योगिक दृष्टया सुदृढ नसतें तें स्वतःचें संरक्षण करूं शकत नाहीं. जीं राष्ट्रें आर्थिक दृष्टया सुदृढ नसतात, तीं लष्करी दृष्टया संरक्षणक्षम ठरत नाहींत असें अनेक वेळां जवाहरलालजींनीं बोलून दाखविलें आहे. लढाई करीत असलेल्या सैनिकांमागें जर उत्पादन करणारी जनता नसेल तर तो सैनिक यशस्वी होत नाहीं. जगांतील युद्धांचा इतिहास काय निराळें सांगतो ?

पंचवार्षिक योजनांमुळें आपल्या देशांत आपण संरक्षणक्षमतेचा कांहीं एक पाया (Base) तयार करूं शकलों. नियोजनवाद हीच संरक्षणाची तयारी असें आम्हीं म्हटलें, मानलें व अनुसरलें. हिंदुस्थाननें जास्तींत जास्त शक्ति नियोजनावर खर्च केली व कमींत कमी शक्ति प्रत्यक्ष लष्करावर खर्च केली. त्याला कारणहि आहे. आम्ही कोणावर आक्रमण करणार नव्हतों व कोणी आमच्यावर आक्रमण करील अशी आमची कल्पना नव्हती. म्हणून जर आम्ही संपूर्ण लष्करी तयारी जशी करावयास नको होती, तसें संपूर्णपणें गाफीलहि राहावयास नको होतें. नियोजनांतील $\frac{1}{4}$ इतका पैसा जर लष्करावर आम्हीं खर्च केला असता तर जगानें आम्हांला युयुत्सु राष्ट्र म्हटलें नसतें. आजच्या घटकेला आम्हांला आमचें लष्करी बळ काय आहे याची कल्पना नाहीं. कारण तें घट्टपणें संरक्षिलेलें गुपित असतें. मात्र डॉक्टरजवळ जसा रोग लपवून ठेवतां येत नाहीं, तसें अमेरिका-ब्रिटनपुढें आम्हांला आमचें लष्करी सामर्थ्य लपवून

ठेवतां आलें नाहीं. त्या कारणामुळें हिंदी लोक फार तर एवढेंच म्हणतील कीं, गेल्या दहा वर्षांत तुम्ही तीन साडे तीन हजार कोटी रुपये जे लष्करावर खर्च केलेत त्यापेक्षां अधिक म्हणजे आणखी तीन चार हजार कोटी रुपये खर्च केले असते तर ही अवस्था आली नसती. सरकार आपला गाफीलपणा आतां नाकारूं शकत नाहीं. पण त्यांनीं दुसऱ्या टोंकाला जाऊन बहुतांश पैसा लष्करावर जरूरी नसतां, खर्च करूं नये. आमच्या शांततावादी अलिप्ततेच्या धोरणाचे वाभाडे ज्यांना काढावयाचे असतील, त्यांनीं जरा संयम दाखविला पाहिजे. राष्ट्राच्या संकटाचे वेळीं जखमेवर सहज बोट दाखवितां येतें. सरकारच्या हातून कांहींहि चुका झाल्या असल्या तरी त्याकरितां सरकार नालायक आहे असें म्हणतां येत नाहीं. सरकारपुढील प्रश्न इतके गुंतागुंतीचे होते व आहेत कीं, कोणतेंहि एक धोरण त्यांनीं पत्करलें असतें तर दुसऱ्या बाजूनें त्यांच्यावर टीका होणें अशक्य नव्हतें.

हिंदुस्थानच्या अलिप्ततेचें धोरण हें सर्वस्वीं चुकलें असें अद्यापपर्यंत सिद्ध झालें नाहीं. चीनच्या आक्रमणाला कोणत्याहि राष्ट्रानें पाठिंबा दिला नाहीं, हें एक त्याचें गमक आहे. रशिया हा चीनचा ध्येयवादी साथी, चीन आपला भाई आहे व हिंदुस्थान मित्र आहे असें रशिया म्हणतो. आम्ही जर अमेरिकेच्या गटांत असतों, तर रशिया आम्हांला मित्र म्हणूं शकला नसता. रशियानें आतांपर्यंत दोन तीन वेळां तरी मित्रत्वाचें दर्शन घडविलें आहे. काश्मीर व गोव्याच्या प्रश्नाच्या वेळीं रशियानें यूनोसंरक्षण समितींत आमच्या बाजूनें व्हेटो दिला. मिग विमानें देण्याच्या बाबतींत ते आम्हांला दिलेला शब्द मागें घेत नाहींत. तेव्हां रशिया हा आमच्या बरोबरचे मित्रत्वाचे संबंध अबाधित राखीत आहे ही गोष्ट स्पष्ट झाला आहे. उलट आपण अशी कल्पना करूं कीं, रशिया, चालू युद्धांत चीनच्या बाजूला गेला असता तर हिंदुस्थानचें काय झालें असतें हें सांगवत नाहीं. रशिया व चीन यांचे भ्रातृत्वाचे संबंध हे अलीकडे कांहीं वर्षे बिघडले

आहेत. क्रुश्चेव हे अधिकारावर आल्यापासून त्यांना स्टॅलिनचें धोरण अमान्य झालें होतें. जगांत साम्यवादाचा प्रचार व प्रसार करावयाचा असेल तर तो शांततेच्या मार्गानें करावा असें क्रुश्चेव म्हणतात. चीनचा शांतिमार्गावर विश्वास नाहीं. म्हणून चीनच्या हिंदी आक्रमणाबद्दल रशिया नाराज आहे. दोघांच्या दृष्टींतला मूलभूत फरक हा रशियाला चिनी आक्रमणापासून अलिप्त राखीत आहे. याचा अर्थ रशिया हाहि अलिप्ततावादी बनत आहे व त्याचा गट तुटत आहे असा निष्कर्ष काढण्याची घाई कोणी करूं नये. कदाचित् आमच्या धोरणाचा रशियावर परिणाम होईलहि. क्युबाच्या बाबतींत रशियानें स्वीकारलेलें धोरण हेंहि तो शांततेच्या मार्गानें जाऊं इच्छित आहे असें सिद्ध करतो. आज रशिया अमुक धोरण पत्करतो, याचा अर्थ तो तेंच धोरण पुढेंहि चालू ठेवील असा भरंवसा नाहीं. साम्यवादी राष्ट्रांचीं धोरणें व प्रबंध हे परिस्थितीनुरूप बदलत असतात. चीनला आशियांत आपल्यापेक्षां बलाढ्य होऊं देऊं नये हा रशियाची आजची इच्छा नसेल कशावरून ?

दुसरा गट अमेरिका ब्रिटनचा. या दोन्ही राष्ट्रांनीं हिंदुस्थानवर आक्रमण होतांच हिंदुस्थानकडे धाव घेतली. हॅरिमन व सँड्स यांनीं प्रत्यक्ष येथें येऊन आमच्या युद्धसामुग्रीची पाहणी केली व जरूर तें साहाय्य त्यांनीं पोहोंचविलें. हिंदुस्थान त्या राष्ट्रांच्या व इतर अनेक राष्ट्रांच्या ऐन संकटांत केलेल्या मदतीबद्दल सदैव कृतज्ञ राहील. त्यांच्या मदतीला त्यांनीं मर्यादा घातलेली नाहीं. दिलेल्या सामुग्रीचा पैसाहि ते मागत नाहींत. उलट कशाचीहि कमतरता ते पडूं देणार नाहींत अशीं लक्षणें दिसतात. आम्ही अमेरिकेच्या गटांत नसतांहि त्यांनीं आम्हांला मदत केली हें विशेष आहे. आशियांत लोकशाहीचा पुरस्कार करणारें मोठें राष्ट्र हिंदुस्थानच आहे व लोकशाही टिकविण्याकारितां हिंदुस्थानला मदत केली पाहिजे हाहि त्यांत हेतु नाहीं

असें नाहीं. हिंदुस्थानचें अलिप्ततेचें धोरण चुकलें असें जे म्हणतात त्यांना ही चहूंकडून होत असलेली मदत दिसत नाहीं काय ? आम्ही जर अमेरिकेच्या गटांत असतों तर रशिया आजच्याप्रमाणें कुंपणावर उभा राहिला नसता. रशियाची आजची तटस्थता फार मोलाची आहे. ती तटस्थता आमच्या अलिप्ततावादामुळें कांहीं अंशानें साधली गेली आहे, हें ज्यांना दिसत नाहीं त्यांना अमेरिका गटांत आम्ही जावें असें म्हणण्याची घाई झाली आहे. त्यापलीकडे जाऊन आम्ही त्यांच्यावर हेत्वारोप करूं इच्छित नाहीं. खुद्द अमेरिका सुद्धां आमच्यावर दडपण आणून आपल्या-गटांत येण्याविषयीं आग्रहानें बोलत नाहीं. कॉमनवेल्थमध्यें आम्ही पहिल्यापासून होतों. श्री. नेहरूंवर त्याकरितां टीकेचा वर्षाव होई. कॉमन-वेल्थमध्यें राहण्यानें आम्ही आमचीं वैरें विसरत आहोंत व भांडवलशाही गटांत गेलों आहोंत असें म्हटलें जाई. हा भडिमार कम्युनिस्ट पक्षाकडून होई. त्या टीकेला आम्हीं दाद दिली नाहीं. कॉमनवेल्थमध्यें आम्ही आहोंत याचा अर्थ कांहीं जण आम्ही अमेरिकन गटांत पूर्णपणें नसलों तरी अंशतः आहोंत असा करतात. कॉमनवेल्थ हा कांहीं गट नाहीं. ती एक ब्रिटिश साम्राज्यांत असलेल्या अगर असणाऱ्या राष्ट्रांची ऐच्छिक संघटना आहे. पण गणिताच्या नियमाप्रमाणें क्ष हा य बरोबर असला व य हा ज्ञ बरोबर असला तर क्ष हा ज्ञ बरोबर आहे असें म्हटलें जातें. ज्यांना जें समजावयाचें असेल तें समजावें. आमचें धोरण जगांतील सर्व राष्ट्रांशीं सलोखा ठेवावा असें आहे.

चीनबरोबर आम्ही पंचशील करार कां केला ? सहजीवन कां मानलें ? रशिया, चीन, अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान वगैरे सर्व राष्ट्रांशीं आम्ही मित्रत्वानें वागलों, पाकिस्तान हें एकच राष्ट्र आम्हांला असें भेटलें कीं, जें काश्मीर प्रश्न विसरूं शकत नाहीं व आमच्याजवळ येत नाहीं. ते व आम्ही कॉमनवेल्थमध्यें असलों तरी नसल्यासारखे आहोंत. पाकिस्तान हें एक अपवादात्मक राष्ट्र आहे.

आशिया-आफ्रिकेंतील बहुतेक सर्व राष्ट्रांचा व आमचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. श्री. नेहरूंचे त्यांतील अनेक नेत्यांशीं तर व्यक्तिशःसंबंध आहेत. सुमारें ६० राष्ट्रें कोणत्याहि गटांत नसणारीं आहेत. त्या सर्व राष्ट्रांनीं चीनचा हिंदी आक्रमणानंतर धिःकार केला. तींहि राष्ट्रें अन्यायाच्या प्रतिकाराकरितां आम्हांला मदत करतील. त्याचेंच एक प्रत्यंतर म्हणजे १० डिसेंबरपासून कोलंबोला भरलेली सहा राष्ट्रांची बैठक. त्या बैठकींत इजिप्त, घाना, कंबोडिया, इंडोनेशिया, ब्रह्मदेश व यजमान राष्ट्र सीलोन होतें. युद्ध थांबविण्याकरितां त्यांनीं एकमतानें योजना अगर ठराव पास केला आहे. त्याचें काय होईल तें आपण पाहूं. ह्या सहा राष्ट्रांतील प्रत्येक राष्ट्र हें हिंदुस्थानचा संपूर्णपणें पाठपुरावा करील असें समजूं नये. त्यापैकीं, आशियांतील राष्ट्रें हीं चीनला भिऊन आहेत, अगर त्यांचे हितसंबंध चीनशीं गुंतलेले आहेत. चीनचा जर ह्या युद्धांत जय झाला, तर चीन आपलाहि फडशा उडवील ही त्यांना भीति आहे म्हणून तीं राष्ट्रें सावधानतेनेंच पावलें टाकीत आहेत. तीं राष्ट्रें अलिप्त आहेत याचा अर्थ तीं राष्ट्रें परस्परांपासूनहि अलिप्त आहेत. ती रशिया-गटापासून, अमेरिकागटापासून व एकमेकांपासूनहि अलिप्त आहेत. अशी ती विचित्र अलिप्तता आहे.

पाकिस्तानचें मात्र या आक्रमणांत साधलें आहे. अमेरिका व ब्रिटननें आम्हांला असा उपदेशाचा घोट पाजला कीं, पाकिस्तानसारखा शत्रु पाठीवर ठेवून तुम्ही चीनला तोंड देऊं शकणार नाहीं. तो उपदेश पटला म्हणूनच नव्हे, पण समजूतदारपणामुळें आम्ही त्या उपदेशाचें ग्रहण केलें. आतां पाकिस्तान व हिंदुस्थानमध्यें बोलणीं सुरू होणार आहेत. पाकिस्तानला जर काश्मीर देऊन टाकला तर चीनचें युद्ध पाकिस्तानवर लादलें जाईल. लडाख हा काश्मीरमध्यें आहे व काश्मीर पाकिस्तानला दिला म्हणजे चीनबरोबर त्यांनीं लढावें अगर तडजोड

करावी. पण पाकिस्तानला युद्धाच्या जबाबदारीशिवाय काश्मीर हवा आहे. लडाखमधून चीनला आम्ही हाकलून द्यावें व नंतरच काश्मीर त्यांच्या स्वाधीन करावा असें ते म्हणत असतील. पण पाकिस्तानचें हें स्वप्न साकार होणार नाहीं. श्री. नेहरू यांनीं म्हटल्याप्रमाणें जोंवर आम्ही युद्धांत गुंतलों आहोंत तोंवर काश्मीरचा प्रश्न शांत डोकीं ठेवून सोडवण्याच्या मनःस्थितींत आम्ही नाहीं. बोलणीं जीं करावयाचीं तीं तेढ व वैर कमी करण्याकरितां. पाकिस्तानची जनता एवढयावर गप्प बसणार नाहीं. त्यांना ताबडतोब काश्मीर हवा आहे. आमचें संकट ही त्यांची संधि. अमेरिकेची मदत मिळाल्यामुळें आम्हांला त्यांचें म्हणणें ऐकावें लागलें. पण जर चिनी आक्रमण झालें नसतें तर मदतीचा प्रश्नहि आला नसता व पाकिस्तानबरोबरचीं बोलणीं सुरू करण्याची गरज भासली नसती. अमेरिकेचा त्याबद्दलचा आग्रह नाकारणें हेंहि शक्य नव्हतें. अशा स्थितींत पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्या बरोबरचीं बोलणीं हीं निर्णायक होणार नाहींत. त्या बोलण्याचा परिणाम उलट झाला तर चीनबरोबर दोस्ती करण्यास पाकिस्तानचे हात शिवशिवलेच आहेत.

एकंदर आमच्या अलिप्ततेच्या धोरणानें आतांपर्यंत तरी आम्हांला धोका दिला नाहीं. सर्व राष्ट्रांची विशेषतः ६० अलिप्त राष्ट्रांची सहानुभूति गमविणें व रशियाला आमच्याशीं लढावयास लावणें मुत्सद्देगिरीचें नाहीं, शहाणपणाचें नाहीं व स्वतःवरचा विश्वास गमावण्यासारखें आहे.

आमच्या अलिप्ततेच्या धोरणामुळेंच चीन हा एकाकी पडला आहे. लौकिक, भौतिक व नैतिक दृष्टया एकाकी पडलेल्या या देशाची ही अवस्था होण्यास अगर करण्यास हिंदुस्थानचें धोरण कारणीभूत झालें नाहीं असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यांनीं म्हणावें.

* * *

३४४४५
९६३२
२८-३-६२

# १०

# चीनचें आक्रमण व प्रतिकार

२० ऑक्टोबरला पहाटे चीननें आक्रमणाची कल्पना नसतां एकाएकीं हिंदुस्थानच्या पूर्व व पश्चिम सरहद्दीवर आक्रमण केलें. उफाळलेल्या समुद्रावर जशा लाटांमागून लाटा याव्यात त्याप्रमाणें चिनी सैन्याच्या धाडी हिंदुस्थानवर कोसळूं लागल्या. त्यांची शस्त्रसामुग्रीहि प्रचंड होती. रणगाडे, मशिनगन्स, उखळी तोफा पर्वतांच्या दुर्गम्य पहाडांतून हिंदुस्थानांत लोटत होत्या. या सर्वांचा अर्थच कळला नाहीं. चीननें एवढा भीषण संग्राम कशाकरितां सुरू केला ? आमचें सेनाबल सरहद्दीवर तुटपुंजें होतें. चिनी सैन्याच्या प्रचंड वादळापुढें तें सैन्य उडून गेलें. प्रतिकाराची शक्ति व प्रतिकाराची सामुग्री हिंदुस्थानजवळ कुठें होती ? डोळ्याचें पातें लवावें न लवावें, तोंच मस्तकावर जबर प्रहार व्हावा, व माणूस बेशुद्ध पडावा तशी आमची भांबावलेली स्थिति झाली.

चिनी सैनिकांना प्रतिकारच नसल्यामुळें ते ठाण्यांमागून ठाणीं व गांवांमागून गांवें सर करीत गेले. त्यांच्या सैन्यांना जेवढ्या वेगानें कूच

करतां आलें तेवढया वेगानें त्यांनीं आगे कूच केलें व जेथें पाऊल ठेवलें तेथें त्यांचा ताबा स्थापन झाला.

हिंदुस्थानांत ही बातमी येतांच आमचें सरकार खाडकन जागें झालें. जनता गडबडली, पण घाबरली नाहीं.स्वातंत्र्यानंतरचें हें पहिलेंच मोठें युद्ध तिला लढावयाचें होतें. चीननें पहिल्या झटक्यांत पूर्व सरहद्दीवरील थागला रिज विभागांत घोला ते किंझमाने ह्या विभागांतील २० मैलांचा टापू काबीज केला. त्याच वेळीं त्यांनीं पश्चिम सरहद्दीवरहि हल्ला चढाविला. चिपचॅप व्हॅलींत आमच्या सैनिकांनीं जीं ठाणीं स्थापिलीं होतीं, तीं ठाणीं चीननें सर केलीं. पहिल्या दिवशीं पूर्व सरहद्दीवरील ५० ते ६० चौ. मैल क्षेत्र त्यांनीं जिंकलें. ही चढाई करण्याकरितां त्यांची तयारी तीन चार महिने तरी चालू होती. एकीकडे चीन तडजोडीचीं बोलणीं व्हावींत म्हणून आभास निर्माण करीत होता व दुसरीकडे आक्रमणाची तयारी करीत होता. आम्ही त्या आक्रमणाला दगेबाजी, पाठींत खंजीर खुपसणें वगैरे विशेषणें लावलीं. आम्हांला चीन समजूं शकला नाहीं. आमचे हेर खातें निरुपयोगी ठरलें आणि आमचा विश्वास हा अनाठायीं होता असें सिद्ध झालें. युद्धें कितीहि हिंसक असलीं, तरी त्या युद्धांत कांहीं एक किमान नीति असते. दरोडेखोर नीति मानीत नाहींत. ते बेसावध लोकांवर निर्घृणपणें हल्ले करतात. चीननें युद्ध पुकारण्यापूर्वीं निर्वाणीच्या मागण्या सादर करावयास पाहिजे होत्या, युद्धाचे हेतु जाहीर करावयास पाहिजे होते व नंतरच सैन्याचे हल्ले करावयास पाहिजे होते. चीननें तें कांहींच केलें नाहीं. म्हणून आम्ही चीननें दगेबाजी केली, दरोडा घातला असें म्हणतों.

चीनच्या आक्रमणाची बातमी येतांच हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्वाला व ऐक्याला अभूतपूर्व स्वरूप प्राप्त झालें. आमच्यांतील भांडणें, मतभेद सारें सारें क्षणांत नष्ट झालें. आम्ही १५ वर्षांपूर्वीं मिळविलेलें स्वातंत्र्य कसें टिकविणार हाच एक प्रश्न पुढें उभा राहिला. आमची एकता ही दुर्बल

नव्हती. कांहींकांहींनीं तर रक्ताच्या शाईनें स्वातंत्र्य-रक्षणाच्या प्रतिज्ञा केल्या. पैशाचा पाऊस पडूं लागला. स्त्रिया, मुलें, वृद्ध, तरुण स्वातंत्र्य-रक्षणाच्या संग्रामांत सर्वस्व अर्पण करण्याच्या घोषणा करूं लागले. ता. २२ ऑक्टोबरला नेहरूंनीं रेडिओवर राष्ट्राला उद्देशून भाषण केलें. त्या भाषणांत खंबीरपणा होता व राष्ट्राला सर्वस्व समर्पण करण्याचें आवाहन होतें; चीनचा धिःकार होता व रणांगणावर पडलेल्या शूर शिपायांना अभिवादन होतें.

जगांतील सर्व देशांना नेहरूंनीं परिस्थितीची जाणीव करून देणारीं पत्रें पाठविलीं व मदतीची विनंति केली. राष्ट्रांमागून राष्ट्रांनीं त्या पत्रांचीं उत्तरें पाठविलीं, त्यांत चीनचा निषेध व हिंदुस्थानबद्दल सहानुभूति होती. अमेरिका, इंग्लंडला पाठविलेल्या पत्रांत ताबडतोब युद्धसामुग्री पाठवा अशाबद्दल तांतडीची विनंति होती. अमेरिकेनें तर अल्पावधींत विमानांनीं पाठवितां येईल तितकी युद्धसामुग्री रवानाहि केली. इंग्लंडनेंहि मदत पाठविली. एवढयावर तीं राष्ट्रें थांबलीं नाहींत. अमेरिकेचे हॅरिमन व ब्रिटनचे सँडस नंतर येथें आले व आम्हांला कोणतीं शस्त्रास्त्रें लागतील याची लष्करी दृष्टया पाहणीहि करून गेले. त्यांचीं शस्त्रास्त्रें येत आहेत व तीं येत राहतीलहि अशी अपेक्षा आहे.

आक्रमणाला सुरुवात झाल्यावर अवघ्या चार दिवसांत चीननें युद्ध थांबविण्याकरितां ३ अटी जाहीर केल्या. त्या अटी आक्रमणापूर्वी जाहीर केल्या असत्या तर विश्वासघाताचा आरोप आम्ही करूं शकलों नसतों. पण चीनला आधीं आपली लष्करी शक्ति दाखवावयाची होती व त्या शक्तीखालीं आम्हांला शरण आणावयाचें होतें. त्यांच्या तीन अटी पुढील-प्रमाणें होत्या—

( १ ) दोन्ही पक्षांनीं शांततेनें सीमा प्रश्न सोडविण्याचें मान्य करावें. शांततेनें सीमा प्रश्न सुटेपर्यंत चीनहिंद सरहद्दीच्या सर्व विभा-

गांत दोन्ही पक्षांनीं प्रत्यक्ष ताब्यांत असलेली रेषा मान्य करावी व लष्करी फौजांनीं त्या रेषेच्या पलीकडे २० किलोमीटर्स जावें.

( २ ) हिंदुस्थानला ही सूचना मान्य असेल तर चीन सरकार उभय पक्षांत सल्लामसलत करून आपले आघाडीवरील संरक्षक पूर्व सरहद्दीवर प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या रेषेच्या उत्तरेला काढून घेण्यास तयार आहे. पण त्याच वेळीं हिंदुस्थान व चीननें मध्य व पश्चिम विभागांतील प्रत्यक्ष ताब्यांत असलेली म्हणजे पारंपरिक रेषा ओलांडावयाची नाहीं हें कबूल केलें पाहिजे.

( ३ ) दोन्ही पंतप्रधानांनीं या सीमा रेषेच्या सोडवणुकीकरितां एकत्र यावें. वगैरे वगैरे.

चीननें निर्णायक खलिता जो पाठविला तो आमचा मुलूख जिंकून पाठविला. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यावर, स्वाभिमानावर व प्रतिष्ठेवर तो हल्ला होता. आम्हांला त्यांनीं लज्जित व अपमानित केलें होतें. अशा प्रकारची मानहानि कोणतें राष्ट्र पत्करील ?

चीनच्या या खलित्याला नेहरूंनीं २७ तारखेला उत्तर पाठविलें. त्या उत्तराबरोबर त्यांनीं सरकारचें म्हणणें कळविलें. तें ७ कलमी होतें. त्यांतील ३, ४ व ५ हीं कलमें महत्त्वाचीं आहेत. तिसऱ्या कलमांत म्हटलें आहे कीं, चीननें आमच्यावर आक्रमण करीत राहावें, हिंदुस्थानचा मोठा भाग व्यापावा व त्या व्याप्त भागाचा उपयोग आपल्या अटी आमच्यावर तडजोड लादण्याकरितां करावा ही भूमिका हिंदुस्थान स्वीकारावयास तयार नाहीं.

चवथें कलम म्हणतें—ज्याला चीन प्रत्यक्ष ताब्यांत असलेली रेषा संबोधते त्या रेषेपासून २० किलोमीटर्स मागें सरावें या चीनच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य किंवा अर्थ नाहीं. 'प्रत्यक्ष ताब्यांत असलेली रेषा' म्हणजे काय ? सप्टेंबरच्या प्रारंभापासून त्यांनीं आक्रमणानें निर्माण केलेली का ही रेषा? ४० किंवा ६० किलोमीटर्स, लष्करी हाणामारीनें व

आरडाओरडीनें पुढें घुसणें व त्यांतील २० किलोमीटर्स उभयतांनीं सोडावें असा आव आणणें ही एक फसवी युक्ति आहे. ती कोणालाहि मूर्ख बनवूं शकणार नाहीं.

पांचवें कलम म्हणतें, जर चीनचें शांततेचें व शांततामय मार्गानें हा प्रश्न सोडवण्याचें वक्तव्य खरें असेल तर त्यांनीं ८ सप्टेंबरपूर्वीं ते सर्व सरहद्दीवर जेथें होते, तेथपर्यंत गेलें पाहिजे. ह्या गोष्टीला चीनची तयारी असेल तरच वाटाघाटींना योग्य वातावरण निर्माण होईल व तंग परिस्थिति सुधारेल. हिंदुस्थाननें ८ सप्टेंबरपर्यंत मागें सैन्यें खेचा ही केलेली मागणी चीननें मान्य केली नाहीं. त्यामुळें त्यांनीं २४ ऑक्टोबरला जें युद्ध-तहकूब करण्याचें नाटक केलें तें तसेंच राहिलें.

चीननें भारतावर टप्प्याटप्प्यानें आक्रमण केलें. ४।५ दिवस मोठी धमाल उडवून द्यावी, विश्रांति घ्यावी व पुनः जोराचें आक्रमण करावें असें त्यांनीं चालविलें. २० ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबरपर्यंत म्हणजे सुमारें चार आठवडेच हिंदुस्थानच्या स्मरणांत कायमचें राहील असें भयंकर आक्रमण झालें. सुरुवातीला नेफा व लडाख या दोन्ही आघाडीं-वर त्यांनीं हल्ले चढविले. नेफा आघाडीवरील हल्ले हे आम्हांला विशेष जाणवले; कारण तेथून आसाम जवळ होता व त्यांनीं आसामवर धडक मारली असती तर हिंदुस्थानची धडगत नव्हती. लडाखमधील हल्ल्यांना त्या मानानें कमी महत्त्व असलें तरी महत्त्व नव्हतें असें नाहीं.

चार आठवड्यांच्या चिनी हल्ल्यानें हिंदुस्थान तर हादरलाच, पण जगहि हादरलें. आसाममध्यें चीन उतरला असता तर कदाचित् जागतिक युद्धहि हिंदच्या भूमीवर सुरू झालें असतें. पण चीननें आज तरी आसामवर स्वारी केली नाहीं.

ह्या चार आठवड्यांच्या युद्धांत चीननें आमची दाणादाण उडवून दिली, पण आमच्यावर अनेक उपकारहि केले. आमचे डोळे उघडले, आम्ही एक झालों व पुढचा मार्ग आम्हांला दिसूं लागला.

नेफामधील बहुतेक भाग त्यांनीं तीन टप्प्यांत व्यापला. धोला, किंझमाने, जांग, तावांग, वालांग व अखेरीस सेला व बोमडिला खिंड सर करून तेजपूरपासून जवळच त्यांनीं आपल्या म्हटलेल्या सीमा रेषेवर ते आले. जांगला प्रतिकार चांगलाच झाला. पण ता. २१ रोजीं बोमडिला घेतांना त्यांना आमचा प्रतिकार झाला नाहीं. सारी तुकडी न लढतां परत बोलाविली गेली. ती घटना कमीपणा आणणारी झाली. नेफामध्यें वालांग येथें १६ ते १८ नोव्हेंबर असे तीन दिवस घनघोर युद्ध झालें. वालांग आम्ही सोडलें व १० मैल मागें गेलों. किबटू पडलें. पश्चिमेचें लोंगजू हेंहि त्यांच्या हातीं गेलें.

नेफामधील विभाग, कामेंग, सुबानसिरी, सिआंग, लोहित हे आहेत. त्यांतील कामेंग व लोहित या पूर्व पश्चिम विभागांत त्यांनीं जोरदार आक्रमणें केलीं. लोहित विभागांतील डिपू खिंडीपर्यंत आपली सरहद्द आहे असें ते म्हणतात. नेफा विभागांतील इतर विभागांत मोठीं आक्रमणें झालीं नाहींत; त्यांनीं सुबानसिरी विभागांत लोंगजू, असाफिल वगैरे ठिकाणे प्रचंड हल्ले करून सर केलीं.

लडाख विभागांतहि चीननें २० ऑक्टोबरपासूनच चढाई सुरू केली. लडाखच्या दोन टोकांवर हे हल्ले होते. एक टोक पँगॉगचें व दुसरें चिपचॅप व्हॅलीचें. सुरुवातीला त्या भागांतील बातमीच येत नव्हती. पण पुढें अशी बातमी आली कीं, चीननें आमच्या चिपचॅपमधील १६ चौक्यांपैकीं ११ चौक्यांवर २० ऑक्टोबरला हल्ले चढविले. उत्तरेकडे हे हल्ले होते. त्या ११ चौक्यांपैकीं ४ ताबडतोब पडल्या व ७ चौक्यांवर जोरदार प्रतिकार झाला. इकडे दाक्षिणेकडे पँगॉग विभागांत ५ चौक्यांवर त्यांनीं हल्ले केले. या पांचहि चौक्या जोरदारपणें लढविल्या गेल्या; पण त्या हातच्या गेल्या.

चिपचॅप व्हॅलींतल्या चौक्या धोक्यांतच होत्या. चुशुल हें महत्त्वाचें

ठाणें दक्षिणेला आहे तें पडलें नाहीं. दौलत बेग ओल्डी आम्हीं सोडून दिलें. गालवान व्हॅली हातची गेली व इतर ठाणींहि आम्हीं गमावलीं.

२७ ऑक्टोबरला चीननें डेमचॉक विभागांतील तीन चार जागीं हल्ले चढविले. डेमचॉक हे पँगॉगपासून १२० मैलांवर आहे. चांगला खिंड प्रतिकार न करतांच गेली. बाकीच्या ठिकाणीं जोराचा प्रतिकार केला. डेमचॉकला काश्मिरी फौजांनीं जोरदार प्रतिकार केला व चिन्यांना मागें हटविलें.

ऑक्टोबर २७।२८ पर्यंत डेमचॉकशिवाय चिनी सरकार हक्क सांगत असलेला सर्व पश्चिम सरहद्दीवरील भाग त्यांनीं काबीज केला. पुढें लवकरच डेमचॉक पडलें व चीननें ती सरहद्द पूर्णपणें आपल्या ताब्यांत आणली. चुशुलवर ते जोराचा हल्ला करणार होते; पण ते थांबले. तेव्हां पश्चिम सरहद्दीपैकीं, दौलतबेग, ओल्डी व चुशुल हीं दोन्हीठाणीं त्यांना घेणें शक्य असून त्यांनीं हात आंखडता घेतला. याचा अर्थ तीं ठाणीं हिंदुस्थानचीं असें त्यांनीं मान्य केलें असावें.

चीननें मध्य विभागावर फारशी गडबड केली नाहीं. कारण त्यांचा म्हणून ज्या बाराहोतीवर ते हक्क सांगत तो त्यांनीं आपल्या हातांत ठेवलाच होता.

हिंदी फौजांनीं कांहीं ठिकाणीं निकराचे हल्ले केले, शौर्य दाखविलें हें खरें, पण चीनच्या सागरासारख्या अफाट सैन्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. जेवढें त्या वेळीं पाहिजे होतें तेवढें घेतल्यावर २२ नोव्हेंबरपासून आपण सर्व आघाडीवर गोळीबार थांबवणार आहों व १ डिसेंबरपासून सैन्यहि परत घेणार आहों असें चीननें जाहीर केलें.

२० ऑक्टोबरला चीननें केलेलें आक्रमण हें जितकें अचानक तितकेंच युद्धविरामाचें हें प्रकटन आश्चर्यकारक होतें. पण असें सांगतात कीं, माओच्या युद्धतंत्रापैकीं तें एक तंत्र आहे. सेनासागर प्रथम

निर्माण करायचा, नंतर तो शत्रूवर लोटायचा, विद्युत्‌गतीनें मुलूख पादाक्रान्त करायचा, नंतर त्या मुलखांत थोडे दिवस स्थिरस्थावर व्हायचें, पुनः एक दोन आक्रमणें करायचीं व एकदम युद्ध थांबवायचें. युद्ध थांबल्यामुळें शत्रु गाफील होतो, पण आपण मात्र जोरानें तयारी करायची व पुनः पूर्वीपेक्षां प्रचंड हल्ला चढवायचा असें तें चिनी साम्यवादी तंत्र आहे. एकाएकीं युद्ध थांबवल्यामुळें व तडजोडीला पाचारण केल्यामुळें जगांतली जनतेची सहानुभूति संपादन करतां येते व आपल्याला तयारी करण्यास सवड सांपडते. पण चीनच्या या युद्धतंत्रांत फसवणूक आहे हें न कळण्याइतका हिंदुस्थान, निदान आतां तरी, मूर्ख राहिला नाहीं. तो चीननें निर्माण केलेल्या आभासामुळें फसणार नाहीं.

महाभारतांत राजनीतिविषयक एक श्लोक आहे.

प्रवक्तव्यं न दातव्यं ।
आशामेव प्रदापयेत् ॥
आशां कालवतीं कुर्यात् ।
कालं विघ्नेन योजयेत् ॥

देतों देतों म्हणावें पण देऊं नये; फक्त आशा देत राहावी. ती आशा लांबणीवर टाकीत जावी व लांबणीवर टाकलेल्या काळामध्यें विघ्नें निर्माण करावींत. कमी अधिक प्रमाणांत सर्वच राज्यकर्ते ह्या सनातन नीतीचा अवलंब करीत असतात. चीननें आमच्या बरोबर हे डावपेच केले, त्यांत दुसरी कोणती नीति अवलंबिली ? चीनची ही नीति ८ वर्षें चालू आहे. त्याच नीतिपैकीं, युद्धविराम हा एक डाव आहे.

चिनी आक्रमणाचें खापर त्या वेळचे संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन यांच्यावर फोडलें गेलें. ते साम्यवादी राष्ट्राचे पक्षपाती आहेत, त्यांनींच हिंदुस्थानला गाफील ठेवलें व युद्धतयारी केली नाहीं वगैरे आरोप प्रथम प्रतिपक्षी व नंतर कॉंग्रेस पक्ष करूं लागला. तेव्हां श्री. कृष्ण मेनन यांच्या-

कडून संरक्षणखात्यापैकीं लढाऊ विभाग काढून घेण्यांत आला व लष्करी उत्पादन त्यांच्याकडे दिलें. पण श्री. मेनन संरक्षणखात्यांत असतां कामा नये असा जोराचा आग्रह धरण्यांत आला. श्री. मेनन यांनीं राजीनामा दिला व नोव्हेंबरच्या सुरवातीला ते मंत्रिपदावरून मुक्त झाले. त्यांच्या जागीं महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची नियुक्ति करण्यांत आली. तारुण्य, तडफदारी वगैरे गुणांमुळें श्री. चव्हाण यांची नेमणूक स्वागतार्ह आहे. श्री. चव्हाण यांनीं आपण स्वतःच्या कल्पना घेऊन दिल्लीला जात आहों व यश मिळविल्याशिवाय परत येणार नाहीं असें घोषित केलें.

श्री. मेनन यांच्या पदच्युतीमुळें अमेरिका फार फार खूष झाली व त्यांच्या मदतीला मर्यादा राहिली नाहीं. श्री. मेननंतर, हिंदुस्थानचे सर सेनापति थापर हेहि निवृत्त झाले व जनरल चौधरी हे सर सेनापति झाल. नेफांतील सरसेनापति श्री. कौल यांनींहि रजेवर गमन केलें व ती जागा श्री. माणेकशा यांना दिली गेली. अशा प्रकारें चीनच्या आक्रमणाला जे जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कारणीभूत झाले त्यांना दूर करण्यांत आलें व नव्या पाटीवर संरक्षणकाम सुरू झालें.

अर्थमंत्री, गृहमंत्री, अन्नमंत्री, उद्योगमंत्री, नभोवाणी मंत्री, वगैरे सर्व मंत्र्यांनीं युद्धाच्या भूमिकेवरून आपापल्या खात्यांचा कारभार सुरू केला. कर्जरोखे, सुवर्णरोखे, निर्यातवाढ, काटकसर वगैरे गोष्टी हातीं घेण्यांत आल्या. धान्याचा तुटवडा पडणार नाहीं असें अन्न-मंत्र्यांनीं सांगितलें आणि उद्योगपति व व्यापारी यांनीं भाववाढ होऊं देणार नाहीं असें आश्वासन दिलें. लष्करी साहित्यांचें अधिक उत्पादन करण्याचे प्रयत्न जारीनें सुरू झाले. त्याची विगतवार माहिती जर दिली गेली नाहीं तर बरें होईल. नभोवाणीवर तर रोज स्फूर्तिदायक बातम्या खणाणत आहेत व शत्रूचे वाभाडे काढले जात आहेत. साराच देश

आतां खडबडून जागा झाला आहे व चीनचा समाचार घेण्यास उद्युक्त झाला आहे.

युद्धप्रयत्नांच्या मदतीकरितां पैशांचा पाऊस पडत आहे व सुवर्णदान केलें जात आहे. २९ कोटीं रुपये व लाखों ग्रॅम सोनें आतांपर्यंत दिलें गेलें आहे. दररोज ही रक्कम व दान वाढत आहे. रस्त्यावरील भिकाऱ्यापासून तों श्रीमंतांतील श्रीमंतापर्यंत सर्व जण आत्मीयतेनें संरक्षण-निधीला मदत करीत आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत अशा प्रकारचे एवढ्या अभिमानाचे प्रसंग फारच क्वचित् आहेत. इतक्या प्रचंड पाठिंब्या-नंतर जर आम्ही चीनचा हल्ला परतवूं शकलों नाहीं तर तो दोष जन-तेचा नाहीं, इतरांचा आहे व इतर परिस्थितीचा आहे असें म्हणावें लागेल. पण तसें होणार नाहीं.

ज्याप्रमाणें संरक्षणखात्यांत पूर्ण बदल केला गेला, त्याप्रमाणें देशां-तील कम्युनिस्टांची धरपकड केली गेली. कम्युनिस्ट पक्षाच्या मध्य-वर्तीनें चिनी आक्रमणाचा निषेध व हिंदी सरकारला पाठिंबा देणारा ठराव पास केला असला तरी त्यांतहि कांहीं चीनपक्ष विस्तारवादी नाहीं असें समर्थन करणारे होते. कम्युनिस्ट पक्षांतला जो रशियावादी गट होता, त्याला हात लावला गेला नाहीं; पण चिनीवादी पकडले गेले. कांहींची अटक ही संभाव्य हेरगिरीमुळें असावी व कांहींची मतप्रदर्शनाबद्दल असावी. पण साऱ्या हिंदुस्थानांत अटक झालेल्यांची संख्या पांचशेंहून अधिक नसावी. कम्युनिस्ट पक्षाचे श्री. डांगे हे या अटकेच्या सत्रानंतर रशियांत गेले आहेत व रशियाच्या दडपणामुळें चिनी आक्रमण थांब-विण्याचा प्रयत्न करणार आहेत. तेव्हां आज तरी हिंदुस्थानांत चीनचा पक्षपाती कोणी मोकळा नाहीं.

चिनी बँका, चिनी रहिवाशी, चिनी वकिलाती या सर्वांचा आतां निकाल लागला आहे. हिंदुस्थाननें आपणहून चीनमधील आपल्या

वकिलाती बंद केल्या. प्रत्यक्ष युद्ध जरी अजूनपर्यंत जाहीर झालें नसलें तरी युद्ध जाहीर झाल्यावर ज्या गोष्टी करतात त्या झाल्या आहेत व तीच तक्रार चीननें केली आहे. चार आठवड्यांत हिंदुस्थान हादरला व त्या चार आठवड्यांत इतक्या घडामोडी झाल्या कीं, त्याकरितां चार काय पण अधिक वर्षे मामुली गतीनें लागलीं असतीं. चीनच्या आक्रमणामुळें आमचें नियोजन धोक्यांत आलें आहे. नियोजनें यशस्वी करण्याकरितां नुसता पैसा असून चालत नाहीं. एक मनोवृत्ति लागते व मानसिक स्वास्थ्य असावें लागतें. तें स्वास्थ्य आज संपलें आहे. आतां देशाला लष्करी तयारीचें वेड लागलें आहे. आमचे नियोजन प्रयत्न सरकार कितीहि म्हणत असलें तरी पूर्वीच्या उत्साहानें होणार नाहींत. चीनला आमचें नियोजन खुपत होतें असें म्हणतात. त्यांचा हेतु सफल होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

गेल्या पार्लमेंटमध्यें युद्धविषयाशिवाय दुसरी चर्चाच झाली नाहीं. सरकारची अशा प्रसंगीं मोठी ओढाताण होते. त्यांना सर्व गोष्टी उघडपणें मांडतां येत नाहींत व हट्टाला पेटलेले सभासद अधिक माहिती द्या असा आग्रह धरत असतात. पण आम्ही लोकशाहींत आहोंत. त्या लोकशाहीचे तोटे सहन न करून कसें चालेल? चीनमध्यें ह्यापैकीं कांहींच होत नाहीं. चर्चा नाहीं, वृत्तपत्रें सरकार देईल त्यापेक्षां जास्त कांहीं प्रसिद्ध करूं शकत नाहींत व लोकहि सरकारविरुद्ध ब्र काढूं शकत नाहींत. हुकूमशाही राजवट ही नेहमींच युद्धपरिस्थितीच्या विधिनिषेधांनीं जखडलेली असते. आमच्याकडे युद्धकाळ असो, किंवा शांततेचा काळ असो, लोकशाहींत कांहीं फरक नसतो. जनता कायद्याच्या कक्षेंत राहून जेवढें आत्मनियंत्रण करील तेवढेंच पदरीं पाडून घ्यावें लागतें.

संरक्षणाकरितां देशांत चहूंकडे संरक्षणमंडळें स्थापन झालीं आहेत.

कम्युनिस्ट वगळून लष्करी व नागरी संरक्षणमंडळांत सर्व पक्ष समाविष्ट केले आहेत. राष्ट्रीय संकटाच्या वेळीं हें होणें अपरिहार्य असतें. मध्यवर्ती व राज्यमंत्रिमंडळें हींहि पक्षविशिष्ट न ठेवतां सर्वपक्षीय करावींत असा आग्रह कांहींचा होता. पण अद्याप सरकारनें तो मानला नाहीं. चहूंकडे कॉंग्रेसचेंच राज्य आहे. पण सरकाराशिवाय सर्वच पक्षांना ओहोटी लागली आहे. कॉंग्रेस-संस्था आज प्रभावी नाहीं. ती सर्व पक्षांत विलीन झाली आहे. कॉंग्रेसचीं अधिवेशनें व वार्षिक बैठक हींहि रद्द झाली आहे. ज्या कॉंग्रेसनें स्वातंत्र्य मिळविलें ती कॉंग्रेस आतां सरकार बनल्यामुळें जनतेंत नेतृत्व करीत नाहीं व ही घटना स्वागतार्ह आहे असें म्हणतां येत नाहीं. पण त्याचा दोष सरकारकडे नसून कॉंग्रेसकडेच आहे. सांगणारे सांगतील नांवानें नसली तर कृतीनें कॉंग्रेसच सर्व करीत आहे, पण हा एक समाधान मानण्याचा प्रकार आहे. देशांतील परिस्थिति ही अशा प्रकारची आहे. २२ नोव्हेंबर रोजीं रात्रीं १२ वाजतां चीननें युद्धबंदी केली व डिसेंबरच्या १ ल्या तारखेपासून आघाडीवरील सैन्य काढून घेण्यास सुरुवातहि केली. हिंदुस्थाननें प्रतिहल्ले केले नाहींत व परतणाऱ्या सैनिकांवर गोळीबार केला नाहीं. पण एवढ्यानें युद्ध बंद झालें असें समजण्याचें कारण नाहीं. दोन्हींकडे तंग वातावरण आहे व दोन्ही राष्ट्रें कदाचित् पुढील युद्धाची तयारी करीत असतील. त्यावरून असें दिसतें का, तडजोडीकरितां बसण्याला जी एक मनोवृत्ति लागते ती निर्माण झालेली नाहीं. आक्रमणाचा प्रतिकार आम्हीं केला नाहीं हें शल्य आमच्या मनांत आहे. पराभूत मनस्थितींत तडजोडी सुरू होत नाहींत व सुरू झाल्या तरी यशस्वी होत नाहींत.


* * *

# ११

# रेषांचा गोंधळ व युद्धबंदी

चीन व भारत यांच्यामध्यें सुरू असलेल्या संघर्षांत रेषांचा गोंधळ उडाला आहे. चीननें या रेषांचें एक घोटाळ्याचें जाळें निर्माण केलें व त्या घोटाळ्यांतून बाहेर पडण्याकरितां हिंदुस्थाननें खुलासे मागितले. चीन जो भाग सोडून जाणार त्या भागांत आम्हीं नागरिक अंमल सुरू केला आहे व चीननें पूर्व सरहद्दीवर तरी त्याला अद्याप हरकत घेतलेली नाहीं. चीनचें हें रेखाकोडें सोडविण्याचा प्रयत्न चालू आहे. त्या संघर्षांचें स्वरूप काय आहे तें हिंदी सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नकाशा-वरून समजून घेण्याचा प्रयत्न करूं या.

घोटाळा जो आहे, तो लडाखमध्यें आहे. लडाखमध्यें चीननें आपलें सर्वस्व पणाला लावलें आहे व तेथील रेषांची भानगड उलगडली म्हणजे हा रेषाप्रश्न उलगडला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण चीन हा रेषांचा प्रश्न सुटूं देणार नाहीं.




वर दर्शविलेला २० किलोमीटरचा पट्टा हा भारताचा आहे, हें चीनला मान्य आहे, पण भारतानें त्यापलीकडे जावें असें चीनचें म्हणणें आहे. या म्हणण्याप्रमाणें भारताला दौलतबेग ओल्डी, मुर्गो, चुशुल, डेमचॉक, शिपकी खिंड हीं ठाणीं सोडलीं पाहिजेत.

## हिंदी भूमिका

पंतप्रधान नेहरूंनीं ऑक्टोबरच्या २७ ला चौ एन् लाय यांना उत्तर पाठविलें त्यांत ८ सप्टेंबर १९६२ पूर्वीं तुम्ही जेथें होतात तेथें परत जा असें कळविलें. याचा अर्थ असा नाहीं कीं, त्यांनीं ८ सप्टेंबरपर्यंत जेवढा मुलूख बळकावला तेवढा आम्ही त्यांचा असें मान्य करितों. सरहद्दीसंबंधीं बोलणीं करावयास जें वातावरण निर्माण होणें अवश्य आहे, तें ह्या पीछेहाटीनें निर्माण व्हावें, हा हेतु.

८ सप्टेंबरपूर्वीं चीन लडाख विभागांत कोठें होता ? काराकोरम खिंडीच्या पूर्वेकडे चिपचॅप नदी, नंतर डेहरा, समझुंगलिंग, कोंगकाला, स्पँगगुर तलाव, रेझांगला, चांगला, जागला, डेमचॉक या रेषेच्या पलीकडे चीन होता, तेथपर्यंत त्यांनीं परत गेलें पाहिजे असा ८ सप्टेंबर पूर्वीच्या हद्दीपर्यंत परत जा असें आमच्या पंतप्रधानांच्या सांगण्याचा हेतु.

ऑक्टोबर २० पासून त्यांनीं जो हल्ला केला, त्यांत त्यांनीं या भागांत १२०० चौ. मैल अधिक प्रदेश बळकावला. चिपचॅप नदीचें खोरें, गालवान, कोंगकाला, स्पँगगुर, रेझांगला, जाराला, डेमचॉक यांपुढें चीन गेला. आम्ही ज्या चौक्या त्या विभागांत बसविल्या होत्या, त्या सर्व चीननें जिंकल्या. तेव्हां ८ सप्टेंबरपूर्वीचा व २२ ऑक्टोबरच्या सुमाराचा जिंकलेला मुलूख यांत पश्चिम विभागांत १०००।१२०० चौ. मैलांची भर त्यांनीं टाकली. हा नव्यानें आक्रमिलेला प्रदेश त्यांनीं सोडला पाहिजे, तरच तडजोडीला बसतां येईल असें आमचें म्हणणें व तें सरळ, स्पष्ट व समजण्यासारखें आहे.

चीननें याच बाबतींत अनेक घोटाळे निर्माण केले आहेत. हक्काची रेषा, प्रत्यक्ष ताब्यांत असलेली रेषा व आक्रमिलेली रेषा अशा तीन रेषा त्यांच्या आहेत. पण त्याहि बाबतींत निश्चित असें कांहींच नाहीं. त्या

रेषा ते सोईप्रमाणें बदलतात. १९५६ मध्यें त्यांनीं हक्क सांगितलेली रेषा अगदीं बरोबर आहे असें चौनें नोव्हेंबर १९५९ मध्यें सांगितलें. ती रेषा काराकोरम खिंडीपासून सुरू होते. चिपचॅप नदी सोडून खालीं दक्षिणेकडे गालवान नदीच्या वळणावरून ती सामझुंगलिंगकडे जाते. पुढें ती कोंगकाला खिंडीला पोहोंचते. हॉटस्प्रिंग बाजूला टाकून ती खालीं सरळ जाराला, डेमचॉकवरून बाक घेऊन आणखी खालीं उतरते. या रेषेला कांहीं आधार नाहीं. पण ती १९५९ सालीं चौनें आपल्या हक्काची रेषा आहे असें म्हटलें. प्रत्यक्ष ताब्यांत असलेली त्यांची १९५९ ची रेषा, ही खरोखर रेषा नव्हती. त्या रेषेवर त्यांचीं कांहीं व्याप्त ठिकाणें होतीं. तीं प्रत्यक्ष ताब्यांत असलेली रेषा पुढीलप्रमाणें—

हाजी लँगरच्या उत्तरेला जेथें अक्साई चीन रस्ता जातो, तेथून ती सुरू होते. तेथून ती अगदीं सरळ सामझुंगलिंगला पोहोंचते. तेथून ती कोंगकाला, डम्बुगुरु, खुरनाक किल्ला, स्पँगगुरपर्यंत येते. त्यापुढील विभाग त्यांच्या ताब्यांत नव्हता. चौ ज्याला १९५९ च्या रेषेचा जुनी ताब्यांत असलेली रेषा म्हणून सांगतात, ती वरील रेषा होय. १९५६ ची हक्क सांगितलेली रेषा व १९५९ ची प्रत्यक्ष ताब्यांत असलेली रेषा कोणती हें वर सांगितलें. पण चीननें १९५९ प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या रेषेमध्यें आतां आक्रमणानंतर बनवाबनवी केली आहे. ऑक्टोबरच्या आक्रमणानंतर त्यांनीं जो विभाग व्यापला, तो १९५९ च्या नोव्हेंबर-मध्येंच आमच्या ताब्यांत होता असें त्यांचें म्हणणें. हें धडधडीत खोटें आहे. १९५९ च्या नोव्हेंबरमध्यें आज आक्रमिलेला प्रदेश त्यांच्या ताब्यांत नव्हता, हें त्यांना आम्हांला व सर्व संबंधित राष्ट्रांना माहीत आहे. तो भाग त्यांनीं १९५९ नंतर ७ सप्टेंबरपर्यंत व्यापला व ऑक्टोबर आक्रमणानंतर ७ सप्टेंबर नंतरचा भाग व्यापला. तेव्हां चीनच्या लडाख आक्रमणाचे अनेक टप्पे आहेत. पहिला टप्पा

१९५६–५७ चा. त्या वेळीं त्यांनीं अक्साई चीन घेतला व रस्ता बांधला. दुसरा टप्पा १९५९ चा, तिसरा टप्पा ७ सप्टेंबर १९६२ पर्यंतचा व चौथा टप्पा २४ ऑक्टोबरपर्यंतचा.

१९६० सालीं चीननें आपली १९५६ सालची हक्काची रेषा बदलली व वाढविली. १९५६ ची रेषा कमी आहे असें वाटल्यावरून त्यांनीं ही वाढ केली असावी. या सर्व प्रकारावरून चीनच्या हक्काच्या रेषा बदलतात, त्याच्या ताब्यांत असलेल्या रेषा बदलतात व हक्क नसलेल्या व ताब्यांत नसलेल्या मुलखावरहि ते आक्रमण करीत असतात.

चीनचें म्हणणें आम्ही ७ नोव्हेंबर १९५९ रोजीं त्यांच्या ताब्यांत असलेली रेषा मान्य करावी व त्या रेषेपलीकडे २० किलोमीटर्स जावें, आणि ७ नोव्हेंबरची रेषा कोणती तर तें सांगतात ती. हा जुलूम आहे. ७ नोव्हेंबरची रेषा म्हणजे २४ ऑक्टोबरपर्यंत त्यांनीं जिंकलेल्या मुलखाची रेषा. ही आम्ही मान्य करणें म्हणजे त्यांनीं आक्रमणच केलें नाहीं असें मानणें.

आम्ही जो २० किलोमीटर्स पट्टा सोडून द्यायचा, त्यांत दौलत बेग ओल्डी, मुरगो, सोंगत्रासालु, चुशुल, डेमचॉक, कौइरिक, शिपकी खिंड येते.

## मध्य व पूर्व विभाग

मध्य विभागांत बाराहोती ही आमच्या ताब्यांत आहे असें आम्ही म्हणत होतों. पण ती आतां त्यांची आहे आहे असें आम्हीं मानलें पाहिजे व २० किलोमीटर्स पट्टा मोकळा केला पाहिजे !


पूर्व विभागांत त्यांनीं नेफाचा बराच भाग व्यापला; पण त्यांनीं आपणहून तो व्याप्त मुलुख सोडण्यास सुरुवात केली आहे. ते कोठपर्यंत मागें जातात हें पाहावयाचें आहे. पण चौंच्या तीन कलमी सूचनेप्रमाणें मॅकमहोन रेषेच्या दक्षिणेला २० किलोमीटर्सचा पट्टा आम्हीं

मोकळा सोडावयाचा आहे! त्याचा अर्थ थागला, तावांग, लोंगजु, गेलिंग, किबुथु, वालांग, डिपू खिंड आम्हीं सोडली पाहिजे. हीं सर्व मोक्याचीं ठाणीं आहेत. तीं खाली केलीं तरी चीनला तीं पुनः जिंकावयास वेळ लागणार नाहीं व तीं जिंकून पुढें नेफा व आसाममध्यें शिरणें त्यांना कठीण जाणार नाहीं.

८ सप्टेंबरपूर्वी बाराहोती हें चीनच्या ताब्यांत नव्हतें. त्या बाबतींत चीन व हिंदुस्थान यांच्यामध्यें असें ठरलें होतें कीं, बाराहोतीचा कारभार हिंदुस्थाननें चालवावा. मात्र तेथें लष्कर असूं नये. चीननें तो ठराव मोडला.

पूर्व विभागांत लोंगजु हें १९५९ च्या ऑगस्टपर्यंत हिंदुस्थानच्या ताब्यांत होतें. त्या सालीं चीननें आमच्या फौजेवर हल्ला केला. त्यानंतर तेथें कोणाचाहि अंमल नाहीं. धोला व किंझमाने विभाग हा हिंदुस्थानच्या ताब्यांत ऑक्टोबरमधील आक्रमणापर्यंत होता. तो चीननें त्या आक्रमणांत ताब्यांत घेतला.

आमचा असलेला मुलूख आम्ही खाली करायचा व तडजोडीला बसायचें हा अजब प्रकार आहे. उलट चीनचा नसलेला व चीननें अनधिकारानें बळकावलेला मुलूख त्यांनीं सोडून देणें हें सयुक्तिक आहे. पूर्व व मध्य विभागाला जें तत्त्व ते लागू करतात, तेंच तत्त्व लडाखला कां लागूं करूं नये? त्यांनीं अक्साई चीन पलीकडे आपल्या हद्दींत जावें व २० किलोमीटर्स मागें हटावें. आमची २० किलोमीटर्स हद्द आम्ही खाली कां करावी? केवळ चीन दांडगाई करतो म्हणून? हा न्याय नाहीं, नीति नाहीं, तडजोडीची सूचक घटना नाहीं. ८ सप्टेंबर पूर्वीच्या हद्दींत चीननें जावें असें सांगतांना नेहरूंनीं जास्त सभ्यता दाखविली आहे. केवळ संघर्ष नको, युद्ध नको, शांतता हवी म्हणून नेहरूंनीं ८ सप्टेंबरची रेषा घोषित केली. मुख्य प्रश्न आहे तो लडा-




४ नोव्हेंबर १९६२ रोजीं चौ एन् लायनें तीन कलमी केलेल्या सूचनेप्रमाणें नेफा विभागांतील २० किलोमीटर्सचा हिंदनें खाली करावयाचा पट्टा. तो काळा दाखविला आहे. त्या सूचनेप्रमाणें तावांग, लेंगजु, जेलिंग, किबुटु व वालांग सोडावे लागतील.

खचा व त्या बाबतींत चीन रेसभरहि मागें सरकण्यास तयार नाहीं. चीन म्हणतो हिंदुस्थाननें आमच्यावर अशा अटी लादल्या आहेत कीं जणूं काय आम्ही पराभूत केले गेलों आहोंत. जय पराजय हा जर शस्त्रास्त्रांनींच ठरणार असेल तर तडजोडी कशाला?

चौ एन् लाय यांनीं २८ नोव्हेंबर १९६२ रोजीं श्री. नेहरूंना पाठविलेल्या पत्रांत म्हटलें आहे, 'नोव्हेंबर १९५९ रोजीं प्रत्यक्ष ताब्यांत असलेल्या रेषेपासून चीनचे शिपाई २० किलोमीटर्स मागें जातील, याचा अर्थ आत्मसंरक्षणार्थ केलेल्या लढ्यांत ते जेथवर पोहोंचले होते तो भाग ते सोडून देतीलच; पण ८ सप्टेंबर किंवा २० ऑक्टोबर १९६२ रोजीं ते जेथें होते त्याच्याहि मागें जातील." पण यांत खरी मेख ७ नोव्हेंबर १९५९ ची आहे. ते त्या तारखेला कोठें होते हें चौ ठरवणार!

शेवटीं चौनें दमहि दिला आहे. 'आम्ही एकट्यानें माघार घेतल्यानें दोन्हीकडचीं सैन्यें लढणारच नाहींत व सरहद्दीवरचे खटके उडणारच नाहींत अशी खात्री देतां येत नाहीं. उलट जर हिंदुस्थाननें सहकार्य केलें नाहीं, तर आजची युद्धबंदी न टिकणें संभवनीय आहे.' चीननें हें युद्ध-विरामाचें नाटक करून शांतीचा व सामोपचाराचा आभास निर्माण केला आहे.

* * *

# १२

# भविष्यकाळ

हिंदुस्थानचे पुढारी असें म्हणत आले आहेत कीं, येथें एकाहि चिन्याला आम्ही राहूं देणार नाहीं; जोंवर एक चिनी माणूस येथें असेल तोंवर युद्ध थांबणार नाहीं. ही घोषणा हिंदी लोकांच्या भावना उचंबळून सोडणारी आहे. त्याचबरोबर आम्हीं असेंहि पुकारलें आहे कीं, ८ सप्टेंबरपूर्वी चिनी फौजा जेथें होत्या, तेथपर्यंत त्या मागें घेतल्या गेल्याशिवाय तडजोडीला वातावरण तयार होणार नाहीं. ह्या तडजोडी जर शेवटचा चिनी माणूस हाकलून देण्याकरितां असतील तर चीन सरकार वाटाघाटीला बसेल अशी अपेक्षा करण्यांत काय अर्थ? तडजोडीला बसावें व त्या बैठकींत हिंदुस्थानांतील एकहि इंच जागा चीनची नाहीं असें सिद्ध करावें हा ह्या तडजोडीला बसण्याचा आमचा हेतु असावा. पण अशा बैठकी इतक्या झाल्या आहेत कीं, त्या एरंडाच्या गुऱ्हाळांतून उसाचा एकहि थेंब निघेल असें वाटत नाहीं. तथापि स्वतंत्र व सभ्य राष्ट्रांना समंजसपणा दाखवावा लागतो. सत्य हें सांगून चालत नाहीं, तें पटवावें लागतें व आचरावें लागतें. आमच्या मनांत व बुद्धींत

चीननें आक्रमिलेला भाग आमचा आहे याबद्दल घोटाळा नाहीं व संदेह नाहीं. अक्साई चीनचा रस्ता हिंदुस्थानचा आहे हें चीननें कबूल करावें व आम्ही चीनला तो रस्ता मुलकी व्यवहाराकरितां वापरूं द्यावा एवढ्याचपुरती तडजोड होऊं शकेल. यापलीकडे तडजोड करण्याची शक्यता नाहीं. श्री. नेहरूंनीं आपण हा रस्ता मुलकी व्यवहाराकरितां वापरण्यास द्यावयास तयार आहोंत असें अगदीं शेवटीं शेवटीं कळविलें व चौनें तें म्हणणें फेटाळूनहि लावलें. तेव्हां तडजोड कशाची करणार हें समजत नाहीं. पूर्व किंवा मध्य विभागांतील चार दोन ठाण्यांबद्दल वाद आहेत. पण त्याबद्दल तडजोड होऊं शकेल. तडजोड होणें अशक्य असेल तर लडाखबद्दल. त्या विभागांतील कांहीं ठाणीं चीन सोडून देईलहि. पण त्याचा अर्थ चीन हिंदुस्थानच्या हद्दींतून निघून जाईल असें नाहीं. ह्या कारणामुळें हिंदुस्थानाच्या पुढाऱ्यांना संरक्षक युद्ध करण्यावांचून गत्यंतर नाहीं. मग ही तडजोडीची भाषा कशाला? हिंदुस्थानला लष्करी तयारी करण्यास वेळ पाहिजे, त्याकरितां हें काल-हरण असावें.

आम्ही लडाखच्या मालकीबद्दल जितके निःसंदिग्ध आहोंत तितका चीनहि निःसंदिग्ध आहे. तो भाग त्यांच्या ताब्यांत आहे. तेहि संरक्षक युद्ध करीत आहेत व आम्हीहि करीत आहोंत. पण चीनला ही मालकी सिद्ध करतां आली नाहीं; म्हणूनच त्यांनीं संरक्षणाच्या नांवाखालीं आक्रमण केलें. तडजोडी न्यायाच्या भूमिकेवरून होत असतात व युद्धें शस्त्रास्त्रांच्या बळावर होत असतात. आपल्या बाजूला न्याय आहे हें दुर्बळांना सिद्ध करतां येत नाहीं. अन्याय हा शस्त्रबलांनी न्याय ठरतो अशी दुर्दैवी परिस्थिति आहे. आमच्यावर शस्त्रबलांनीं न्याय सिद्ध करण्याचा प्रसंग आला आहे!

हिंदुस्थाननें लष्करी तयारीकरितां गेलीं पंधरा वर्षें खर्चीं केलीं नाहींत ही चूक झाली. पण चुकाभोंवतीं घुटमळून पुढचें पाऊल टाकतां

येणार नाहीं. तीच काय पण अनेक चुका आम्हीं केल्या आहेत. मुख्य चूक शेजारच्या राष्ट्रावर विश्वास टाकला व शांततेकरितां प्रयत्न केला ही होय. आतां आम्ही लष्करी तयारी करायला लागलों आहोंत. हिंदुस्थाननेंच जगांत ही चूक केली नाहीं. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी इंग्लंडनें काय केलें? हिटलरचे स्टॉर्म ट्रुपर्स जग जिंकण्याची तयारी करीत असतां चेंबरलेन काय करीत होते? त्यांनीं हिटलरचें अनुकरण केलें असतें तर त्यांना इंग्लंडनें पाठिंबा दिला नसता. त्यामुळें हिटरलनें युरोपमध्यें कडाडून हल्ले चढविले. युरोपमधील राष्ट्रें एकामागून एक कोसळून पडलीं. इंग्लिश चॅनल जर आडवा नसता तर फ्रान्सची जी गत झाली तीच इंग्लंडची झाली असती. इंग्लंडनें विमानी हल्ले धैर्यानें सहन केले व ती आपत्ति भोगीत असतां लष्करी तयारी सुरू केली. चेंबरलेन जाऊन चर्चिल आले तरी एकाएकी बदल झाला नाहीं. रशिया त्या वेळीं कमी प्रबळ नव्हता. जर्मनीपासून पुढें फटकून निघालेल्या व दोस्त राष्ट्रांना मिळालेल्या रशियाला स्टॅलिनग्राडपर्यंतचा आपला मुलूख गमवावा लागला. हिटलर म्हणत असे एकाच वेळीं दोन आघाडीवर लढणें चूक आहे. पण हिटलरच्या हातीं परिस्थिति राहिली नाहीं. त्याला अनेक आघाड्यांवर लढावें लागलें व त्यांत त्याचा नाश झाला. जगांतील बलाढ्य म्हणविणाऱ्या राष्ट्रांची जर ही स्थिति होते, तर हिंदुस्थानची हेटाळणी करण्यांत अर्थ नाहीं. म्हणून आम्ही अंतिम विजय आमचा होणार असें म्हणत आहोंत. आमचे तत्त्वज्ञानी राष्ट्रपति 'यतो धर्मः ततो जयः' असें वचन सांगत असतात. तेव्हां आतां आम्ही अंतिम विजयाची तयारी करूं लागलों आहोंत. याचा अर्थ आम्ही म्हणतों त्याप्रमाणें अखेरचा चिनी माणूस घालवीपर्यंत युद्ध करणार आहोंत, व तें युद्ध जिंकणार आहोंत. जनतेनें आमच्या पुढाऱ्यांचा शब्द प्रमाण मानला आहे व येणाऱ्या आपत्तींना तोंड देण्याची तयारी दाखविली आहे. त्या आपत्ति आमची कसोटी पाहणाऱ्या ठरणार आहेत.

हिंदी पुढारी जरी सन्माननीय तडजोडी करूं शकले तरी जनता त्यामुळें संतुष्ट होणें कठीण, इतक्या जनतेच्या भावना आज भडकलेल्या आहेत. ८ सप्टेंबरपूर्वी चीन जेथें होता तेथें त्यांनीं जसें जावयास पाहिजे, त्याचप्रमाणें ८ सप्टेंबरपूर्वी आमच्या ज्या भावना होत्या, त्या पुनः आल्या पाहिजेत, तरच तंग वातावरण जाऊन तडजोडीला वातावरण अनुकूल होईल. त्या तडजोडींतून कांहीं निष्पन्न होणार नाहीं असें आम्ही गृहीत धरून चाललें पाहिजे व लष्करी तयारी करीत राहिलें पाहिजे. इंग्लंड-अमेरिकेकडून लढाईचें साहित्य मिळालें आहे व मिळेलहि. पण उसनी सामुग्री आणून युद्धें लढतां येत नाहींत. ती सामुग्री कांहीं काळापुरतीच उपयोगी पडते. आम्हांला स्वतःची व स्वतःच्या देशांतली सामुग्री तयार करावयास पाहिजे. ती सामुग्री तयार करावयास वेळ लागेल. पण असें कोणी समजूं नये कीं, युद्धसामुग्रीची तयारी होतांच विजयश्री आमच्या गळ्यांत पडेल. त्याहि वेळीं पराभवाचे प्रसंग येतील व संकटांना तोंड द्यावें लागेल. पाकिस्तान स्वस्थ बसेल असेंहि समजण्याचें कारण नाहीं. कांहींहि असलें तरी हिंदुस्थाननें जो आपल्या भवितव्याचा नकाशा रेखाटला होता तो आतां बदलावा लागेल. आतांपर्यंत आम्ही आर्थिक नियोजनें केलीं, आतां संरक्षक नियोजनें आम्हांला करावीं लागणार आहेत. आर्थिक नियोजनाचे आचार्य जरी त्या नियोजनांत थोडी काटछाट होईल असें म्हणत असले तरी ती त्यांची सदिच्छा आहे, वस्तुस्थिति नाहीं. २८ दिवसांच्या चिनी आक्रमणानें आमच्या पंधरा वर्षांच्या कार्यक्रमाला सुरुंग लावला एवढें खरें. आमची शांततावादी दृष्टि असतां आम्ही आतां संरक्षणवादी होत आहोंत. आम्हांला नुसतें युद्ध जिंकायचें नाहीं तर शांतताहि जिंकायची आहे. पण हें पुढचें कार्य आहे. हिंदुस्थान हा आतां जगांतल्या अनेक राष्ट्रांप्रमाणें लष्करी तयारीला लागलेला व लष्करी तयारींत सांपडलेला देश होणार आहे. ही दुर्दैवी घटना आहे; पण ती बदलणें आमच्या हातांत राहिलें नाहीं.

हिंदुस्थानला आतां चीनच तेवढा लढणारा शत्रु राहिला नाहीं.पाकिस्तानचे छोटे मोठे पुढारीहि जिहादसारखी भाषा वापरूं लागले आहेत. त्यांना काश्मीर हवा आहे. तो कसा घेतां येईल याचा ते विचार करीत आहेत. त्यांच्या बाजूला फक्त इंग्लंड-अमेरिका नाहीं तर चीनहि आहे. चीनच्या लढ्यांत जसा चीन एकटा पडला, तसा पाकिस्तानच्या लढ्यांत हिंदुस्थान एकटा पडणार आहे.स्वतःच्या स्वार्थाकरितां चीन पाकिस्तानचा पक्ष घेत आहे व इंग्लंड-अमेरिका हेहि निराळ्याच कारणाकरितां पाकिस्तानचा पक्ष उचलून धरीत आहेत. तेव्हां हिंदुस्थानला नुसता चिनी माणूस आमच्या देशाबाहेर घालवायचा नाहीं, तर पाकिस्तानला आहे तेथेंच ठेवावयाचा आहे. चीननें लडाख पचविला आणि पाकिस्ताननें काश्मीर घेतला तर हिंदुस्थानची परिस्थिति शोचनीय होईल. चीनला बाहेर घालविला व पाकिस्ताननें काश्मीर घेतला तरी तो पराभवच होईल; किंवा चीन आंत आला व पाकिस्तान आहे तेथेंच राहिला तरी हिंदुस्थाननें जय मिळविला असें होणार नाहीं. अशा परिस्थितींत हिंदुस्थाननें आपला बचाव आपणच केला पाहिजे.

चालू घडामोडींत रशिया हा तटस्थ आहे ही एक स्वागतार्ह घटना आहे. रशिया व चीनचें कांहीं कारणांकरितां बिनसलें आहे. त्यांत साम्यवादाचा प्रचार शांततेनें करावा, कीं युद्धानें ह्या प्रश्नाचा जरी गाजावाजा होत असला तरी खरीं कारणें निराळींच असलीं पाहिजेत. त्या दोन साम्यवादी राष्ट्रांत एक प्रबळ स्पर्धा निर्माण झाली आहे. रशियांत क्रांति केलेल्या रशियन साम्यवाद्यांना चीननें आपल्यापेक्षां प्रबळ व्हावें हें मानवत नाहीं. त्यांची ती सत्तास्पर्धा मिटली अगर मूलभूत दृष्टिकोन बदलले तर रशिया आजची तटस्थता कायम टिकवील असा निर्वाळा कोण देऊं शकेल ? म्हणून पाकिस्तानकरितां अमेरिका व ब्रिटन आमच्या विरुद्ध गेल्यास रशिया आमच्या बाजूला येईल व चीनला

व पाकिस्तानला शह देण्याइतकी मदत आम्हांला करील अशी आशा बाळगण्यांत अर्थ नाहीं. रशियानें हिंदुस्थानला संपूर्ण मदत केली, तर ती जागतिक युद्धाला कारणीभूत होणार नाहीं हें तरी कोणीं सांगावें ? रशियानें क्युबांत घेतलेली माघार ही पुढील युद्धाची द्योतक नसेल कशावरून ? तेव्हां चीनच्या आक्रमणाचा प्रश्न हा मर्यादित राहावा, पाकिस्तानचा प्रश्न त्यांत येऊं नये व जागतिक युद्धाचें रणक्षेत्र हिंदुस्थान होऊं नये अशी आमची इच्छा आहे. अशा स्थितींत आमचे कांहीं मित्र म्हणतात त्याप्रमाणें आम्ही ब्रिटन-अमेरिकेच्या गटांत जाणें कसें शहाणपणाचें ठरणार आहे हें तेच जाणोत. हिंदुस्थान अमेरिकेच्या गटांत गेल्यावर रशिया आजची तटस्थता टिकवील असें समजणें धाष्टर्याचें आहे.

या सर्व परिस्थितीचा विचार करतां आजवरचें आमचें अलिप्ततेचें धोरण हें नुसतें बरोबर आहे एवढेंच नव्हे तर आम्ही आत्मसंरक्षक आहों या आमच्या वृत्तीला पोषक आहे. जगामध्यें अमुक अमुक घडणार आहे, म्हणून अविचारानें धोरण बदलणें इष्ट नाहीं.

चीननें ज्या कारवाया केल्या त्यांचा अर्थ तर्कानेंच लावावा लागतो. त्यांतील एका गोष्टीचा अर्थ लावणें कठीणच आहे. लडाखमध्यें चीनच्या ताब्यांत अक्साई चीनचा एक तृतीयांश मुलूख असतां चीननें आक्रमण कां केलें ? नेफा त्यांनीं घेतला काय व सोडला काय हें कळत नाहीं. लडाखचा सौदा करतां यावा म्हणून ही कारवाई असावी. ज्याचा ताबा त्याची मालकी हें चीनला ठाऊक आहे. असें असतां ताब्यांत असलेल्या मुलखाची मालकी हिंदुस्थानला मान्य करावयास लावावी, या हेतूनें चीननें हें आक्रमण सुरू केलें असेल असें वाटत नाहीं. आक्रमणच जर करावयाचें तर तें हिंदुस्थाननें करावयास पाहिजे होतें. हिंदुस्थानच्या मुलुखांत शिरलेल्या चीनला हाकलून लावण्याकरितां आम्हांला दुसरा मार्ग नव्हता. पण हिंदुस्थाननें चीनला युद्धाची धमकीहि दिली नव्हती. अशा स्थितींत ताबा घेऊन मालक बनलेल्या एका देशानें हें आक्रमण कां सुरू केलें ? ते ज्या विभागावर हक्क सांगत आहेत, तो विभाग

आक्रमणाचा डांगोरा न पिटतां हळूहळू त्यांना घेतां आला असता. पण ज्या अर्थी त्यांनीं एवढें प्रचंड युद्ध आरंभिलें त्या अर्थी त्यांचे युद्धहेतु आज जरी मर्यादित आहेत असें दिसत असलें तरी ते तसे राहणार नाहींत. एकीकडे काश्मीर, दुसरीकडे हिमाचल, पंजाब व तिसरीकडे आसाम घेण्याची महत्त्वाकांक्षा ते बाळगून असले पाहिजेत. १९५९ ते १९६२ या काळांत हिंदुस्थान ते कुरतडीतच होते. नेफा त्यांनीं सोडला हें खरें आहे. जगामध्यें त्यांची आक्रमक म्हणून विटंबना झाली म्हणून तो सोडला किंवा लडाख पचवितां यावा म्हणून सोडला असेल. त्यांनीं आमच्या शक्तीची चांचणी केली आणि त्यांची खात्री झाली कीं, नेफा घेणें योग्य हवामानांत अशक्य नाहीं. बर्फाचा मोसम संपल्यानंतर एप्रिल मेमध्यें त्यांना ऑक्टोबरमध्यें केलेल्या चढाईपेक्षां अधिक प्रचंड चढाई करतां येईल. एप्रिल मेपर्यंत हिंदुस्थान लष्करी तयारी काय करणार हें त्यांना ठाऊक आहे. तोंपर्यंत तडजोडींत ते काळ घालवतील, जगाचे गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न करतील, पाकिस्तानच्या साहाय्यानें काश्मीर प्रश्न निकराला आणतील, परकीय मदतीचा वेग व वृत्ति जरा थंड करतील आणि स्वतःची तयारी जास्त करूं शकतील. एप्रिलमध्यें जर चीननें जोराचें आक्रमण केलें नाहीं, तर त्यांचे युद्ध-हेतु मर्यादित आहेत; निदान तात्पुरते मर्यादित आहेत असें म्हणतां येईल.

हिंदुस्थान एकवटला आहे, यांत तर वादच नाहीं. हिंदुस्थानांतील साम्यवादी पक्ष कांहीं तरी उठाव करील अशी चीनची कल्पना नसेलच असें नाहीं. तो पक्ष उठला नाहीं. एवढेंच नव्हे, तर इतर पक्षांबरोबर तो चीनचा धिःकार करूं लागला. हिंदुस्थान अभेद्य राहिला, पण हिंदु-स्थानची जनता कशी सैरावैरा धावते हेंहि त्यांना तेजपूरला पाहावयास सांपडलें. पण त्याहिपेक्षां बोमडिला येथें एका सुसज्ज लष्करी विभागानें घेतलेली माघार हीहि त्यांनीं पाहिली. या दोन्ही घटना आम्हांला कमीपणा आणणाऱ्या ठरल्या.

९३७५६३

चीनच्या आक्रमणानंतर जवळ जवळ ६० अलिप्ततावादी देशांनीं आम्हांला सहानुभूति दाखविली. त्यांतील सहा राष्ट्रांनीं युद्धविराम व्हावा व तडजोडीच्या बैठकीला बसावें म्हणून प्रयत्न केले. कोलंबो येथें लंका, कंबोडिया, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, इजिप्त व घाना या देशांतील प्रमुख डिसेंबरच्या १० तारखेपासून एकत्र बसले व त्यांनीं एकमतानें ठराव केला. तो ठराव काय आहे हें अद्याप बाहेर आलें नाहीं. पण तो ठराव ज्या अर्थीं एकमताचा आहे, त्या अर्थीं ठरावांत कांहीं विशेष नसावें. चीनला आक्रमक म्हणावें, ८ सप्टेंबरपूर्वी ते जेथें होते, तेथें जावयास भाग पाडावें वगैरे भांडणाचे मुद्दे परिषदेनें टाळले असावेत. दोघांनाहि जसें आहांत तसें राहा व तडजोडीला बसा असें त्यांनीं सांगितलें असावें. तसें नसतें तर परिषद मोडली असती, किंवा पुढें ढकलली गेली असती. पण जोंपर्यंत तो ठराव बाहेर आला नाहीं, तोंपर्यंत त्याचा विचार करणें अकालीं होईल. त्यांचा तो मसुदा हिंदुस्थान व चीन ह्या दोन्ही देशांना मान्य व्हावयास पाहिजे, तरच पुढचीं बोलणीं. कोलंबो परिषदेचे पुढारी पहिल्या प्रयत्नानें नामोहरम होणार नाहींत. आणखीहि प्रयत्न करतील. हिंदुस्थाननें शांततेकरितां सहा वर्षें प्रयत्न केले. युद्धाच्या तयारीकरितां त्यांना किती वेळ लागेल हें सांगतां येत नाहीं. पण आतां जो संरक्षणाचा व चीनला बाहेर घालविण्याचा प्रयत्न होईल तो परिणामकारक व यशस्वी झाला पाहिजे. त्यापूर्वीं सर्वसन्मान्य तडजोडीचे प्रयत्न हे चालूच ठेवावेत. काळाचा प्रश्न हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. चीनला विश्वासघात करतां येतो, आम्हांला करतां येत नाहीं. आमच्या लोकशाही नीतीला कांहीं मर्यादा आहेत, त्या आम्ही पाळणार आहोंत. मिळालेल्या प्रत्येक क्षणाचा आम्हांला उपयोग करावयाचा आहे. तो सावधानतेनें व सावधगिरीनें केला पाहिजे. आमची गांठ एका दगलबाज शत्रूशीं आहे. तो सैन्याचे सागर उभे करतो. त्या सागराला भरती आणतो व ओहोटीहि आणतो. त्याची लढण्याची पद्धत हीहि नवी आहे.

ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन आपल्याला पुढील तजविजी केल्या पाहिजेत. हें सर्व करीत असतां आम्हांला कांहीं पथ्यें पाळावीं लागतील. युद्धकाळापेक्षां युद्धोत्तर काळ हा समाजांतील जीवनमूल्यें बदलत असतो. जगांतील युध्यमान देशांत हीं परिवर्तनें झालीं आहेत. आज तर अणु-अस्त्रांची साधना जग करीत आहे. त्या अणुअस्त्रांच्या चढाओढींत मनुष्य-संहाराची भीति डोकावत आहे. आम्ही अनिच्छेनें आत्मसंरक्षणाकरितां शस्त्रसज्ज होणार असलों तरी आपली मूलभूत शांततावादी वृत्ति आम्ही सोडतां कामा नये. ती सुटली तर जगांत जे प्रकार चालले आहेत तेच प्रकार येथेंहि होतील. युद्ध ही एक तात्कालिक आपत्ति आहे. त्या आप-त्तींतून निर्माण होणाऱ्या कायमच्या आपत्तींत आम्ही सांपडतां कामा नये.

अशाच आपत्तींच्या काळांत आणखी एक गोष्ट करण्याची आवश्य-कता असते.ती म्हणजे आत्मनिरीक्षणाची. गेल्या पंधरा वर्षांत सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनांत आलेली अशुची आम्हीं घालविली पाहिजे. सत्ता ही ग्रहण करावीच लागते; पण त्या सत्तेकरितां आसक्ति असतां कामा नये. सत्तेच्या आसक्तीमुळें प्रमाद घडतात. राष्ट्राच्या खंबीरपणाचा पाया डळमळूं लागतो. तेव्हां ही अशुची गेली पाहिजे व जनतेला असें वाटलें पाहिजे कीं, युद्धोत्तर काळांत आमच्यांत समाजवाद येईल, व आमचें जीवन सुखी, समाधानी व शांततामय होईल.

पंधरा वर्षांपूर्वी म. गांधींच्या नेतृत्वाखालीं आपण स्वतंत्र झालों. तें स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर आहे. भावी पिढीला आपण कोणता वारसा ठेवणार आहों ? पारतंत्र्याचा का लष्करशाहीचा ? छे, कोणताहि नाहीं. आम्ही ज्या स्थितींत स्वतंत्र झालों, त्यापेक्षां जास्त उज्ज्वल स्थितींत आम्ही पुढच्या पिढीला नेऊन ठेवणार आहोंत. त्या-करितां करावे लागणारे कष्ट, भोगावी लागणारी आपत्ति व सहन करावीं लागणारीं संकटें यांना आपण तयार असलें पाहिजे. हीच आमची साधना, हीच आमची आराधना व हीच आमची शक्ति व मुक्ति आहे.

* * *

REFBK-0013143